


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
लातूर | बुधवार, ८ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक ११९ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्या जवळील चेतनाशक्ती आपण जागृत ठेवली आहे काय? याचाच आम्ही प्रथम विचार करावा. जेवढे परिश्रम आज आम्ही करीत आहोत, तेवढ्याच परिश्रमात आम्ही तिप्पट, चौपट काम करू शकू अशी चेतनाशक्ती जागविणे ही काळाची गरज आहे.

**- स्व. डॉ. आबाजी थत्ते**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

## महत्त्वाचे

### शेअर बाजारातील घोडदौड थांबली

**मुंबई :** गेल्या चार सत्रांपासून सुरू असलेल्या शेअर बाजारातील तेजीला अखेर ब्रेक लागला आहे. मंगळवारच्या अत्यंत चढ-उतारांच्या सत्रात सुरुवातीची वाढ टिकवून ठेवण्यात बेंचमार्क निर्देशांकांना अपयश आले आणि बाजार किरकोळ घसरणीसह बंद झाला. मिश्र जागतिक संकेतांमुळे बाजाराची सुरुवात मजबूत झाली होती. पहिल्या सत्रात बाजाराने आपली आघाडी कायम ठेवली, मात्र उत्तरार्धात झालेल्या नफावसुलीमुळे सकाळची सर्व कमाई वाहून गेली आणि बाजार लाल चिन्हात स्थिरावला. सेन्सेक्स १०४ अंकांनी घसरून ७८,१८० वर बंद झाला, तर निफ्टी ३१.६५ अंकांनी म्हणजेच घसरून २४,३९८.७० वर पोहोचला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये अधिक घसरण पाहायला मिळाली. निफ्टी मिडकॅपमध्ये ०.४ टक्के आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांकात ०.५५ टक्क्यांची घसरण झाली.

# ३८ दहशतवाद्यांची फाशी कायम



**अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट-२००८**

- अहमदाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय
- 'इंडियन मुजाहिदीन'ने घडविले स्फोट

**अहमदाबाद, ७ जुलै**

२००८ मध्ये इंडियन मुजाहिद्दीनच्या (आयएम) अतिरेक्यांनी घडवलेल्या बॉम्बस्फोट मालिकेप्रकरणी विशेष न्यायालयाने दिलेला निर्णय गुजरात उच्च न्यायालयाने कायम ठेवला. यामध्ये आयएमच्या ३८ सदस्यांना सुनावलेली फाशीची शिक्षा आणि इतर ११ जणांना ठोठावलेली जन्मठेपेची शिक्षा न्यायालयाने कायम ठेवली तसेच ५६ मृतांसह सर्व बळींच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याचा निर्देश सरकारला दिला. विशेष न्यायालयाने फेब्रुवारी २०२२ मध्ये दिलेल्या आदेशाद्वारे एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने फाशीची शिक्षा सुनावण्याची घटना पहिल्यांदाच घडली.

दोषी ठरवलेल्यांमध्ये स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या बंदी घातलेल्या संघटनेचा माजी नेता सफदर नागोरी आणि त्याच्या सहकाऱ्यांचा समावेश आहे. न्यायालयाच्या निकालाचा अभ्यास केल्यानंतर उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान दिले जाईल, असे आरोपींची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी सांगितले.

साखळी बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये आणि गंभीर जखमींना पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई ३० मार्च २०२७ पूर्वी देण्यात यावी, असा आदेश न्या. ए. वाय. कोगजे आणि न्या. समीर दवे यांच्या खंडपीठाने गुजरात सरकारला दिला. खंडपीठाने विशेष न्यायालयाच्या आदेशाविरुद्धची सर्व अपिले फेटाळून लावली आणि दहशतवादी संघटनेच्या सदस्यांना सुनावलेली शिक्षा कायम ठेवली.

२६ जुलै २००८ रोजी अवघ्या ७० मिनिटांच्या कालावधीत अहमदाबादच्या विविध भागांत २१ बॉम्बस्फोटांची मालिका घडली, यात ५६ जण ठार झाले आणि २०० पेक्षा जास्त जखमी झाले. स्फोटाच्या इतर ठिकाणांवरून पीडितांना उपचारासाठी नेलेल्या रुग्णालयांतही स्फोट घडवून आणण्यात आले. अशा प्रकारच्या हल्ल्यात रुग्णालयांना लक्ष्य केले गेल्याची ही पहिलीच घटना ठरली होती. या प्रकरणी विशेष न्यायालयात ७८ जणांवर खटला चालवण्यात आला. त्यापैकी ४९ जणांना फेब्रुवारी २०२२ मध्ये दोषी ठरवण्यात आले.

अहमदाबादमधील २१ स्फोटांसाठी दाखल केलेल्या २० एफआयआर आणि सुरतमधील (दहशतवाद्यांनी ठेवलेले बॉम्ब तिथे फुटले नाहीत) १५ एफआयआर अशा एकूण ३५ पोलिस प्रकरणांचे एकत्रीकरण करून हा खटला चालवण्यात आला. दोषी ठरलेल्यांमध्ये सिमीचा माजी नेता नागोरी आणि गुजरात, मध्यप्रदेश, केरळ व उत्तरप्रदेशसह ११ राज्यांमधील त्याच्या सहकाऱ्यांचा समावेश आहे. दोषी ठरवलेल्या दहशतवाद्यांनी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, तिथे त्यांच्या पदरी निराशा पडली आहे. सत्र न्यायालयाचा निकाल उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. ३८ दोषींना सुनावण्यात आलेली फाशीची शिक्षा कायम ठेवण्यात आली आहे, असे सरकारी वकील पटेल यांनी पत्रकारांना सांगितले. सविस्तर निकाल संकेतस्थळावर उपलब्ध झाल्यानंतर त्यातील कायदेशीर बारकाव्यांवर भाष्य करू, असे त्यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

**११ जणांना जन्मठेप**

### मार्च २०२५ पासून दररोज सुनावणी

या प्रकरणावर दीड वर्षापेक्षा जास्त काळापासून सविस्तर सुनावणी झाली. मार्च २०२५ पासून त्यावर दररोज सुनावणी घेण्यात आली आणि निकाल जाहीर होण्यापूर्वी या वर्षाच्या जानेवारीपासून दिवसभर चालणाऱ्या सुनावण्या झाल्या, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली.

### अभय चुडासामांनी केला तपास

निवृत्त आयपीएस अधिकारी अभय चुडासामा यांनी या प्रकरणाचा तपास केला होता. त्यावेळी ते अहमदाबाद गुन्हे शाखेत पोलिस उपायुक्त होते. त्यांनी तत्कालीन पोलिस सहआयुक्त आशिष भाटिया यांच्यासोबत तपासाचे पर्यवेक्षण केले होते. या निकालामुळे पोलिसांनी केलेल्या तपासावर शिक्कामोर्तब झाले, असे त्यांनी सांगितले.

# सोलापूरकरांसाठी आनंद वार्ता
# उजनी धरण प्लसमध्ये!

- पुणे जिल्ह्यात मुसळधार; ६३ दिवसांनी उजनी मायनसमधून बाहेर
- दौंड मधून १ लाख ५६ हजार १८७ क्युसेकचा विसर्ग तर विसर्गात अल्पशी घट
- चार दिवसात आले २०% पाणी; पाणीसाठ्यात ११ टीएमसीने वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ जुलै-**

मागील दोन दिवसांपासून पुणे जिल्हा व भीमा खोऱ्यातील मुसळधार पर्जन्यवृष्टी झाल्याने ६ मे २०२६ रोजी मायनस (मृत साठ्यात)गेलेल्या उजनी धरणात दौंड येथून १ लाख ५६ हजार १८७ क्युसेकने विसर्ग मिसळत आहे. मायनस २८.११ टक्के पाणीसाठा झालेल्या धरणातील पाणीपातळीत वाढ होत असून उजनी बुधवारी दि. ८ जुलै रोजी ६३ दिवसांनंतर पहाटे प्लस मध्ये येण्याची चिन्हे आहेत.

दौंड मधून मंगळवार दि ७ रोजी १ लाख ५६ हजार १८७ क्यूसेक्स विसर्गाने पाणी येत आहे, हेच पाणी दुपारी १ लाख ६१ हजार क्यूसेक्स ने येत होते . सोमवारी रात्रीपासून पुणे परिसरात पाऊस कमी झाल्यामुळे उजनीत येणारा विसर्ग घटू लागला आहे. चार दिवसापूर्वी पर्यंत उजनीची पातळी मायनस -२८.११ %पर्यंत गेली होती सध्या ती मायनस -८.५७% पर्यंत आलेली आहे, तीन दिवसात २० टक्के पाणी धरणात आले असून पाणीसाठ्यात ११ टीएमसी ने वाढ झालेली आहे. पुणे जिल्ह्यातील मुळा, मुठा, पवना इंद्रायणी नद्यांची सद्यस्थिती पाहता यापुढे चार ते पाच दिवसात २२ ते २५ टीएमसी पाणी उजनीत येईल असा नियंत्रण कक्षाचा अंदाज आहे तसेच आठ जून रोजी सकाळपर्यंत चार ते पाच टक्के जिवंत पाणीसाठा तयार झालेला असेल.

३० जून पासून पुणे, मावळ भाग, लोणावळा पश्चिम विभाग व त्यानंतर पाच जुलैपासून भीमाशंकर जे डोंगरात मुसळधार पाऊस झालेला असल्यामुळे उजनीच्या वरील १९ धरणामध्ये ७० ते ८० टक्के पाणीसाठा तयार झाला आहे, त्यामुळे आगामी तीन महिने पावसाळ्याचा विचार करता या सर्व धरणातून पाणी पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी कांही प्रमाणात नियमित खाली पाणी सोडणे अपरिहार्य ठरणार आहे, त्यामुळे दौंड येथून उजनी जलाशयात सातत्याने कमी अधिक विसर्ग चालूच राहणार आहे.

### मोटारी वर आणण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग

उजनी ची पाणी पातळी वजा २८.११ टक्के इतकी खालावली होती बॅकवॉटर परिसरातील शेतकऱ्यांनी पाणी खाली गेल्याने आपल्या मोटारी,केबल आणि पाईप पाण्याच्या दिशेने ठेवले होते परंतु.दोन दिवसांत १२ टीएमसी पाणी जमा झाल्याने पाणीपातळी वाढली आहे. परीसरातील शेतकरी आपल्या मोटारी पुन्हा जागेवर ठेवण्याची लगबग सुरू आहे.

**सात जुलै उजनीची सायंकाळची स्थिती..**

| | |
|---|---|
| पाणी पातळी | - ४९०.३५० मीटर |
| एकूण साठा | - ५९.०७टी एम सी |
| उपयुक्त साठा | - मायनस -४.५९ टीएमसी |
| टक्केवारी | - मायनस - ८.५७% |

# इंडोनेशिया घेणार ब्रह्मोस, अस्त्र क्षेपणास्त्रे

**जकार्ता, ७ जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी इंडोनेशियाचे राष्ट्रपती सुबियांतो यांच्यासोबत कित्येक महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली. दोन्ही नेत्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (इव्हीएम) अस्त्र आणि ब्रह्मोस क्षेपणास्त्र तसेच कृषी क्षेत्रातील सहकार्याच्या विस्तारावरही चर्चा केली.

करार आणि द्विपक्षीय बैठकीनंतर, पंतप्रधान मोदींनी दोन्ही देशांमधील सामायिक संस्कृतीचा उल्लेख सामर्थ्याचा स्रोत म्हणून केला. इव्हीएमबाबत झालेल्या सहमतीनुसार, दोन्ही देशांनी विशेषतः तयार केलेल्या भारतीय इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या निर्यातीबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्यादरम्यान भारत विशेष इव्हीएमच्या निर्मितीसाठी इंडोनेशियासोबत सहकार्य करणार आहे. भारताच्या निवडणूक व्यवस्थापन प्रणालीला मिळालेली ही एक महत्त्वपूर्ण मान्यता मानली जात आहे.




इव्हीएम व्यतिरिक्त, संरक्षण क्षेत्रातही दोन्ही देशांदरम्यान महत्त्वपूर्ण करार झाले आहेत. 'ऑपरेशन सिंधूर' दरम्यान भारताच्या हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र क्षमतेचे यशस्वी प्रदर्शन झाल्यानंतर, इंडोनेशियाने भारताची 'अस्त्र' क्षेपणास्त्रे आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. इंडोनेशिया आपल्या 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांचा साठा वाढवत असून, भारत अतिरिक्त बॅटरींचा पुरवठा करून यात मदत करणार आहे.

दोन्ही देशांमधील तंत्रज्ञानाच्या वापराचा उल्लेख करताना नरेंद्र मोदींनी सांगितले की, महत्त्वपूर्ण खनिजे आणि पोलाद क्षेत्रातील पुरवठा साखळी अधिक बळकट करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण करार करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

## 'एबीव्हीकेवाय'ला वर्षभराची मुदतवाढ

**नवी दिल्ली, ७ जुलै**

कर्मचारी राज्य विमा महामंडळाने (ईएसआयसी) लोकप्रिय बेरोजगारी भत्ता योजना अर्थात् अटल बिमित व्यक्ती कल्याण योजनेला (एबीव्हीकेवाय) वर्षभराची मुदतवाढ दिली आहे. आता या योजनेचा कालावधी ३० जून २०२७ पर्यंत असेल.

कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या बैठकीत घेतलेल्या या निर्णयानुसार ईएसआयसी च्या कक्षेत येणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याची नोकरी अनपेक्षितपणे किंवा सक्तीने राजीनामा देण्याचा आदेश देण्यात आला तरी सरकार त्याला नवीन रोजगाराच्या शोधादरम्यान आर्थिक मदत देणे सुरू ठेवेल.

अटल बिमित व्यक्ती कल्याण योजनेची सुरुवात २०१८ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आली होती. तेव्हापासून आतापर्यंत या योजनेला अनेकवेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. अचानक बेरोजगार होणाऱ्या नोकरदार लोकांना तात्पुरता आर्थिक दिलासा देणे, योजनेचा मुख्य उद्देश आहे.

(वृत्तसंस्था)

# परवान्यासाठी १ ऑगस्टपासून राज्यात डोमिसाईल अनिवार्य

**मुंबई, ७ जुलै**

राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**राज्यात सावकारी नियमन कायद्यात सुधारणा**

राज्यातील ग्रामीण भागात अवैध सावकारांकडून होणारा कर्जवसुलीचा तगादा आणि अवाजवी व्याजदर यामुळे अनेक शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ ओढवल्याचे प्रकार समोर आल्यानंतर राज्य सरकारने अखेर या विरोधात कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमात सुधारणा करणारे विधेयक विधानसभेत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मांडले.

(तभा वृत्तसेवा)

# ई-२० पेट्रोलमुळे समस्या उद्‌भवलेली कार दाखवा

### नितीन गडकरी यांचे आव्हान

**नवी दिल्ली, ७ जुलै**

२० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोल विक्रीच्या अनिवार्यतेवर होणारी टीका आणि वाहनांची इंधन कार्यक्षमता कमी झाल्याच्या तक्रारींच्या पृष्ठभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी टीकाकारांना आव्हान दिले की, त्यांनी या मिश्रित इंधनामुळे समस्या निर्माण झालेली एखादी तरी कार दाखवून द्यावी.

जीवाश्म इंधनावरील भारताचे अवलंबित्व हे आर्थिक ओझे (दरवर्षी इंधन आयातीवर २२ लाख कोटी रुपये खर्च होतात) आणि पर्यावरणीय धोका अशा दोन्ही दृष्टींनी समस्याप्रधान आहे; त्यामुळेच देशाच्या प्रगतीसाठी स्वच्छ ऊर्जेचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे, असे येथे आयोजित विकसित भारत कॉन्क्लेव्हला संबोधित करताना गडकरी म्हणाले. (वृत्तसंस्था)

## गोरस भांडारवरील कारवाई बेकायदेशीर : उच्च न्यायालय

**नागपूर, ७ जुलै**

अन्न आणि औषध प्रशासन विभागाने वर्धेतील ऐतिहासिक गोरस भंडारवर छापा घालून कारवाई केली होती. या कारवाईला उच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरविले आहे. ३१ मे पासून बंद असलेले गोरसभंडार आता पुन्हा सुरू होणार असून, वर्धेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.नागपूर अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या पथकाने ३१ मे रोजी वर्धा येथील गोरस भंडारवर अचानक धाड टाकत कारवाई केली होती. संस्थेच्या आवारात आणि निर्मिती प्रक्रियेत पुरेशी स्वच्छता नाही, असा ठपका ठेवत एफडीएने गोरस भंडारला थेट सील ठोकले होते. प्रशासनाच्या या एकतर्फी कारवाई विरोधात गोरस भंडार संस्थाचालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान, प्रशासनाने उपस्थित केलेले स्वच्छतेचा मुद्दा आणि केलेली कारवाई करण्याचे दिलेले कारण न्यायालयात टिकू शकले नाही.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरीकडे प्रस्थान

**देहू , ७ जुलै**

जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांच्या याच अभंगाची अनुभूती मंगळवारी ७ जुलै रोजी देहूनगरीत अनुभवायला मिळाली. डोळ्यांमध्ये विठ्ठलाच्या भेटीची आस, तोंडात हरीचे नाम आणि वीस दिवस घराबाहेर राहून आपल्या लाडक्या तुकोबांच्या पालखीची साथसंगत करत चालण्याचा निश्चय केलेले वारकरी, मान्यवरांची उपस्थिती, फुलांनी सजवलेले मंदिर, हरिनामाने दुमदुमुन गेलेला संत तुकोबांचा मंदिर परिसर आणि पावसाची रिमझिम अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी संत तुकारामांच्या पालखीने पंढरीकडे प्रस्थान ठेवले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, छत्रपती संभाजीराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी महाराणी संयोगिता राजे यांच्या उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडला.




दुपारी अडीचच्या सुमारास पालखी प्रस्थान सोहळ्याला सुरुवात झाली. मानाच्या दिंड्यांना महाद्वारातून आत प्रवेश देण्यात आला. गेल्या दोन दिवसांपासून पुणे, पिंपरी चिंचवड आणि परिसरात पडणाऱ्या संततधार पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर आला होता. त्यामुळे देहूमध्ये न येता पिंपरी चिंचवड किंवा पुण्यातून वारीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले होते. पावसामुळे दिंडीतील वारकऱ्यांची संख्याही कमी होती. मात्र, पंढरीला जाण्याची ओढ कमी नव्हती. मंदिरात आलेल्या वारकऱ्यांनी घातलेल्या फुगड्या, खेळलेली पावली आणि केलेला टाळ-मृदुंगाचा नाद यामुळे वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसानेही मंगळवारी काहीशी विश्रांती घेतली होती. विशेष म्हणजे प्रस्थान सोहळ्याच्या वेळी काही काळ ऊनदेखील पडले होते. पावसांच्या सरीत ओलेचिंब होत भक्तीरसामध्ये न्हाऊन वारकरी अखंड हरिनामाचा घोष करत होते. त्यामुळे वातावरण भारावून गेलेले. सायंकाळी चार वाजता पालखीचे प्रस्थान झाले. मंदिराच्या सभामंडपातून पालखी बाहेर आल्यानंतर उपस्थित वारकऱ्यांसोबत मंदिराची प्रदक्षिणा करण्यात आली. महाद्वारातून पालखी पुढे मार्गस्थ झाली. तुकोबांच्या पालखीचा पहिला मुक्काम देहूतील इनामदार वाड्यात होता. सायंकाळी या ठिकाणी समाजआरती करण्यात आली.

**श्रीची पूजा आणि शिळा मंदिरात महापूजा**

पहाटेपासूनच मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. पहाटे पाच वाजता श्रीची पूजा आणि शिळा मंदिरात महापूजा करण्यात आली. त्यानंतर साडेपाचला तपोनिधी नारायण महाराज समाधी पूजा करण्यात आली. सकाळी ९ वाजता संत तुकोबांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिरामध्ये सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने झाली. सकाळपासूनच मंदिरामध्ये वारकऱ्यांनी आणि देहूतील नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली. (तभा वृत्तसेवा)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ताजमहाल मूळचे शिव मंदिर

**लखनौ :** ताज महाल हे शंकराचे मंदिर होते आणि त्याचे मूळ नाव तेजो महल असे होते, मंदिरालवर ताजमहाल उभारण्यात आला. ताज महालाचे निरीक्षण करून त्यासंदर्भातील अहवाल न्यायालयात सादर केला जावा आणि त्यासाठी एक ॲडव्होकेट कमिश्नर नेमला जावा, अशी मागणी करणारी याचिका अलाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. त्यावर न्यायालयाने केंद्र सरकार, पुरातत्व विभागाला नोटीस जारी करत उत्तर दाखल करण्याचा आदेश दिला आहे. हरिशंकर जैन आणि अन्य लोकांनी दाखल करण्यात आलेल्या याचिकेत ताज महाल हे मूळचे शिव मंदिर होते आणि त्याचे नाव तेजो महल असे म्हटले आहे. तेजे महाल म्हणजे भगवान शंकराचे मंदिर आहे. ज्याचे रुपांतर ताज महालात करण्यात आले. हिंदूंना या ठिकाणी पूजा अर्चा आणि आरती करण्याची परवानगी देण्यात यावी. ताज महालाचे निरीक्षण करून त्यासंदर्भातील अहवाल न्यायालयात सादर करावा अशी मागणी याचिकेत करण्यात आली. न्या. रोहित रंजन अग्रवाल यांच्या एकलपीठ खंडपीठाने या प्रकरणात भारतीय पुरातत्व विभाग आणि केंद्र सरकार यांना नोटीस बजावत उत्तर सादर करण्याचा आदेश दिला.

# जातवैधता प्रमाणपत्राची सखोल पडताळणी होणार

## लाचखोर उपसंचालकाने जारी केलेल्या प्रमाणपत्रांची चौकशी




**मुंबई, ७ जुलै**

ठाणे जिल्ह्यातील चरई येथे लाच स्वीकारताना अटक झालेल्या आदिवासी विकास विभागाच्या उपसंचालकाने यापूर्वी जारी केलेल्या जात पडताळणी व जात वैधता प्रमाणपत्रांचीही आता सखोल चौकशी करण्यात येणार आहे. संबंधित प्रमाणपत्रांमध्ये कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार राजू तोडसाम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री डॉ. वुईके बोलत होते. .ठाणे जिल्ह्यातील चरई येथील एमटीएनएल इमारतीत कार्यरत आदिवासी विकास विभागाच्या उपसंचालक (संशोधन), वर्ग-१ कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणांतील नस्तीची पूर्तता करण्यासाठी लाचेची मागणी केल्याची तक्रार १३ फेब्रुवारी २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने चरई येथील कार्यालयात सापळा रचून संबंधित उपसंचालकाला २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पंचांसमक्ष अटक केली, अशी माहिती मंत्री डॉ. वुईके यांनी दिली.

या घटनेनंतर संबंधित अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात आले असून, सचिवांच्या मान्यतेने त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीसाठी आरोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्याने जारी केलेल्या जात पडताळणी व जात वैधता प्रमाणपत्रांची आता सखोल चौकशी करण्यात येणार वुईके यांनी विधानसभेत स्पष्ट केले.

(तभा वृत्तसेवा)

### बाईक टॅक्सी : अनधिकृत सेवांवर कठार कारवाई



राज्यात सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर परिवहन विभागाकडून सातत्याने दंडात्मक कारवाई सुरू असून, या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन सर्वकष नियोजन करत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत दिली. विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. या चर्चेत सदस्य सुनील प्रभू यांच्यासह अन्य सदस्यांनीही सहभाग घेतला. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, राज्यातील प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या वायुवेग पथकांकडून परवान्याशिवाय बाईक टॅक्सी सेवा चालविणाऱ्या वाहनचालकांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ८१४ दोषी वाहने आढळून आली, त्यापैकी १५१ वाहने जप्त करण्यात आली असून १४ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले. या कारवाईत १६.२५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# १३८ जलदगती न्यायालयांसाठी सातत्याने पाठपुरावा : मुख्यमंत्री

**मुंबई, ७ जुलै**

राज्यात मंजूर करण्यात आलेल्या १३८ जलद गती न्यायालयांपैकी सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत असून, उर्वरित न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा आमदार राहुल कुल यांनी जलदगती न्यायालयाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देतांना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात एकूण १३८ जलद गती न्यायालये सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र न्यायाधीशांची नियुक्ती ही पूर्णपणे न्यायव्यवस्थेच्या अखत्यारीतील बाब असल्याने सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत होऊ शकली आहेत. गेल्या वर्षभरापासून मुख्यमंत्री या नात्याने आपण व मुख्य न्यायाधीश यांच्या संयुक्त बैठकीत तसेच पत्रव्यवहाराद्वारे मंजूर न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याची विनंती सातत्याने करत असल्याचे त्यांनी सांगितले.

(तभा वृत्तसेवा)

## जळगाव जामोद प्रकरण

# पोलिस अधिकाऱ्यांवर निष्कासनाचीही कारवाई होणार

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणात तपास यंत्रणेकडून अत्यंत गंभीर स्वरूपाची चूक झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मान्य केले असून, या प्रकरणातील संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार ठोस कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. संबंधित महिला बेपत्ता असल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यानंतर एक मृतदेह आढळून आल्यानंतर, कोणतीही ठोस वैज्ञानिक पडताळणी अथवा अंतिम निष्कर्षापर्यंत न पोहोचता पोलिसांनी घाईघाईने तो मृतदेह त्याच महिलेचा असल्याचा निष्कर्ष काढला आणि तपास पूर्ण झाल्याचे भासवले. या घाईघाईच्या निष्कर्षाचे गंभीर परिणाम पुढे समोर आले. महिलेच्या आई-वडिलांनाच तिच्या कथित खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. मात्र काही काळाने संबंधित महिला जिवंत असल्याचे उघड झाले आणि ती स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाली. यानंतर पोलिसांना तिच्या आई-वडिलांची सुटका करावी लागली. दरम्यान, यापूर्वी सापडलेल्या मृतदेहाच्या ओळखीबाबतचा स्वतंत्र तपास अद्याप सुरू असून तो पूर्ण करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणात पोलिसांचे वर्तन अत्यंत चुकीचे असल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधित गुन्हे शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक तसेच प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येणार आहेत. प्रकरणाशी थेट संबंध सिद्ध होईल अशा अधिकाऱ्यांवर सेवेतून निष्कासनाचीही कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.



# एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

**मय्यर, ७ जुलै**

वाढदिवसाच्या पार्टीतून परतणाऱ्या कारस्वार तरुणांवर काळाने घाला घातला. भरधाव एसयूव्ही कार ट्रकच्या मागच्या भागाला धडकल्याने पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला.

ही घटना मय्यर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर रिग्रा गावाजवळ सोमवारी रात्री घडली. अपघातात प्राण गमावलेले पाचही तरुण काँग्रेसचे माजी आमदार मनीष पटेल यांच्या कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, मृत तरुण एका नातेवाईकाच्या वाढदिवसाच्या पार्टीला हजेरी लावून मैय्यरला परत येत होते. सोमवारी रात्री उशिरा त्यांची कार रिग्रा गावाजवळ पोहोचली असता ती समोरच्या ट्रकला धडकली. प्रत्यक्षदर्शींनुसार, कार भरधाव वेगाने जात होती.

त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती थेट ट्रकच्या मागच्या बाजूला धडकली. अपघातानंतर, वाहनाचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाल्यामुळे आतील प्रवासी कारमध्येच अडकले.

(वृत्तसंस्था)

# सर्वांचे लक्ष बांकीपूर पोटनिवडणुकीकडे

## अभिषेक कुमार भाजपाचे उमेदवार

**नवी दिल्ली, ७ जुलै**

बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीला राष्ट्रीय महत्व आल्यासारखे दिसत आहे.

या मतदारसंघात ३० जुलैला मतदान होणार असून ३ ऑगस्टला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल. भाजपाने अभिषेक कुमार यांना उमेदवारी दिली आहे.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची राज्यसभेवर अविरोध निवड झाली, त्यामुळे त्यांनी या मतदारसंघातील आमदारकीचा राजीनामा दिला, त्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा हा मतदारसंघ असल्यामुळे येथील पोटनिवडणुकीला यंदा महत्व आले आहे. जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांतकिशोर यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली, प्रशांत किशोर यांच्या उमेदवारीला तृणमूल काँग्रेसचे खासदार शत्रुघ्न सिन्हा यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. मात्र हा पाठिंबा शत्रुघ्न सिन्हा यांचा व्यक्तिगत आहे, की तृणमूल काँग्रेसचा हे अद्याप स्पष्ट झाले नाही. प्रशांतकिशोर यांच्या जनसुराज पक्षाने २०२५ ची बिहार विधानसभा निवडणूक लढवली होती, पण त्यात त्यांना एकही जागा जिंकता आली नव्हती. प्रशांतकिशोर तेव्हा निवडणूक रिंगणात नव्हते, यावेळी मात्र ते निवडणूक लढवत आहे.

राजदने रेखा गुप्ता यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे त्या महाआघाडीच्या उमेदवार असतील. लालुप्रसादांचे पुत्र तेजप्रताप यादव यांच्या जनशक्ती जनता दलाने विणा मानवी यांना आपला उमेदवार बनवले आहे. बांकीपूर हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघातून ९ वेळा भाजपाचे उमेदवार जिंकले आहे, विशेष म्हणजे या नऊहीवेळा नवीनप्रसाद सिन्हा आणि नितीन नवीन हे पितापुत्र जिंकले. नितीन नवीन या मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार म्हणून पाचवेळा निवडून आले होते. (तभा वृत्तसेवा)

# भारताचा मार्ग विस्ताराचा नव्हे, विकासाचा

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन



**जकार्ता, ७ जुलै**

भारत विस्ताराचा नव्हे, तर विकासाचा मार्ग चोखाळतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी इंडोनेशियाच्या संसदेला संबोधित करताना सांगितले. भारत-प्रशांत क्षेत्रात चीनच्या विस्तारवादी वागणुकीमुळे आग्नेय आशियात चिंतेचे वातावरण आहे. या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदी यांनी उपरोक्त वक्तव्य केले.

राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो आणि वरिष्ठ मंत्र्यांसह लोकप्रतिनिधींना संबोधित करताना मोदी यांनी दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करण्याचे आवागहन केले. तसेच सामायिक समृद्धीसाठी भारताचे १४० कोटी आणि इंडोनेशियाचे २९ कोटी नागरिक जेव्हा एकत्र वाटचाल करतील, तेव्हा जग ऐतिहासिक क्षण अनुभवेल, असे नमूद केले.

भारत हा मुक्त, खुल्या आणि सर्वसमावेशक भारत-प्रशांतचा खंबीर पुरस्कर्ता आहे. भारत-प्रशांत नौवहनाच्या स्वातंत्र्यावर भारताचा विश्वास आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. भारत विकासाच्या मार्गावर चालतो, विस्ताराच्या नाही, असे त्यांनी दक्षिण चीन समुद्र आणि त्या पलीकडे चीनकडून वाढत्या लष्करी शक्तिप्रदर्शनामुळे आग्नेय आशियातील वाढत्या चिंतेच्या पृष्ठभूमीवर सांगितले.

आपल्या भाषणात नरेंद्र मोदी यांनी १९५० च्या दशकापासूनच्या भारत-इंडोनेशिया संबंधांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. यात १९५५ च्या प्रसिद्ध बांडुंग परिषदेत दोन्ही देशांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचाही समावेश होता. तसेच अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांसाठी अमर्याद संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. इंडोनेशियाने आयोजित केलेल्या १९५५ च्या बांडुंग परिषदेने जागतिक शांततेला चालना देण्यासाठी आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमधील सहकार्य वाढवण्यासाठी २९ आशियाई व आफ्रिकन देशांच्या नेत्यांना एकत्र आणले. शीतयुद्धाच्या काळात अलिप्तवादी चळवळीचा पाया रचल्याचे श्रेय या परिषदेला मोठ्या प्रमाणावर दिले जाते. भारत आणि इंडोनेशियासाठी समुद्र हा कधीच अंतर दर्शवणारा घटक राहिला नाही. तो नेहमीच आमच्या देशांमधील एक दुवा राहिला आहे आणि आमच्या सामायिक भविष्यासाठी तो केंद्रस्थानी आहे, असे मोदींनी आपल्या भाषणात म्हटले.

**भारत-इंडोनेशिया एकत्र येतात तेव्हा...**

भारत आणि इंडोनेशिया एकत्र येतात तेव्हा ते जगाचा विश्वास दृढ करतात की, लोकशाही संधी निर्माण करते, लोकशाही विश्वास निर्माण करते आणि लोकशाही भविष्य घडवते, असे नरेंद्र मोदी म्हणाले. भारत,इंडोनेशिया आणि हिंद महासागर ही नावे दोन्ही देशांना जोडणाऱ्या दृढ संबंधांचे प्रतिबिंब आहेत.

**दहशतवादविरोधी सहकार्यावरही चर्चा**

नरेंद्र मोदी यांनी संयुक्त कार्यगटाच्या विद्यमान आराखड्याअंतर्गत दोन्ही देशांमधील दहशतवादविरोधी सहकार्याबाबतही चर्चा केली. सायबर धोके, दहशतवादाला मिळणारा वित्तपुरवठा आणि कट्टरवाद यांचा सामना करण्यासाठी सहकार्य वाढवून भारत आणि इंडोनेशिया शांतताप्रिय शक्तींना बळकट करू शकतात, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# महाबळेश्वरात शतकातील विक्रमी पाऊस

### २४ तासांत ५१३ मिमी. कोसळला



**सातारा, ७ जुलै**

पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडत असून सातारा जिल्ह्यात गत २४ तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. महाबळेश्वरमध्ये तब्बल ५१३ मिलिमीटर म्हणजेच २० इंच विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे यंदाचा पाऊस शतकातील सर्वाधिक पावसांपैकी एक मानला जात आहे.

पावसामुळे सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगरी भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. महाबळेश्वरमध्ये रस्ते जलमय झाले असून घाटरस्त्यांवर मातीचे ढिगारे आणि मोठमोठे दगड आल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. खंडाळा तालुक्यातील अतिट गावात रात्रभर झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे डोंगरातून आलेल्या पाण्यामुळे ओढ्या-नाल्यांना पूर आला आहे. या पुराचे पाणी अतिट गावातील मंदिर परिसरात आल्यामुळे रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले आहे. पूराचे पाणी ओढ्याकाठच्या काही घरांमध्ये शिरल्याने संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. तसेच शेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

(वृत्तसंस्था)

# निदा खानला जामीन मंजूर

**नाशिक :** संशयित लैंगिक छळ, सक्तीचे धर्मांतर आणि अनुसूचित जाती/जमाती कायद्याशी संबंधित प्रकरणात, नाशिक न्यायालयाने टीसीएसची माजी कर्मचारी निदा खानला तिच्या अटकेनंतर दोन महिन्यांनी जामीन मंजूर केला. सहआरोपी दानिश शेखचा जामीन अर्ज मात्र फेटाळण्यात आला. (वृत्तसंस्था)

# बद्रीनाथ-केदारनाथ समितीचा कर्मचारी निलंबित

**डेहराडून, ७ जुलै**

बद्रीनाथ मंदिरातील आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणात आरोपी कर्मचारी प्रमोद नौटियाल याला बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीने (बीकेटीसी) निलंबित केले. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या प्रकरणाची चौकशी गढवालचे आयुक्त आनंद स्वरूप यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समितीकडे सोपवली आहे. ही समिती १५ दिवसांच्या आत चौकशी अहवाल सरकारला सादर करेल. शासकीय कर्तव्यात गंभीर अनियमितता केल्याचा प्रथमदर्शनी आरोप समोर आल्यानंतर, नौटियाल याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय चौकशी समितीही स्थापन करण्यात आली होती. प्राथमिक चौकशीत आरोपांची पुष्टी झाल्यानंतर, नौटियाल यांना निलंबित करून जोशीमठ येथील बीकेटीसी कार्यालयाशी संलग्न करण्यात आले. निलंबनाच्या कालावधीत, त्याला सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्याची परवानगी दिली जाणार नाही. (वृत्तसंस्था)

# कराचीमध्ये दहशतवाद्यांची गुप्त बैठक

**कराची, ७ जुलै**

हिजबुल मुजाहिदीनचा दहशतवादी बुरहान वानीला श्रद्धांजली देण्यासाठी पाकिस्तानच्या कराचीत दहशतवाद्यांचे म्होरके एकवटले. त्यांनी लष्कर-ए-तोयबाची राजकीय शाखा असलेल्या पाकिस्तान सेंट्रल मुस्लिम लीगच्या (पीएमएमएल) मुख्यालयात बैठक घेतली. जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीनसारख्या दहशतवादी गटांतील चौदा प्रमुख दहशतवादी, तसेच इसिसशी संबंध असलेले लोक या बैठकीला उपस्थित होते. यावेळी भारताविरोधात कट रचण्यासाठी रणनीती आखण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

कराचीमध्ये पीपीएमएलच्या मुख्यालयात ५ जुलै रोजी दहशतवादी म्होरक्यांची एक गुप्त बैठक झाली. यावेळी जैश-ए-मोहम्मद, हिजबुल मुजाहिदीन आणि इसिसशी संबंधित दहशतवादी उपस्थित होते. बुरहान वानीच्या पुण्यतिथीनिमित्त भारताविरोधात कट रचण्यासाठी दहशतवादी एकत्र आल्याची माहिती अमेरिकेच्या वृत्तसंस्थेने दिली आहे. ऑल पार्टी हुर्रियत कॉन्फरन्सचा संयोजक गुलाम मोहम्मद सैफी याच्या नेतृत्वाखाली, लश्कर-ए-तोएबाचे दहशतवादी आणि पाकिस्तान सेंट्रल मुस्लिम लीगचा उपाध्यक्ष मेहंदी इशाक याच्या नेतृत्वात ही बैठक झाली. (वृत्तसंस्था)

# मुंबई आणि ठाणे जलमय



कराड येथील ओव्हरफ्लो झालेले कोडशी धरण

**मुंबई, ७ जुलै**

राज्यात गेल्या २४ तासांत पावसाने दमदार हजेरी लावली असून, अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस झाला आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, ७ जुलै २०२६ च्या सकाळपर्यंत राज्यात सर्वाधिक २०३.३ मिलीमीटर पावसाची नोंद पालघर जिल्ह्यात झाली आहे. कोकण किनारपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर सर्वाधिक असून, यामुळे अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. मुंबईसह संपूर्ण महानगर क्षेत्रात या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

राजधानी मुंबई आणि उपनगरांमध्ये गेल्या २४ तासांत पावसाचा जोर सातत्याने कायम आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात ९०.४ मिलीमीटर इतक्या जोरदार पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे मुंबईच्या हिंदमाता, सायन, मिलन सबवे, अंधेरी आणि कुर्ला यांसारख्या सखल भागांमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. सखल भागात पाणी साचल्यामुळे मुंबईतील तिन्ही रेल्वे मार्गांवरील (मध्य, पश्चिम आणि हार्बर) लोकल गाड्या १० ते १५ मिनिटे उशिराने धावत आहेत. पालघर जिल्ह्यापाठोपाठ ठाणे आणि रायगड जिल्ह्यालाही पावसाने झोडपून काढले आहे. (वृत्तसंस्था)

# माउलींचा पालखी प्रस्थान सोहळा आज

**आळंदी, ७ जुलै**

आषाढी वारी सोहळ्यासाठी लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा प्रस्थान सोहळा बुधवार, दिनांक ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आळंदी येथील संजीवन समाधी मंदिरात पार पडणार आहे. यंदा आळंदी आणि परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे इंद्रायणी नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून संपूर्ण आळंदीत पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी आळंदीतील वाहतूक व्यवस्था ठप्प झाली असून, नगरपरिषदेचे वॉटरहाऊस पाण्याखाली गेल्याने पिण्याच्या पाण्याची आणि निवासाची व्यवस्था करणे अशक्य आहे. या आपत्कालीन स्थितीचा विचार करून श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने यंदाचा प्रस्थान सोहळा मर्यादित स्वरूपात घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मंदिराचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली

परंपरेनुसार रथापुढील आणि रथामागील एकूण ५६ दिंड्यांमधील प्रत्येकी १० वारकरी (एकूण ५६०), मानकरी, सेवेकरी, प्रतिष्ठित आणि प्रशासकीय कर्मचारी अशा केवळ १६६० व्यक्तींच्या उपस्थितीतच हा सोहळा होईल. मंदिरात प्रवेशासाठी एकूण ५०० जणांना नारळप्रसाद दिला जाईल. पूरस्थिती पाहता, यंदा वारकऱ्यांचा आळंदीतील उशीर टाळण्यासाठी प्रस्थानाची वेळ दुपारी ४ ऐवजी ३ वाजता ठेवण्यात आली आहे. बुधवारचा मुक्काम आळंदीतच असून, गुरुवारी सकाळी पालखी पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होईल. मंदिर समितीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे आणि पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी सर्व वारकरी बांधवांना आळंदीस न येता, पुढील मुक्कामावर सोहळ्यात सहभागी होण्याचे नम्र आवाहन केले आहे. बुधवारी प्रस्थान झाल्यानंतर पालखीचा मुक्काम आळंदी गावातच असणार आहे. गुरुवार, ९ जुलै रोजी सकाळी पालखी पुणे शहराच्या दिशेने मार्गस्थ होईल. आळंदीतून बाहेर पडण्यासाठी असलेल्या तीन पुलांपैकी एका पुलावरील पाणी सध्या दीड फुटाने ओसरले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलांची पाहणी केली जात असून, त्यांच्या अहवालानंतरच पालखी कोणत्या पुलावरून बाहेर पडेल, हा मार्ग निश्चित केला जाणार आहे.

(तभा वृत्तसेवा)

# ‘सबांग’ हिंद महासागरातील होर्मुझ

## मलाक्काच्या प्रवेशद्वारावर भारताचा धोरणात्मक प्रवेश

**जकार्ता, ७ जुलै**

हिंद महासागरात आता भारत आणि इंडोनेशिया संयुक्तपणे एक नवा ‘होर्मुझ’ तयार करणार आहेत. हा ‘होर्मुझ’ मलक्काच्या प्रवेशद्वारावर आहे. येथून भारताच्या अंदमान-निकोबार द्विपसमूहातील इंदिरा पॉईंट जवळच आहे. या पावलामुळे भारत आणि इंडोनेशियातील हिंदमहासागरातील चीनचा ‘गेम प्लॅन’ बदलणार आहे.

हिंद महासागर क्षेत्रातील सागरी रणनीती अधिक बळकट करत असतानाच, भारत आणि इंडोनेशियाने सबांग बंदराच्या संयुक्त विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इंडोनेशियाचे सबांग बंगर विकसित करण्याबाबत दोन्ही देशांत सहमती झाली आहे. याला आधुनिक रूप दिले जाणार असून, यामुळे भारताची दखल वाढणार आहे. इंडोनेशियाच्या दौऱ्यावर गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबुयांतो यांच्यासोबत या करारावर स्वाक्षरी केली. सबांग बंदर जगातिक सर्वाधिक व्यस्त आणि धोरणात्मक सामुद्री मार्गांपैकी एक मलक्का सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वारावर आहे. अंदमान-निकोबार द्विपकल्पापासून सबांग केवळ १०० मैल अंतरावर आहे.

हजारो वर्षांपूर्वी भारत-चीन आणि दक्षिण-पूर्व आशियातील मसाल्याचा व्यापार समुद्रातून व्हायचा, त्यावेळी नाविकांनी एक अरुंद आणि महत्त्वपूर्ण सामुद्री मार्गाची ओळख पटवली होती. ही सामुद्रीधुनी हिंद महासागर आणि दक्षिण चिनी समुद्राला जोडते. आज जगातील जवळपास २५ टक्के व्यापार या सामुद्रीधुनीतून होतो. यात तेल, चिनी साहित्य, कोळसा आणि पामतेलाची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते.

**चीनसाठी महत्त्व काय ?**

चीनच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि ऊर्जा सुरक्षेसाठी मलाक्काची सामुद्रधुनी सर्वांत महत्त्वाची सागरी जीवनवाहिनी ठरते. हिंद महासागर आणि दक्षिण चीन समुद्राला जोडणारा हा अरुंद जलमार्ग जगातील सर्वांत व्यस्त व्यापारी मार्गांपैकी एक आहे. चीनला आयात होणारे तेल आणि नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा पश्चिम आशिया आणि आफ्रिकेतून याच मार्गाने देशात पोहोचतो. शिवाय, चीनचा निर्यातीवर आधारित व्यापारही मोठ्या प्रमाणावर याच सामुद्रधुनीवर अवलंबून आहे. ◂(वृत्तसंस्था)




### एकीकडे ग्रेट निकोबार प्रकल्प तर दुसरीकडे सबांग बंदर

भारत अंदमान आणि निकोबार बेटांवर ‘ग्रेट निकोबार प्रकल्पा’वर काम करीत आहे. ही एक महत्त्वाकांक्षी आणि बहुआयामी विकास योजना आहे; यात आंतरराष्ट्रीय ट्रान्स-शिपमेंट बंदर, ग्रीनफील्ड विमानतळ, ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक वसाहत यांच्या उभारणीचा समावेश आहे.

### चीनच्या ‘स्ट्रिंग ऑफ पर्ल्स’ला उत्तर

या कराराला एक महत्त्वपूर्ण भू-राजकीय पैलूही आहे. गेल्या दशकात, चीनने आपल्या ‘बेल्ट अण्ड रोड इनिशिएटिव्ह’ आणि ‘स्ट्रिंग ऑफ पर्ल्स’ धोरणाचा भाग म्हणून हिंद महासागर क्षेत्रातील अनेक बंदरे आणि सागरी प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे. या संदर्भात पाकिस्तानमधील ग्वादर, श्रीलंकेतील हंबनटोटा आणि म्यानमारमधील क्याउकफ्यू यासारख्या बंदरांचा त्यात समावेश आहे. या पृष्ठभूमीवर, सबांग बंदराचा विकास भारताला प्रादेशिक समतोल राखण्यास आणि आपल्या सागरी हितसंबंधांचे रक्षण करण्यास मदत करू शकतो.

# कॅनडाला मिळणार १२ पाणबुड्या

### नाटोच्या निधीचा वापर

**टोरंटो, ७ जुलै**

नाटोची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी संरक्षण खर्चात वाढ करण्याच्या प्रयत्नात असलेल्या कॅनडाने, सोमवारी १२ पाणबुड्या बांधण्यासाठी जर्मनीच्या थिसेनक्रुप मरीन सिस्टीम्स कंपनीची निवड केली. ही कॅनडाच्या सर्वात मोठ्या लष्करी खरेदींपैकी एक आहे.

पंतप्रधान मार्क कार्नी या आठवड्यातील नाटो शिखर परिषदेसाठी रवाना होण्यापूर्वी हा निर्णय घेण्यात आला, जिथे मित्र राष्ट्रांवर वाढीव संरक्षण खर्चाला ठोस योजनांचे पाठबळ देण्याचा दबाव आहे.

कॅनडाचे संरक्षण करण्याच्या आणि आमच्या मित्र राष्ट्रांना पाठिंबा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून, हे जाहीर करताना आनंद होत आहे की कॅनडाने आपल्या गस्ती पाणबुडी प्रकल्पासाठी टीकेएमएसची पसंतीचा पुरवठादार म्हणून निवड केली आहे, असे कार्नी म्हणाले. या करारासाठी जर्मन कंपनीने दक्षिण कोरियाच्या हानव्हा ओशनला मागे टाकले.

त्यांच्या पाणबुड्यांमुळे आंतरकार्यक्षमता वाढेल, कारण अनेक नाटो मित्र राष्ट्रे आधीपासूनच त्यांच्या पारंपरिक इंधनावर चालणाऱ्या नौका वापरतात. यावर्षी कॅनडाने नाटोचे दोन टक्के खर्चाचे पूर्वीचे उद्दिष्ट गाठल्यानंतर, कार्नी यांनी २०३५ पर्यंत सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) पाच टक्क्यांपर्यंत संरक्षण खर्च वाढवण्याचे वचन दिले आहे. हा नवीन ताफा कॅनडाच्या चार जुन्या व्हिक्टोरिया-श्रेणीच्या पाणबुड्यांची जागा घेईल. ◂(वृत्तसंस्था)

# खामेनेईची स्तुती शाहबाजांच्या अंगलट

## अमेरिकेच्या खासदाराने खडसावले; दहशतवादाला शरण देणारा देश

**वॉशिंग्टन, ७ जुलै**

पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासोबत लष्करप्रमुख असीम मुनीर, परराष्ट्र मंत्री इशाक दार, गृहमंत्री मोहसिन नक्वी आणि बिलावल भुट्टो झरदारी यांच्यासह अनेक अधिकारी खामेनेई यांच्या अन्त्यविधीसाठी इराणमध्ये पोहोचले. खामेनेई जगातील महान नेते असल्याचे स्पष्ट करत शाहबाज यांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. यावर अमेरिकेचे खासदार रिक स्कॉट यांनी त्यांचा समाचार घेत दहशतवादी ओसामा बिन लादेनला शरण देणाऱ्यांकडून अपेक्षा करणे अमेरिकेची घोडचूक असल्याचे म्हटले आहे.



अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करणारा पाकिस्तान निप्पक्षतेची अट विसरला आहे. खामेनेईच्या अन्त्यविधीत त्यांचा खरा चेहरा जगासमोर आला. अशा देशाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची घोडचूक असल्याचे स्कॉट यांनी म्हटले आहे. शाहबाज शरीफ यांनी खामेनेई यांची प्रशंसा करत त्यांना महान नेते अशी उपाधी दिली. त्यांनी व्यक्त केलेल्या शोकसंदेशाचा व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने अमेरिकेत पाकिस्तानच्या मध्यस्थीवरून संताप व्यक्त होत आहे. अशातच स्कॉट यांनी एक्सवरील पोस्टमध्ये शाहबाज यांच्या कृतीवर आक्षेप घेत म्हटले की,

पाकिस्तानच्या विश्वासार्हतेवरही आम्हाला आधीच संशय होता, आता तो सत्यात उतरला आहे. खामेनेई यांच्या पार्थिवाजवळ अश्रू गाळणारे शाहबाज मैत्रीच्या लायक नाही. मध्यस्थीसाठी पाकिस्तानची निवड करणे अमेरिकेची चूक होती.



**रिक स्कॉट आणि तेहरानमध्ये खामेनेईच्या अन्त्यनिधीत उपस्थित शाहबाज शरीफ, असीम मुनीर, इशाक दार**

**दहशतवाद्यांना शरण देणारा देश**

स्कॉट यांनी पाकिस्तानचा इतिहास आणि त्याची काळी कृत्ये अधोरेखित करत पंतप्रधान शरीफ यांना थेट लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, आपण लक्षात ठेवायला हवे की, आपण अशा देशाबद्दल बोलत आहोत जिथे ओसामा बिन लादेन एक दशकभर लपून राहिला होता, जिथे ख्रिश्चनांचा छळ करण्यासाठी मनमानी आणि अनियंत्रित ईशनिंदा कायदे लागू केले जातात आणि आता त्याच देशाच्या पंतप्रधानाने इराणच्या नरसंहाराची आणि हुकूमशहाची प्रशंसा केली. दहशतवाद्यांना शरण देणाऱ्या देशांकडून शांततेची अपेक्षा करणे आपलीच चूक आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ३० कोटींच्या मुदत ठेवी बंधन बँकेत ठेवण्यासंदर्भात स्थायी समिती सभेकडे प्रस्ताव

### राष्ट्रीयीकृत बँकेऐवजी खासगी बँकेत ठेवण्याच्या प्रस्तावाकडे सर्वांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि जीएसटी अनुदानाच्या मिळून ३० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी खासगी बँकेत ठेवण्याचा प्रस्ताव शुक्रवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेपुढे मंजुरीसाठी येणार असून यावरून महापालिका वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. सार्वजनिक निधी आणि कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची गुंतवणूक राष्ट्रीयीकृत बँकेऐवजी खासगी बँकेत करण्याच्या प्रस्तावाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या कार्यक्रमपत्रिकेतील विषय क्रमांक ४४ अंतर्गत हा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यानुसार कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे २० कोटी रुपये आणि जीएसटी अनुदानाचे १० कोटी रुपये, अशी एकूण ३० कोटी रुपयांची मुदत ठेव ठेवण्यासंदर्भातील प्रस्ताव आहे. महापालिकेने मुदतठेवीसाठी संकेतस्थळावर जाहिर प्रसिद्धी देऊन तसेच राष्ट्रीयीकृत आणि खासगी बँकांकडून ई-मेलद्वारे व्याजदर मागविले होते. प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये बंधन बँकेने वार्षिक ७ टक्के व्याजदराची ऑफर दिल्याने ही रक्कम त्या बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्याचा प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेनंतर स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे. मात्र अधिक व्याजदराच्या तुलनेत सार्वजनिक निधीची सुरक्षितता हा अधिक महत्त्वाचा मुद्दा असल्याची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः कर्मचारी भविष्य निर्वाह निधी हा कर्मचाऱ्यांच्या हक्काचा आणि संवेदनशील निधी असल्याने त्याची गुंतवणूक करताना बँकेची आर्थिक विश्वासार्हता, जोखीम, पारदर्शकता आणि निधीची सुरक्षितता या बाबींचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. शुक्रवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा होण्याची शक्यता असून, केवळ जास्त व्याजदराचा विचार न करता सर्व पैलू तपासून अंतिम निर्णय घेतला जातो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### निधीच्या सुरक्षिततेला अधिक प्राधान्य महत्त्वाचे : सीए बंदपट्टे

व्याजदर महत्त्वाचा असला तरी, सार्वजनिक निधीच्या सुरक्षिततेला अधिक प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे या प्रस्तावावर स्थायी समितीत सखोल चर्चा होऊन जोखीम, सुरक्षितता आणि पारदर्शकता या सर्व बाबींचा विचार करूनच अंतिम निर्णय घेण्याची गरज आहे, अशी प्रतिक्रिया सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी दिली.

#### प्रस्तावातील ठळक बाबी याप्रमाणे

**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी :** २० कोटी रुपये.
**जीएसटी अनुदान :** १० कोटी रुपये. **एकूण मुदत ठेव :** ३० कोटी रुपये. **प्रस्तावित बँक :** बंधन बँक.
**प्रस्तावित व्याजदर :** वार्षिक ७ टक्के. **निर्णय :** शुक्रवारी स्थायी समितीच्या सभेत अपेक्षित आहे.




# देशी बनावटीच्या ३ पिस्तुलांसह चौघे जेरबंद

**जिवंत काडतुसे, मोबाईलसह २.५ लाखाचा मुद्देमाल जप्त;**

**ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अवैधरित्या देशी बनावटीची पिस्तुले बाळगणाऱ्या चौघांविरुद्ध धडक कारवाई करत चार आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून ३ देशी बनावटीची पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे, चार मोबाईल हँडसेट असा एकूण २ लाख ४६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या टोळ्यांवर मोठा आळा बसला आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हत्तीद (ता. सांगोला) परिसरातील सांगोला-मिरज महामार्गावरील ब्रिजजवळ सापळा रचण्यात आला. पथकाने संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांची चौकशी केली असता त्यांची नावे अवधूत सुभाष केंगार (वय २७, रा. कोळा, ता. सांगोला), हर्षवर्धन ऊर्फ बालाजी नामदेव येळवे (वय २४, रा. किडेबिसरी, ता. सांगोला) आणि आबा धोंडीराम नलके (वय २९, रा. जुनोनी, ता. सांगोला) अशी असल्याचे निष्पन्न झाले. झडतीदरम्यान अवधूत केंगार व हर्षवर्धन येळवे यांच्या ताब्यातून प्रत्येकी एक देशी बनावटीचे पिस्तूल, प्रत्येकी दोन जिवंत काडतुसे आणि मोबाईल जप्त करण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी आणखी दोन देशी बनावटीची पिस्तुले व चार जिवंत काडतुसे महेबूब (रा. मध्यप्रदेश) याच्याकडून दोन वर्षांपूर्वी विकत घेतल्याची कबुली दिली. त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढवत स्थानिक गुन्हे शाखेने दिलीप शिवाजी अवताडे (वय ४६, रा. मदने वस्ती, कोळे, ता. सांगोला) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे आणि एक मोबाईल असा ६० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सांगोला पोलीस पाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना न्यायालयाने एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई ग्रामीण पोलिस विभागाने बाजवली आहे.



**केरळमधील वायनाड येथे मेप्पाडी बोगदा प्रकल्पाजवळील कल्लाडी भागात दरड कोसळल्यानंतरचे भीषण दृष्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. दरड कोसळून येथे चार जणांचा मृत्यू झाला आहे**

# बलुचिस्तानात दहशतवादी हल्ला

### नऊ पोलिस ठार

**इस्लामाबाद, ७ जुलै**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील पोलिस चौकीवर झालेल्या दहशथवादी हल्ल्यात किमान नऊ पोलिस कर्मचारी ठार झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली.

झियारात जिल्ह्यातील मांगी दम परिसरात सोमवारी रात्री पोलिस चौकीवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात नऊ पोलिस कर्मचारी ठार झाले, तर पाच बेपत्ता आहेत, अशी माहिती झियारातचे पोलिस उपायुक्त अब्दुल कुडूस अचकझई यांनी दिली. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी या हल्ल्याचा निषेध केला आणि मृतांना श्रद्धांजली अर्पण केली, असे वृत्त सरकारी वृत्तवाहिनी पीटीव्हीने दिली.

या परिसरात अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली आणि बेपत्ता पोलिस कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली, असे अचकझई यांनी सांगितले. ठार झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये मांगी आणि कावस पोलिस ठाण्याच्या प्रभारी तसेच दहशतवादविरोधी पथकाचे प्रभारी हेड कॉन्स्टेबल सैफुल्ला यांचा समावेश आहे, असे बलुचिस्तानच्या मुख्यमंत्र्यांचे सहकारी शाहिद रिंद यांनी सांगितले. हल्ल्यानंतर सुरू करण्यात आलेल्या शोधमोहिमेत तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तानच्या १५ दहशतावाद्यांना ठार केले. ◂(वृत्तसंस्था)

# आयुष्यभर चुकवावी लागते ‘टॅटू’ची किंमत

## रोगप्रतिकार प्रणालीवर होतो परिणाम | कर्करोगाचाही धोका

**वॉशिंग्टन, ७ जुलै**

सध्याच्या काळात ‘टॅटू’चे आकर्षण वाढते आहे. तरुणाईमध्ये तर मोठे आणि शरीराच्या विविध अवयवांवर टॅटू काढलेले असतात. पाश्चिमात्य देशातून आलेल्या या संस्कृतीची पाळमुळं आता आपल्या देशातही रुजताना दिसत आहेत. ‘टॅटू’चे आकर्षण हे पूर्वीपेक्षा अधिक लोकप्रिय झाले आहे. परंतु शास्त्रज्ञांनी टॅटू मानवी शरीरावर कायमस्वरूपी गंभीर परिणाम करतात, असा इशारा दिला आहे.

नवीन संशोधनानुसार, शरीरावर गोंदवून घेतल्याने रोगप्रतिकार प्रणालीमध्ये एक कायमस्वरूपी, आयुष्यभर चालणारी लढाई सुरू होते. जेव्हा टॅटूचा रंग त्वचेच्या मधल्या थरात शिरतो, तेव्हा शरीर त्याला लगेचच एक बाह्य धोका म्हणून ओळखते. ती आक्रमणकर्त्याला नष्ट करण्यासाठी पांढऱ्या रक्तपेशींची फौज पाठवते. तथापि, शाईचे कण मोठे असल्यामुळे पेशींना नष्ट करता येत नाहीत, रंगद्रव्य जागेवरच अडकून राहते; ज्यामुळे टॅटू कायमस्वरूपी होतो. संघर्ष इथेच थांबत नाही. टॅटूच्या शाईचे सूक्ष्म कण नियमितपणे तुटून शरीरातून प्रवास करतात आणि लसिका ग्रंथींमध्ये जमा होतात, असे अभ्यासातून दिसून आले आहे. या ग्रंथी संसर्गाशी लढण्यासाठी आणि टाकाऊ पदार्थ गाळून टाकण्यासाठी महत्त्वपूर्ण केंद्र आहेत, म्हणजेच बाह्य शाई थेट आपल्या रोगप्रतिकार संरक्षण प्रणालीच्या गाभ्यामध्ये स्थिरावत आहे, असे तज्ज्ञांनी ‘द कन्वर्सेशन’साठी लिहिलेल्या लेखात स्पष्ट केले.



नामवंत लोकांनी टॅटू काढण्याचे शारीरिक दुष्परिणाम आधीच अनुभवले आहेत. शाईमध्ये वापरल्या जाणाऱ्या घटकांमुळे हा धोका अधिकच वाढतो, असा इशारा तज्ज्ञांचा आहे. टॅटू उद्योग अजूनही मोठ्या प्रमाणावर अनियंत्रित आहे. अनेक आधुनिक रंगद्रव्ये मूलतः औद्योगिक वापरासाठी विकसित केली गेली होती; ज्यात कार पेंट, प्लॅस्टिक आणि प्रिंटर टोनर यांचा समावेश आहे. वैद्यकीय शास्त्रज्ञांना सामान्य शाईमध्ये निकेल, क्रोमियम आणि अगदी शिसे यांसारख्या जड धातूंचे अल्प प्रमाणदेखील आढळले आहे. रंगीत शाई, विशेषतः लाल, पिवळ्या आणि नारंगी रंगांमुळे दीर्घकाळ टिकणारा दाह आणि तीव्र ‘ऍलर्जिक रिॲक्शन’ होण्याची सर्वाधिक शक्यता असते, असे वैद्यकीय सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ मनाल मोहम्मद यांनी स्पष्ट केले.

टॅटूमुळे कर्करोगाचाही धोका असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जेव्हा काही विशिष्ट रंगांच्या शाई सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येतात किंवा लेझरने काढल्या जातात, तेव्हा त्यांचे विघटन होऊन ‘ॲरोमॅटिक अमाईन्स’ नावाची रसायने तयार होऊ शकतात; ज्यांचा प्रयोगशाळेतील अभ्यासांमध्ये जनुकीय हानीशी संबंध जोडला गेला आहे. काळ्या शाईमध्ये अनेकदा वाहनांच्या धुरामध्ये आढळणाऱ्यांसारखेच हायड्रोकार्बन्स असतात. ◂(वृत्तसंस्था)

#### टॅटू काढण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला आवश्यक

आरोग्य तज्ज्ञ टॅटू काढण्याचा विचार करणाऱ्या प्रत्येकाला स्वच्छता आणि शाईमधील घटकांविषयी टॅटू काढणाऱ्याशी बोलण्याचा सल्ला देतात. ज्या व्यक्तींना ‘ऑटोइम्यून’ आजारांचा इतिहास आहे किंवा ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत आहे, त्यांनी टॅटू काढण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अशी शिफारस तज्ज्ञ करतात. सध्या माणसांमध्ये टॅटू आणि कर्करोग यांचा संबंध जोडणारा कोणताही निश्चित पुरावा नसला, तरी काही सांख्यिकीय अभ्यासांनी टॅटू काढलेल्या व्यक्तींमध्ये त्वचेच्या कर्करोगाचा धोका जास्त असल्याचे दाखविले आहे.

### माफीच्या साक्षीदाराला परदेश प्रवासाची परवानगी

**नवी दिल्ली, ७ जुलै**

दिल्ली उत्पादन शुल्क घोटाळ्याशी संबंधित सीबीआय प्रकरणात माफीचा साक्षीदार बनलेल्या दिनेश अरोरांना राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने परदेश प्रवासाची परवानगी दिली आहे. विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) त्यांच्याविरुद्ध जारी केलेली लुकआऊट सर्क्युलर नोटीस ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत स्थगित करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने दिनेश अरोरांना २५ लाख रुपयांच्या अमानत ठेवीच्या आधारावर परदेश प्रवासाची परवानगी दिली. तसेच, दिनेश अरोराच्या बार्सिलोना, स्पेन आणि लंडन येथील प्रवासावरील लुकआऊट सर्क्युलर नोटीस ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत स्थगित करण्याचे आदेश दिले. प्रवास हा जीवनाचा एक महत्त्वाचा मूलभूत हक्क असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. दिनेश अरोराला मनी लाँडरिंग आणि सीबीआय या दोन्ही प्रकरणांमध्ये जामीन मंजूर झाला आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# वारी आणि पाऊस

मंगळवारी देहूतून संत तुकाराम महाराजांची पालखी मार्गस्थ झाली तर आळंदीतून बुधवारी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करेल. पुणे जिल्ह्यासह परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी रस्ते, पूल आणि वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. वारीच्या नियोजनात प्रशासनाकडून दरवर्षी मोठमोठे दावे केले जातात; प्रत्यक्षात पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत अनेक ठिकाणी अपुरी व्यवस्था, विस्कळीत वाहतूक, चिखलमय मार्ग आणि मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. नैसर्गिक आपत्ती टाळता येत नसली, तरी तिचा परिणाम कमी करण्यासाठी आवश्यक नियोजन, समन्वय आणि तत्परता अपेक्षित असते. वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असल्याने वारकऱ्यांची सुरक्षितता आणि सोयीसुविधा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, त्यांची प्राथमिकताही असली पाहिजे. येणाऱ्या काळात पालखी मार्ग अधिक सोयी-सुविधायुक्त करण्याची आवश्यकता आहे. कारण वारी हे महाराष्ट्राचे आध्यात्मिक आणि सामाजिक संचित आहे आणि त्याच संचिताच्या भरवशावर महाराष्ट्राने आतापर्यंतचा प्रवास केलेला आहे.

आषाढीची चाहूल लागते, आभाळ भरून येते, काळ्या ढगांची गर्दी होते आणि पावसाच्या सरी वावरातल्या ढेकळांना चिंब भिजवू लागतात, तेव्हा वारकऱ्यांच्या मनाला पंढरीच्या वाटेची ओढ लागते. यंदा मात्र पावसाच्या कहराने जनजीवन विस्कळीत झाले. देहू आणि आळंदीत कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने वारकऱ्यांची वाट खडतर केली. तरीही विठुरायाच्या दर्शनाची आस उराशी बाळगून वारकऱ्यांची पावले पंढरीच्या दिशेने चालू लागली आहेत. ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता सुरू असलेल्या भक्तिप्रवासातूनच वारीचा खरा अर्थ उमगायला लागतो. पाऊस आणि वारीचे नाते तसे जुनेच. पाऊस जसा शेतीला नवजीवन देतो, तशीच वारी माणसांच्या मनाला नवी ऊर्जा आणि सकारात्मक विचार देते. वारीत हजारो लोक एकत्र चालतात, एकमेकांना साथ देतात आणि समतेचा, सहकार्याचा संदेश जगतात. त्यामुळे पाऊस आणि वारी यांचे नाते हे निसर्ग, श्रद्धा आणि माणुसकीला जोडणारे आहे. हे नाते आपल्याला एकत्र जगण्याची, संकटातही आशावादी राहण्याची आणि समाजाशी जोडून राहण्याची प्रेरणा देत आले आहे. पाऊस म्हणजे सृष्टीचे पुनरुज्जीवन तर वारी म्हणजे समाजमनाचे पुनरुज्जीवन. उन्हाने तापलेली जमीन पावसाची वाट पाहते, तसेच दैनंदिन जीवनातील संघर्ष, ताणतणाव आणि स्पर्धेने थकलेले मन वारीतील सामूहिक आनंदाची वाट पाहत असते. पावसाचे थेंब जमिनीची तहान भागवतात, तर 'ज्ञानोबा-तुकाराम'चा गजर मनातील कोरडेपणा दूर करतो. पावसाच्या सरी आणि वारकऱ्यांची पावले एकाच वेळी या मातीत सृजनाच्या पाऊलखुणा उमटवतात, तेव्हा निसर्ग आणि संस्कृतीचा अद्भुत संगम घडताना दिसतो. वारीत लाखो माणसे एका ध्येयाने, एका लयीत आणि एका भावनेने चालतात. आधुनिक काळात माणसामाणसांतील अंतर वाढत असताना वारी मात्र माणसांना जवळ आणते. जात, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा अशा अनेक भिंती समाजात उभ्या राहत असताना वारी त्या भिंती सहजपणे ओलांडते. येथे श्रीमंत-गरीब असा भेद नसतो. अधिकारी आणि सामान्य माणूस एकाच रस्त्यावर चालतो. शेतकरी, कामगार, व्यापारी, नोकरदार, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना सामावून घेणारा हा लोकप्रवाह समतेच्या परंपरेचे दर्शन घडविणारा आहे.

कोणत्याही परिस्थितीत वारीचे हे माहात्म्य टिकले पाहिजे आणि तिच्या सातत्यात खोळंबा येऊ नये. आज हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, शहरीकरण, पर्यावरणाचा ऱ्हास आणि सामाजिक अस्वस्थता अशी अनेक आव्हाने उभी आहेत. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशा टोकाच्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. या बदलत्या वास्तवात पाऊस आणि वारी या दोन्हींकडे नव्या जाणिवेतून पाहण्याची गरज आहे. निसर्गाशी असलेले नाते तुटले तर मानवी जीवनाचा समतोल बिघडतो आणि समाजाशी असलेली नाळ तुटली तर माणसाच्या अस्तित्वातील संवेदनशीलता हरवते. पाऊस निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची जाणीव करून देतो, तर वारी समाजाशी असलेल्या आपल्या बांधिलकीचे भान जागवते. वारीच्या वाटेवर पडणारा पाऊस वारकऱ्यांच्या निष्ठेची परीक्षा पाहतो. ओले कपडे, चिखलाने माखलेले रस्ते, थकलेले शरीर आणि प्रतिकूल परिस्थिती यांवर मात करीत पुढे जाणारी पावले जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान सांगून जातात. परिस्थिती नेहमी अनुकूल असेलच असे नाही; मात्र ध्येय स्पष्ट असेल, सोबत विश्वासाची माणसे असतील आणि मनात आशा जिवंत असेल, तर खडतर वाटही पार करता येते. म्हणूनच आषाढातील पाऊस आणि पंढरीची वारी हे दोन्ही प्रवाह आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत. एका प्रवाहातून धरतीची सर्जनशीलता फुलते तर दुसऱ्या प्रवाहातून समाजाची संवेदनशीलता जागी होते. एक मातीला अंकुरण्याचे बळ देतो, तर दुसरा माणसाला माणूस म्हणून जगण्याची दिशा देतो. आभाळातून बरसणाऱ्या सरी आणि मुखातून उमटणारा विठ्ठलनामाचा संगम होत राहिले, तर महाराष्ट्राच्या मातीतील श्रद्धा आणि माणुसकीचा ओलावा कधीच आटणार नाही. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालेला वारकरी शेकडो किलोमीटर चालतो. एवढा प्रदीर्घ प्रवास तो कशासाठी करतो? मंदिरातील मूर्तीचे काही क्षण दर्शन घेण्यासाठी? तसे असते तर आधुनिक वाहतुकीच्या साधनांनी काही तासांत पंढरपूर गाठणे सहज शक्य आहे. तरीही लाखो माणसे पायी चालण्याचा मार्ग निवडतात. कारण वारीचे खरे मर्म मुक्कामापेक्षा प्रवासात आहे. विठ्ठलाच्या दर्शनाइतकेच विठ्ठलाच्या दिशेने चालत राहण्यात आहे. आज माणसे प्रचंड वेगाने धावत आहेत. त्यांच्याकडे पैसा आहे, साधने आहेत, तंत्रज्ञान आहे; पण वेळ नाही. संवादाची असंख्य माध्यमे आहेत; पण मन मोकळे करण्यासाठी माणूस नाही. सोशल मीडियावर हजारो मित्र आहेत; पण संकटाच्या काळात खांद्यावर हात ठेवणारा मित्र शोधावा लागतो. मोठी घरे आहेत; पण कुटुंबे लहान होत आहेत. जग जवळ आले आहे; पण माणसे एकमेकांपासून दूर जात आहेत. अशा काळात लाखो अनोळखी माणसांना एका वाटेवर आणणारी वारी अधिक महत्त्वाची ठरते. पायी चालणे हा वारीचा आत्मा आहे. आजच्या काळात माणसाचे श्रम कमी करण्यासाठी अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. शरीराचे कष्ट कमी झाले; पण मनाचा थकवा मात्र वाढत गेला. वारीत मात्र माणूस स्वतःच्या पायांवर आणि स्वतःच्या जिद्दीवर विश्वास ठेवतो. प्रत्येक पावलागणिक अंतर कमी होत जाते. शरीर थकते, पाय दुखतात; पण मन अधिक मजबूत होत जाते. संकटांवर मात करण्यासाठी चमत्काराची गरज नसते, तर सातत्याने एकेक पाऊल पुढे टाकण्याची तयारी लागते, हे वारी सहज शिकवते. म्हणूनच सभोवताली पावसाचे तांडव सुरू असले, तरी वारकऱ्यांची पावले थांबत नाहीत, पुढे चालत राहतात. वारी ही महाराष्ट्राच्या सामूहिक चेतनेची जिवंत अभिव्यक्ती आहे. बदलत्या काळातही ती माणसाला निसर्गाशी, समाजाशी आणि स्वतःच्या अंतर्मनाशी जोडण्याचे काम करते. पावसाच्या आव्हानांमध्येही वारकऱ्यांचा प्रवास आपल्याला धैर्य, शिस्त आणि सहनशीलतेची शिकवण देतो. या परंपरेचे महत्त्व तिच्या अधिष्ठानी असलेल्या मूल्यांमध्ये आहे. परस्परांना आधार देणे, संकटांमध्ये संयम राखणे आणि सामूहिक हिताचा विचार करणे ही वारीची खरी शिकवण आहे. वारीचा वारसा जपताना तिच्यातील मानवी मूल्ये पुढील पिढ्यांपर्यंत आपल्याला पोहोचवावे लागतील. पावसापासून नियमितता व सातत्य शिकावे लागेल आणि वारीतून सामाजिक सौहार्दाची ताकद समजून घ्यावी लागेल. हे शिकायचे यासाठी की, पावसाचे सातत्य राहण्यासाठी आणि वारीची निरंतरता टिकण्यासाठी आपल्या सर्वांना झटावे लागणार आहे. ■

## विशेष

# रेल्वेची वाटचाल हरित विकासाकडे

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतीय रेल्वे ही केवळ देशाची वाहतूक व्यवस्था नाही, तर आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक जीवनवाहिनीचा अविभाज्य भाग आहे. दररोज कोट्यवधी प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचवणारी आणि लाखो टन मालाची वाहतूक करणारी ही यंत्रणा देशाच्या विकासाचा कणा मानली जाते. अलिकडे संसदेत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार भारतीय रेल्वेने २०१६-१७ च्या तुलनेत डिझेलच्या वापरात तब्बल ६२ ते ६३ टक्क्यांची घट साध्य केली आहे. या बदलामुळे दरवर्षी सुमारे १७८ कोटी लिटर डिझेलची बचत होत आहे. ही आकडेवारी केवळ प्रशासकीय यशाचे प्रतीक नाही, तर भारताच्या ऊर्जा धोरणातील एका महत्त्वपूर्ण परिवर्तनाची साक्ष देणारी आहे. आज भारतीय रेल्वेच्या ब्रॉडगेज मार्गांपैकी जवळपास संपूर्ण जाळ्याचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. जगातील सर्वांत मोठ्या रेल्वे नेटवर्कपैकी एक असलेल्या भारतीय रेल्वेने एवढ्या मोठ्या प्रमाणावर केलेले विद्युतीकरण हे अभियांत्रिकी, नियोजन आणि अंमलबजावणीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

रेल्वेचे विद्युतीकरण ही केवळ वाहतूक क्षेत्रातील सुधारणा नसून ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने टाकलेले दूरदर्शी पाऊल आहे. पश्चिम आशियातील वाढते संघर्ष, रशिया-युक्रेन युद्धानंतर जागतिक ऊर्जाबाजारात निर्माण झालेली अस्थिरता आणि तेलाच्या किमतीतील सातत्यपूर्ण चढउतार यामुळे ऊर्जा स्वावलंबनाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. अशा वेळी रेल्वेच्या वाढत्या विद्युतीकरणामुळे भारताची आयातीत डिझेलवरील गरज कमी झाली आहे. परिणामी, जागतिक परिस्थितीतील बदलांचा देशाच्या वाहतूक व्यवस्थेवर होणारा परिणाम मर्यादित राहतो. ही बाब आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर धोरणात्मकदृष्ट्याही महत्त्वाची आहे. रेल्वेच्या ऊर्जावापराचा मोठा भाग आता विद्युतशक्तीवर आधारित असल्याने इंधनखर्चात स्थैर्य आले आहे. दीर्घकालीन दृष्टीने पाहता ही बचत हजारो कोटी रुपयांच्या स्वरूपात देशाच्या अर्थव्यवस्थेला लाभदायक ठरणार आहे.



पर्यावरणाच्या दृष्टीने या बदलाचे महत्त्व आणखी मोठे आहे. भारताने २०७० पर्यंत नेट-झीरो उत्सर्जनाचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी वाहतूक क्षेत्रातील उत्सर्जन कमी करणे आवश्यक आहे. डिझेलवर चालणाऱ्या रेल्वे इंजिनांमुळे मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साईड आणि इतर प्रदूषक वायू वातावरणात सोडले जात होते. विद्युतीकरणामुळे या उत्सर्जनात लक्षणीय घट झाली आहे. याशिवाय भारतीय रेल्वे आता नवीकरणीय ऊर्जेच्या वापराकडेही वेगाने वाटचाल करत आहे. भविष्यात रेल्वेच्या विजेचा मोठा भाग अक्षय ऊर्जेतून उपलब्ध झाला, तर भारतीय रेल्वे जगातील सर्वांत हरित वाहतूक व्यवस्थांपैकी एक ठरू शकते.

मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीत सुधारणा झाली आहे. वेळेचे नियोजन अचूक झाले असून ऑपरेशनमधील अडथळे कमी झाले आहेत. भारतासारख्या विशाल देशात आर्थिक विकासासाठी कार्यक्षम रेल्वे व्यवस्था अत्यावश्यक आहे. उद्योग, व्यापार, शेती आणि सेवा क्षेत्र या सर्वांना वेगवान आणि विश्वासार्ह वाहतुकीची गरज असते. त्यामुळे रेल्वेचे आधुनिकीकरण हे देशाच्या एकूण विकासप्रक्रियेशी थेट जोडले आहे. विद्युतीकरणामुळे डिझेलवरील अवलंबित्व कमी झाले असले, तरी विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मजबूत ऊर्जा पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. रेल्वेला सातत्याने आणि गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी वीज वितरण व्यवस्था, उपकेंद्रे आणि प्रसारण यंत्रणा अधिक सक्षम करावी लागेल. तसेच वीजनिर्मितीमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा वाढविल्याशिवाय विद्युतीकरणाचे पर्यावरणीय फायदे पूर्णपणे साध्य होणार नाहीत. रेल्वेच्या विद्युतीकरणाचा सामाजिक आणि आर्थिक परिणामही सकारात्मक आहे. इंधन आयात कमी झाल्यामुळे परकीय चलनाची बचत होते. वाहतूक खर्चात घट झाल्यास उद्योगांची स्पर्धात्मकता वाढते. मालवाहतूक स्वस्त आणि कार्यक्षम झाल्यास उत्पादन क्षेत्राला चालना मिळते. शेतीमाल, औद्योगिक उत्पादने आणि निर्यात मालाची वाहतूक वेगवान आणि किफायतशीर बनून संपूर्ण अर्थव्यवस्थेला मिळतो.

या यशामागे दीर्घकालीन नियोजन आणि सातत्यपूर्ण गुंतवणुकीची भूमिका महत्त्वाची आहे. गेल्या दशकात हजारो किलोमीटर मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले. अनेक नवीन रेल्वे प्रकल्प सुरुवातीपासूनच विद्युत प्रणाली लक्षात घेऊन उभारण्यात आले. या प्रक्रियेमुळे भारताने जगासमोर एक महत्त्वपूर्ण उदाहरण निर्माण केले आहे, की मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक पायाभूत सुविधांचे हरित रूपांतरण प्रभावीपणे कसे करता येते. आज जगभर ऊर्जा संक्रमणाची चर्चा सुरू आहे. जीवाश्म इंधनांवर आधारित अर्थव्यवस्थेकडून स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेकडे वाटचाल करणे ही काळाची गरज बनली आहे. भारतीय रेल्वेचे विद्युतीकरण हे या संक्रमणातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून देशाच्या भविष्यातील विकास मॉडेलचे प्रतीक आहे. यात आर्थिक शहाणपण, पर्यावरणीय जबाबदारी आणि राष्ट्रीय हित यांचा सुंदर संगम दिसून येतो. भारताने आगामी काळात या यशाला आणखी व्यापक स्वरूप देणे आवश्यक आहे. विद्युतीकरणासोबतच हरित ऊर्जा, ऊर्जा साठवण तंत्रज्ञान, स्मार्ट ग्रिड आणि आधुनिक रेल्वे तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा लागेल. रेल्वेचे आधुनिकीकरण आणि पर्यावरणपूरक विकास यांची सांगड घालून भारत जगासमोर शाश्वत विकासाचे प्रभावी उदाहरण निर्माण करू शकतो. योग्य धोरण, दृढ राजकीय इच्छाशक्ती आणि परिणामकारक अंमलबजावणी यांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडवून आणणे शक्य आहे, हे भारतीय रेल्वेच्या विद्युतीकरणाने सिद्ध केले आहे. डिझेल वापरातील मोठी घट ही केवळ आकडेवारी नसून ऊर्जा स्वावलंबनाकडे, आर्थिक बचतीकडे आणि हरित भविष्याकडे टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. देशाच्या विकासाच्या पुढील प्रवासात हे यश मैलाचा प्रेरणादायी दगड ठरेल. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# स्वार्थापुढे 'झाडे'ही बदनाम!

**विजय निचकवडे**

पाळेमुळे पिढीवर होणाऱ्या संस्काराची असोत की तुमचा-आमचा श्वास चालू ठेवण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायू देणाऱ्या वृक्षांची. जोपर्यंत ती खोलवर रुजत नाही, त्याला पोषण मिळत नाही, तोवर ती पिढी वा वृक्ष दुबळे आणि खिळखिळेच राहणार! भौतिक सुविधांच्या नादात आम्ही स्वार्थी झालो. आमच्या चुकांचे खापर निष्पाप झाडांवर फुटू लागले आणि त्यांनाही बदनाम करण्यात कोणतीच कसर आम्ही सोडली नाही. आतापर्यंत वाहिन्यांवर रोजच्या चर्चेत येणारे एक नाव आपण जाणतोच! होय, त्याची सवयच आम्हाला झाली होती. पण जेव्हापासून पाऊस आपल्या क्षमतेने पडू लागला, तेव्हापासून चर्चेत आली ती झाडे! ती व्यक्तीही मुंबईची आणि झाडेही मुंबईचीच! त्या व्यक्तीच्या चर्चेकडे राजकीय मनोरंजन म्हणून पाहिजे जाते, पण ज्या झाडांची चर्चा सध्या होते आहे, ती झाडे नाहक बदनाम होताहेत, त्याचे काय? म्हणे, झाडांनी बळी घेतले... झाडांनी नुकसान केले. खरंच हे नुकसान झाडांनी केले आहे का? याचा विचार करण्याची गरज आहे. मुंबईत अवघ्या ६ दिवसांत ११०० झाडे पावसामुळे उन्मळून पडली. काही झाडांच्या खाली लोकांचे जीव गेले तर काही ठिकाणी नुकसान झाले. यासाठी केवळ झाडांना दोष देऊन तुम्ही मोकळे होणार का? जी झाडे वर्षानुवर्षापासून निःस्वार्थपणे उभी आहेत. तुमचा श्वास चालावा म्हणून प्राणवायू देण्याचे काम अव्याहतपणे करीत आहेत, त्यांच्या माथी सर्व खापर फोडण्याइतके स्वार्थी आपण कसे होऊ शकतो?

झाडांची ही अवस्था का झाली, यावर चिंतन-मंथन करण्यास कोणत्याही शास्त्रीय संशोधनाची गरज नाही. आज आम्ही भौतिक सोयी-सुविधांच्या नादात सिमेंट काँक्रीटीकरणाच्या मागे वाहवत गेलो आहोत. शहराचे सुशोभीकरण करताना फूटभर जमीनही दिसू नये, अशा पद्धतीने सिमेंटचे जाळे आम्ही पसरवू लागलो आहोत. मग काय, झाडांच्या सभोवताल असलेली माती संपली, मातीतून झाडांच्या मुळांपर्यंत जाणारी हवा थांबली, मुळांना मिळणारे ऑक्सिजन बंद झाले. परिणामी मुळांची वाढ खुंटली. झाडांची मुळे आतल्या आत गुदमरू लागली. सिमेंटमुळे पाण्याचा पाझर थांबला. मातीतील पोषक तत्त्व मुळांपर्यंत पोहोचण्यास बाधा निर्माण झाली. ती कमकुवत होऊन पकड सैल झाली व आज जराही वारा आली की ती पडू लागली. आज झाडे पडून झालेले मृत्यू आणि नुकसान झाडांच्या माथी मारले गेले; पण खरंच यासाठी केवळ झाडेच दोषी आहेत का? झाडांच्या बुंध्यापासून ४ ते ६ मीटरपर्यंत कोणत्याही प्रकारचे सिमेंट काँक्रीटचे काम करू नये असे असताना आम्ही झाडांना खेटून बांधकाम करतो. जमिनीत मुरणारे पाणी थांबवितो, मातीतून झाडांच्या मुळांना जाणारे ऑक्सिजनही थांबवितो. चुका आम्ही करतो, पण दोष देताना आम्हाला झाडेच दिसतात.



केलेल्या चुकींचे क्षालन करण्याची प्रथा आमच्या संस्कृतीत आहे. कदाचित म्हणूनच डेहराडूनसारख्या शहरात आता झाडांच्या बुंध्याभोवताल असलेले सिमेंट बांधकाम तोडण्याचा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. हे करून त्या ठिकाणी झाडांचा श्वास मोकळा करण्याचे काम केले जात आहे. मग आम्ही या मार्गाने का चालू शकत नाही. आज याची गरज ग्रामीणपेक्षा शहरी भागात अधिक आहे. काँक्रीटीकरणाच्या हव्यासात निसर्गालाच आव्हान द्यायला आम्ही निघालो आहोत. नागरिक म्हणूनही आम्ही जाणीवशून्य झालो असल्याने अशा कामांना विरोध करण्याचे धाडस दाखवत नाही. आज आमची कृती झाडांची मुळेच कमकुवत करीत नाही, तर जलपुनर्भरणाचा प्रश्नही ऐरणीवर आणत आहे. कोणत्याही शास्त्रीय आधाराशिवाय वर्षानुवर्षापासून हे पाहत आलेल्या आपल्या पूर्वजांनाही कदाचित हे आपले वागणे चुकीचे वाटत असावे. आज डेहराडूनमध्ये जर झाडांचा गुदमरणारा श्वास मोकळा करण्यासाठी पुढाकार घेतला जाऊ शकत असेल तर आम्ही मागे का राहावे? ज्याला कोणतेही तंत्रज्ञान लागत नाही, अशा गोष्टीही आम्ही करणार नसू आणि केवळ झाडांमुळे जीव गेले म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात त्यांना उभे करणार असू तर आयुष्यभर त्या झाडांकडून मिळणारा प्राणवायू घेत स्वतःचा श्वास जगविण्याचा अधिकार तरी आपला आहे का? याचा विचारही केला गेला पाहिजे. ■

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# नवरस : भावभावनांचे उत्कट प्रकटन

**प्रा. दिलीप जोशी**

खरं तर रस हा शब्द चवीशी संबंधित आहे. गोड, आंबट, तिखट, तुरट, खारट हे चवीचे विविध प्रकार आहेत. स्थूल देहात जीभ हे त्याचे ज्ञानेंद्रिय आहे. म्हणूनच जिभेचे एक नाव रसना आहे. जिभेच्या साह्याने विविध रसांचा घेतलेला आस्वाद म्हणजे रसास्वाद होय. भावभावनांचा रसास्वाद ज्याला आस्वाद्यता म्हणतात. ही आस्वाद्यता नऊ प्रकारची असते. म्हणजे भावनांचा रसास्वाद नऊ प्रकारात घेतला जातो. शास्त्रात त्याला नवरस म्हणतात.

१) शृंगार रस २) हास्य रस ३) करुण रस ४) रौद्र रस ५) वीर रस ६) भयानक रस ७) बीभत्स रस ८) अद्‌भुत रस ९) शांत रस.

या नव रसांचे अभ्यासपूर्ण उपयोजन नाट्यशास्त्र, नृत्यकला, साहित्य यातून केले गेले. भरतमुनींनी यावर विशेष अभ्यास करून जगासमोर रस आणि त्याचे प्रकार शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडले. सुरुवातीला त्यांनी आठ रसांचाच विचार मांडला.

**शृंगार हास्य करुणा रौद्र वीर भयानकाः ।**
**बीभत्साद्‌भुतं संज्ञौ चेत्यष्टौ नाट्ये रसाः स्मृताः ।।**

त्यानंतरच्या महाकवी कालिदास, कवी दंडी यांच्याही साहित्यात आठ रसांचाच वापर आहे. पुढे कालांतराने पंडित उद्‌भट यांनी नवव्या शांत रसाची यात भर झाली.

**निर्वेदस्थायिभावोऽस्ति शान्तोऽपि नवमो रसः।**

आचार्य मम्मट यांच्या 'काव्य प्रकाश' या ग्रंथातही वरील उल्लेख आहे. पुढे तर आचार्य रुद्रट यांनी प्रेयान नावाचा दहावा रस, त्यानंतरच्या पंडितांनी वत्सल रस, नंतर भक्ती रस अशी भर घातली. महाकवी भोजाने तर रसांची संख्या एकोणपन्नासपर्यंत नेली. आठ स्थायी रस, तेहत्तीस संचारी रस आणि आठ सात्त्विक रस असे एकूण एकोणपन्नास. असे असले तरी शास्त्रकारांनी रसांची आस्वाद्यता प्रमाण मानली. ती फक्त नऊ रसांत प्रकर्षाने जाणवते. म्हणून संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत नऊ रसांनाच मान्यता दिली. 'तै नवरस सुधाब्धिचा थावो लागो' असा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे. नाट्यशास्त्रानुसार विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते. ती आपण नित्य जीवनात अनुभवतो. तज्ज्ञांनी रसांचे प्रकार कितीही मांडले असू द्यात. आपण आस्वाद्यता असलेल्या नऊ रसांचा विचार करू.

**१) शृंगार रस :** नवरसांचा राजा म्हणून परिचित असलेला शृंगार रस मानवी स्वभावाचा आवडता रस आहे. सौंदर्य, प्रेम आणि आकर्षण हा या रसाचा गाभा आहे. मानवाला उत्तम कपडे, दागिने, नटूनथटून वावरणे नेहमीच आवडते. स्त्री आणि पुरुषात आकर्षण हा नैसर्गिक भाव आहे. शृंगार रस या भावाने सजलेला आहे.

**२) वीर रस :** नवरसातील वीर रसाचा गाभा म्हणजे उत्साह आहे. उत्साहातूनच पराक्रम, शौर्य, सामर्थ्य, जरासा क्रोधही प्रकट होतो. थोडक्यात उत्साहवर्धन वीर रसातून प्रकट होते. पोवाडे, वीरगीते, पराक्रम कविता या रसात येतात. अफजल खानाचा वध, महिषासुर मर्दन, कंसाचा वध ही वीर रसाची उदाहरणे आहेत. वंदे मातरम्, हर हर महादेवची ललकारी स्फुलिंग जागृत करीत असे. 'जाणता राजा' हे महानाट्य वीर रसाने भरलेले आहे.

**३) करुण रस :** नवरसातील करुण रसाचा स्थायी भाव शोक आहे. दुःखाच्या भावनिक अवस्थेतून करुण रस निर्माण होतो. हृदयद्रावक प्रसंग, दयनीय अवस्था, मृत्यू, आजारपण या रसोत्पत्तीचा भाग आहे. दया, अनुकंपा, असुरक्षा, दैन्य, निराशा, अश्रू, आक्रंदन इत्यादी बाबीतून करुण रस दिसतो.

**४) हास्यरस :** नवरसातील हास्यरस महत्त्वाचा असून आनंद हा या रसाचा गाभा आहे. व्यंग, विडंबन, चेष्टा, मस्करी, विनोद, चुटकुले यात येतात. या रसात निर्भेळ आनंद प्राप्त होतो. दुःख विसरण्याचे प्रभावी साधन म्हणजे हास्यरस होय. महाराष्ट्राची हास्य जत्रा, विनोदी नाटके, हास्य कविसंमेलने या रसाची उत्पत्तिस्थाने आहेत. पु. ल.देशपांडे यांचे कथाकथन किंवा इंदोरीकर महाराजांचे कीर्तन यातून हास्यरस निर्माण होतो.

**५) रौद्र रस :** नवरसातील रौद्र रस आपल्या नेहमी अनुभवास येणारा रस आहे. क्रोध हा या रसाचा स्थायी भाव आहे. भगवान शंकराच्या खवळलेल्या रूपाला रुद्र म्हणतात. त्यावरूनच या रसाला रौद्र रस नामाभिधान झाले. चीड, राग, डोळे लाल होणे, घाम येणे, आवाज मोठा होणे, चेहरा संतप्त होणे ही या रसाची लक्षणे आहेत. समुद्राच्या आदळणाऱ्या लाटा, पेटलेला वडवाग्नी डोळ्यासमोर आणला की रौद्र रस कळतो.

गीत रामायणातील शूर्पणखेच्या तोंडी असलेले 'सूड घे त्याचा लंकापती', भरताच्या तोंडी 'माता न तू वैरिणी' यात रौद्र रस अनुभवास येतो. तांडव नृत्य या रसाचे चपखल उदाहरण आहे.

**६) भयानक रस :** नवरसातील हा देखील महत्त्वपूर्ण रस आहे. भय, भीती हा या रसाचा गर्भित भाव आहे. असे प्रसंग आपल्या जीवनात लहानपणापासून येतात. ज्यात स्मशान कथा, भूतखेत, राक्षस, चेटकीण अशा कथा ज्यात येतात. निर्जन ठिकाणची जाणीव, रातकिड्यांचे आवाज, कुत्र्यांचे रुदन, मांजराचे आवाज या सर्वांत वाटणारी भीती भयानक असते. ऋणानुबंध नावाचे नाटक, तुंबाड नावाचा सिनेमा यात या रसाचा वापर आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची 'स्मशानातील सोनं' ही कथा वाचताना हा रस अनुभवास येतो.

**७) बीभत्स रस :** नवरसातील किळसवाणा असा हा रस. किळस, जुगुप्सा या रसाचा स्थायी भाव. बरेचदा घाणेरडी चित्रे, घाणेरडी किळसवाणी दृश्ये आपल्यासमोर येतात. ही या रसाची उदाहरणे आहेत. अळ्या पडलेले घाण पाणी, किडलेली फळे, नासलेले अन्न ही सर्व वीट आणणारी, असह्य बाबी बीभत्स रसाची उदाहरणे आहेत.

**८) अद्‌भुत रस :** नवरसातील विस्मय निर्माण करणारा हा रस. विस्मय, कुतूहल या रसाचा गर्भ आहे. आपण जेव्हा जादूचे प्रयोग पाहतो तेव्हा जे आश्चर्यकारक वाटते तो अद्‌भुत रस होय.

**विस्मयस्य सम्यक् समृद्धिः अद्‌भुतः। सर्वेंद्रियाणां ताटस्थ्यं वा ।**

आपली सर्व इंद्रिये अवाक् होतात. विस्मयाने स्तंभित होतात, तोंडात बोटे घालतात. भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला, छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटले ही अद्‌भुत रसाची उदाहरणे आहेत.

**९) शांत रस :** नव रसातील हा अंतिम रस असून आध्यात्मिक विचारांचा, भक्ती निर्माण करणारा हा रस आहे. शम किंवा शांति हा या रसाचा स्थायी भाव आहे. मंदिराच्या नीरव गाभाऱ्यात, नदीतटावर, एकांत तळ्यावर जी अनुभूती येते तो शांत रस. 'शांत हो श्रीगुरू दत्ता' हे पद ऐकताना शांत रस अनुभवास येतो. इतकेच काय जेव्हा आपण शवासन करतो तेव्हाची अनुभूती शांत रस प्रकट करतो. नवरस हा केवळ नाट्यकलेचा भाग नसून आपल्या जीवनात येणारा साक्षात्कार आहे. विविध भावनांचे प्रसंगानुरूप उत्स्फूर्त प्रकटन म्हणजे नवरस. हेच प्रकटन जेव्हा कलाकार मंचावर नाट्यरूपात जाणीवपूर्वक निर्माण करतो तेही नवरसाचे सर्जन आणि सृजन आहे. ■

९८२२२६२७३५

## 'अन्न हे पूर्णब्रह्म' एक संस्कार...

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि अन्नाची होणारी नासाडी यावर उपाय म्हणून समर्थ रामदास स्वामींनी सांगितलेली ही उक्ती 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' केवळ पोट भरणे नव्हे, तर अन्न ग्रहण करणे हे एक पवित्र यज्ञकर्म आहे. जसं यज्ञात आहुती देताना मंत्रोच्चार व पावित्र्य राखले जाते, तसेच अन्न ग्रहण करणे ही एक आधात्मिक व शारीरिक ऊर्जा निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आजच्या युगात 'स्क्रीन टाईम' वाढल्याने टीव्ही किंवा मोबाईल पाहत जेवणे, उघड्यावरील फास्ट फूड खाणे आणि जेवताना शांतता न राखणे या गोष्टींचे प्रमाण वाढलेले आहे. याचा पचनसंस्थेवर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. तेव्हा, जेवताना टीव्ही किंवा मोबाईल न बघता शांतपणे व आनंदात आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांसह जेवावे व शक्य असल्यास यजुर्वेदाच्या ११ व्या अध्यायातील ८३ वा श्लोकाचे स्मरण करावे.

**अन्नंपुतेन्नंस्य नो देह्यनमीवस्यं शुष्मिणः ।**
**प्रप्रं दातारंन्तारिषऽऊर्जन्नो थेहि द्विपदे चतुष्पदे ।।**

हे सर्व प्रकारच्या अन्नदात्या! कृपया आम्हाला सर्व प्रकारचे अन्न प्रदान करा. आम्हाला रोगमुक्त आणि पौष्टिक अन्न द्या, जे आम्हाला शक्ती देईल. हे अन्नदात्या! कृपया हे सुनिश्चित करा की सर्व जीवांना अन्न मिळावे आणि त्यांना सुख व शांती प्राप्त व्हावी. ताटात अन्न वाया घालवू नये, तसेच जितकी भूक असेल, तितकेच अन्न ताटात वाढून घ्यावे. कारण हे एक पवित्र यज्ञकर्म आहे. भूक लागल्यावरच योग्य व ताजे अन्न खाणे, हाच खरा यज्ञ आहे. एका बाजूला लाखो लोकांना उपाशी राहावे लागते, तर दुसऱ्या बाजूला लग्नकार्य व हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. तेव्हा 'अन्न हे पूर्णब्रह्म' याचाही विसर पडल्याचे जाणवते. जेवण (अन्न) हे यज्ञासारखे पवित्र आणि अग्नी म्हणजे ऊर्जा निर्माण करणारे आहे, याचा विचार सर्वांनी करणे गरजेचे आहे. तेव्हाच शरीर हे निरोगी व आनंददायी राहील. कारण मनुष्याचा स्वभाव, वृत्ती ही खाण्यावरही अवलंबून आहे. 'माणूस जसा खातो, तसा तो बनतो' काही अंशी हे खरेही असेल तरी शेवटी खाण्याचा किंवा जेवणाचा संस्कार महत्त्वाचा आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

## वाचक पत्रे

### चला पंढरीला जाऊ...

ज्येष्ठ-आषाढ महिना सुरू झाला की संपूर्ण महाराष्ट्रात वारकऱ्यांची वारीला जाण्याची लगबग सुरू होते. पंढरीची वारी हा महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील एक चमत्कार आहे. पुरुष-महिला भेदभाव विसरून, मिळून मिसळून राहत दिसून येतात. यात नाच, गाणे, फुगडी, विठ्ठलनामाचा गजर करीत वारकरी मार्गक्रमण करीत असतात. देशी-परदेशी लोकांना, अभ्यासकांना कुतूहलाचा विषय ठरणाऱ्या या वारीमध्ये फक्त वारकरी नव्हे तर उच्चशिक्षितही सहभागी होतात. आषाढी एकादशी आणि तिची वारी हे वारकऱ्यांचे व्रत आहे. 'विठ्ठलनामाचा रे टाहो' या ओळी ते जगत असतात. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक लोकजीवनाचे वैभव आहे. वारी हा संस्कार आहे. प्रेमसुखाचा अनुभव आहे. या संप्रदायाची शिकवण साधी सोपी आहे. विठ्ठलाचे फक्त नामस्मरण करावे हीच भक्ती. त्यात कुणी मोठा नाही आणि कुणी लहान नाही. त्यामुळे ही वारी केवळ धार्मिक नसून ती मानवी जीवनाला जगण्याचा एक समृद्ध दृष्टिकोन देणारी मोठी जीवनशाळा आहे. भेदभाव विसरणे, एकमेकांना माउली संबोधणे, कोणत्याही केंद्रीय नियंत्रणाशिवाय वेळेचे नियोजन करणे, कष्ट सोसणे, नकारात्मकतेवर मात, निसर्गाशी जवळीक अशा कितीतरी गोष्टींचा प्रत्यय आपल्याला प्रेक्षक म्हणून वारीत येतो. धन्य ती माउली, धन्य ते वारकरी.

**स्नेहल खंडागळे**/ नागपूर

■■■

### विद्यार्थी कमी का झाले?

देशातील एकूण ५८ अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून नुकतीच ही माहिती देण्यात आली आहे . या बंद झालेल्या महाविद्यालयांमुळे एकूण १५० हून अधिक अभ्यासक्रम सुद्धा बंद झालेले आहेत. या ५८ महाविद्यालयांपैकी तीन महाविद्यालये अनुदानित असून बाकीची खाजगी आहेत. ही महाविद्यालये प्रामुख्याने विद्यार्थ्यांची कमी संख्या, पायाभूत सुविधांची वानवा, प्राध्यापकांची कमतरता तसेच सरकारी नियमांचे पालन न करणे या कारणामुळे बंद झाल्याचे कळते. विशेष म्हणजे महाराष्ट्र व उत्तर प्रदेश या राज्यातील प्रत्येकी १२ महाविद्यालये आहेत. एका बाजूला अभियांत्रिकीकडे जाण्याचा विद्यार्थ्यांचा ओढा आयटी क्षेत्रातील संधीमुळे वाढला होता. पण एकदम विद्यार्थी कमी का झाले? हा एक अभ्यासाचा विषय होऊ शकतो. अजूनही एआय क्षेत्रात नवीन अभियंत्यांची मोठी गरज आहे. त्या क्षेत्रामुळे अभियांत्रिकी क्षेत्रात चलती आहे असे दिसते. अनेक उद्योगक्षेत्रात अभियंत्यांची कमतरता आहे ही एक बाजू आहे तर पुरेशी संख्या नसल्यामुळे अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये बंद होत आहेत याचाही विचार करणे आवश्यक आहे. ■

**शांताराम वाघ**/पुणे

महत्वाचे...



## पंढरपुरात श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती साजरी

**पंढरपूर, दि. ७ जुलै-**

शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने भारतीय जनसंघाचे संस्थापक श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी युवानेते प्रणव परिचारक यांच्या हस्ते मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दरम्यान डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून युवक नेते प्रणव परिचारक तसेच भाजपा पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा नगरसेवक सौरभ थिटे, सिकंदर ढवळे, आबासाहेब झेंड, नगरसेवक गणेश शिंदेनाईक, माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे, भाजपा पदाधिकारी बालाजी वाघमारे, मिलिंद येळे यल्लाप्पा कबाडे, मयूर भिंगे, शीलरत्न झेंडे, युवराज मुचलंबे, कृष्णा कवडे, विशाल तूपसुंदर, भाजपा महिला पदाधिकारी अपर्णा तारके, सुवर्णा कुर्नावळ, सुचिता सगर उपस्थित होत्या.

# ‘रत्नाई चषक’ राज्य बुध्दिबळ स्पर्धा रविवारी अकलूजला

प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगरचे १० जुलैपर्यंत नोंदणीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. ७ जुलै-**

प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त रविवार, १२ जुलै रोजी स.म शंकरराव मोहिते पाटील स्मृती भवन शंकरनगर-अकलूज येथे ‘रत्नाई चषक’ राज्य बुध्दिबळ स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील व स्पर्धा नियोजन प्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी दिली.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप क्रीडा मंडळाने कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात राज्य व राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ‘रत्नाई चषक’ बुद्धिबळ स्पर्धेच्या माध्यमातून देशातील ग्रामीण भागातील स्पर्धक संख्येनुसार सर्वात मोठी स्पर्धा भरविण्याची कामगिरी मंडळाने केली आहे. ही स्पर्धा १० वर्षे वयोगट, १५ वर्षे वयोगट व खुला गट अशा तीन गटांसाठी आयोजित केली आहे. वेगवेगळ्या गटासाठी वेगवेगळी परितोषिके व मेडल्स ठेवलेली आहेत. या स्पर्धेत ३० कॅश प्राईज, ६० ट्रॉफीज, ६० मेडल तसेच प्रत्येक गटात २० पेक्षा अधिक बक्षिसे ठेवलेली आहेत. गेल्या वर्षी ५०० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

ही स्पर्धा स्विझलिंग पद्धतीने खेळवली जाणार आहे. स्पर्धेच्या वेळी सकाळी ९ पर्यंत उपस्थितीची नोंद करावी यानंतर एन्ट्री केल्यास दुसऱ्या राउंडपासून खेळावे लागेल. स्पर्धेची ऑनलाईन नोंदणी १० जुलै रोजी सायं. ६ वाजेपर्यंतच https://forms.gle/3RFifKZz5Te8Nsxv9 या लिंकवर करावी.

दहा वर्षे वयोगटाकरिता राजन चिंचकर ८९८३०३७०५५, सोळा वर्षे वयोगटाकरिता जयप्रकाश जगताप ९०९६०५२१९७ व खुल्या गटासाठी रावसाहेब मगर ९१४५७८४५८७ या क्रमांकावर संपर्क करून सहभाग नोंदविण्याचे आवाहन मंडळाचे उपाध्यक्ष पोपट भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव व स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे यांनी केले आहे.

# सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धेने सोलापुरात शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात

**२१ व २२ जुलै रोजी वालचंदच्या मैदानावर रंगणार जिल्हा स्पर्धा**

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

जिल्हास्तरीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धेने सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात होणार आहेत. या स्पर्धा २१ आणि २२ जुलै रोजी येथील वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या मैदानावर होणार आहेत.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने

या स्पर्धा १५ वर्षांखालील मुले/मुली आणि १७ वर्षांखालील मुले या वयोगटासाठी होतील.

१५ वर्षांखालील गटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ किंवा त्यानंतरचा, तर १७ वर्षांखालील गटासाठी १ जानेवारी २०१० किंवा त्यानंतरचा असावा.

१५ वर्षे मुले/मुली व १७ वर्षे मुली गटाच्या स्पर्धा २१ जुलै रोजी सकाळी ९.०० वाजता, तर १७ वर्षे मुलांच्या स्पर्धा २२ जुलै रोजी सकाळी ९.०० वाजता वालचंद कॉलेज येथे सुरू होतील.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना 'सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी'च्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे.

ऑनलाईन नोंदणी व स्पर्धेची प्रवेशिका जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका, सोलापूर येथे किंवा dsosolapur1gmail.com या ई-मेलवर २० जुलै २०२६ पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. १७ वर्षांखालील खेळाडूंना वय निश्चिती चाचणी (Skeleton Maturity ge Determination Test) करणे बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी किरण दुस्तकर (मो.८७८८१९२१२४) किंवा दत्तात्रय वरकड ( मो. ७२१९१ ५५२५२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.

## १०० टक्के दंड-व्याज माफीची ‘अभय योजना’सुरू

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळेधारकांसाठी 'अभय योजना-२०२६' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत थकीत भाडे एकरकमी भरल्यास १०० टक्के दंड आणि व्याज माफ करण्यात येणार आहे. ही योजना ६ ते ३१ जुलै या कालावधीत लागू राहणार असून, सर्व पात्र गाळेधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले आहे. महापालिकेच्या मालकीचे मेजर व मिनी गाळेधारक, खुली जागाधारक, अधिकृत खोकेदार, बीओटी गाळेधारक, १५६ गाळेधारक तसेच टी.पी. ३/२३ अंतर्गत येणारे सर्व भाडेकरू या योजनेस पात्र आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी मार्च २०२६ अखेरपर्यंतची संपूर्ण थकबाकी तसेच सन २०२६-२७ च्या सहामाहीचे भाडे निर्धारित मुदतीत एकरकमी भरावे लागणार आहे. धनादेशाद्वारे रक्कम भरायची असल्यास तो २८ जुलै २०२६ पूर्वीच्या दिनांकाचा असणे आवश्यक आहे. महापौर कोंड्याल म्हणाले, १०० टक्के दंड व व्याज माफीची ही दुर्मिळ संधी असून पात्र गाळेधारकांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता तातडीने थकीत रक्कम भरून योजनेचा लाभ घ्यावा. महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते आणि संबंधित समिती अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविण्यात येत असून प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भाडे तसेच SGST व CGSTची संपूर्ण रक्कम ६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत महापालिकेच्या कार्यालयात भरल्यासच १०० टक्के दंड व व्याज माफीचा लाभ मिळेल. मुदत संपल्यानंतर कोणतीही सवलत मिळणार नसल्याने वेळेत रक्कम भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘एस शटलर बॅडमिंटन अकादमी’ची दैदिप्यमान कामगिरी

**सोलापूर जिल्हा बॅडमिंटन स्पर्धा**

**सोलापूर, दि. ७ जुलै -**

सोलापूर जिल्हा बॅडमिंटन स्पर्धा २०२६ मध्ये 'एस शटलर बॅडमिंटन अकादमी'च्या खेळाडूंनी विविध वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद आणि उपविजेतेपदावर आपले नाव कोरले आहे.



९ वर्षांखालील मुलांच्या गटात केतन हेबाळे याने साद मोहम्मदचा २१-१५, १७-२१, २१-१८ असा पराभव करत विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात ईश्वरी येलावे हिला वृधा जिंदेविरुद्ध २१-१०, २१-१२ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागल्याने तिने उपविजेतेपदावर समाधान मानले.

पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात अर्शद शेख आणि ऋषिकेश जोगळेकर या जोडीने पारस दोशी आणि अनिरुद्ध लोळगे या जोडीचा २१-१५, १७-२१, २१-१५ असा पराभव करत विजेतेपद मिळवले, तर पारस दोशी आणि अनिरुद्ध लोळगे हे उपविजेते ठरले. महिला एकेरीत अपूर्वा गांधी हिने उपविजेतेपद पटकावले; तिला अंतिम सामन्यात वेदश्रीकडून २१-१५, २१-१७ असा पराभव पत्करावा लागला. महिला दुहेरीत श्रेया मिस्किम आणि तनिष्का पाटील या जोडीला वेदश्री आणि नेहल शाह या जोडीकडून २१-१८, २६-२४ अशा चुरशीच्या लढतीत पराभव स्वीकारावा लागल्याने या जोडीने उपविजेतेपद मिळवले. आपटे ग्रुपच्या वतीने सर्व खेळाडूंना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या यशस्वी खेळाडूंचे बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष जीतू राठी, अकादमीचे संस्थापक गफूर अयुब शेख, मुख्य प्रशिक्षक अर्शद गफूर शेख, तसेच सहाय्यक प्रशिक्षक श्रीराम कुलकर्णी, सोहेल शेख, आसिफ शेख आणि अरबाज शेख यांनी अभिनंदन केले.

# गावातील न्यायपंचायतीत ढकलून देऊन महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका महिलेस न्यायपंचायतीत प्लास्टिक पाईपने मारहाण करून ढकलून दिल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथे सोमवारी सायंकाळी घडली. गुरुदेवी गुरुसिद्धप्पा स्वामी (वय ४३ वर्ष, रा.आहेरवाडी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी साडेचार वाजता गावातील न्याय पंचायतीतील काशीराया लोमटे आणि इतर एकाने मिळून पाईपने मारहाण करून ढकलून दिले . त्यामुळे त्यांना वळसंग येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून मुलगी निशिगंधा स्वामी यांनी येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी सकाळी दाखल केले.

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल एसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसतील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खालील नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट २००२**
**या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) श्रीनिवास शंकरराव येमूल (कर्जदार)<br>रा : ११९४, न्यु पाच्छा पेठ, सूर्या जिम समोर, सोलापूर ४१३००६<br>रा : आय स्क्वेअर अपार्टमेंट, न्यु पाच्छा पेठ, जुने WIT कॉलेज जवळ, सोलापूर ४१३००६<br>२) सर्वेषम शंकरराव येमूल (सहकर्जदार)<br>रा : ११९४, न्यु पाच्छा पेठ, सूर्या जिम समोर, सोलापूर ४१३००६<br>रा : आय स्क्वेअर अपार्टमेंट, न्यु पाच्छा पेठ, जुने WIT कॉलेज जवळ, सोलापूर ४१३००६<br>३) विष्णू सोमय्या रापोल (जामीनदार)<br>रा : सी-२६-१८, विणकर सोसायटी, गांधी नगर, सोलापुर ४१३००५<br>४) मेघशाम मल्लिकार्जुन येमूल (जामीनदार)<br>रा : ११५९, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००३००३२१३००००३१ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ६,५६,२८८/- (रु. सहा लाख छप्पन् हजार दोनशे अठ्याऐंशी फक्त) अधिक दि. ०१/०१/२०२६ पासून १५% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | ०२/०१/२०२६ व दि. ३०/०१/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | ०४/०७/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी.सोलापूर व सब डी. सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका शहर हद्दीतील न्यु पाच्छा येथील सिटी सर्व्हे नं. १०३९४ पैकी फायनल प्लॉट नं. ३५, व सब प्लॉट नं. ३५१ याचे एकूण क्षेत्र ३५७.७ चौ. मी. इतकी घर जागा मिळकत, या मिळकतीचे चतुःसिमा असे :- पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस-मल्लिकार्जुन कमटम यांची घरजागा, उत्तरेस-रस्ता, दक्षिणेस-लक्ष्मीपती देवसानी यांची घरजागा. |
| २ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) पुनम प्लाय प्रोपा: संतोष वसंत झोंबाडे (कर्जदार)<br>रा : मु. पो. जामगाव (आ), गट नं. ४४/१/अ, टुरिस्ट हॉटेल मागे, बार्शी, ४१३४०१<br>रा : मु. पो. बाभूळगाव, बार्शी, ४१३४०९<br>२) वसंत येदा झोंबाडे (जामीनदार)<br>रा : मु. पो. बाभूळगाव, भीम नगर, बार्शी, ४१३४०९<br>३) प्रवीण भास्कर भालेराव (जामीनदार)<br>रा : मु. पो. उपळे (दुमला), बार्शी, ४१३४०९ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१७००००२४ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ९,६२,७१७/- (रु. नऊ लाख बासष्ठ लाख सातशे सतरा फक्त) अधिक दि. ०१/०१/२०२५ पासून १५% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | ३०/०१/२०२५ रोजी व दि. १२/०२/२०२५ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | ०४/०७/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. सोलापूर व सब डी. व तालुका बार्शी पैकी मौजे जामगाव (आ), हद्दीतील गट नं. ४४/१/१ त्यापैकी बिगर शेती प्लॉट नं. २१ याचे क्षेत्रफळ ३०२.९४ चौ. मी. हि जागा व त्यावरील बांधकाम ासहित मिळकत, या मिळकतीचे चतुःसिमा असे :- पूर्वेस-६.१० मी. रुंदीचा दक्षिण उत्तर चालीचा रस्ता, पश्चिमेस-सोमनाथ तलवाड यांची जागा, उत्तरेस-प्लॉट नं. २२, दक्षिणेस-प्लॉट नं. २० |
| ३ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) राकेश रामलिंग किलचे प्रोपा: राकेश रामलिंग किलचे (कर्जदार)<br>रा : वाणी प्लॉट, कॅन्सर हॉस्पिटल जवळ, बार्शी ४१३४०१<br>रा : प्लॉट नं. ८७, मार्केट यार्ड, तुळजापूर रोड, बार्शी ४१३४०१<br>२) अशोक भवरीलाल बाफना (जामीनदार)<br>रा : १५५१, सुभाष नगर, बार्शी ४१३४०१<br>३) भीमाशंकर रंगनाथ खाडे (जामीनदार)<br>रा : २५४१, स्टेशन रोड, बार्शी ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२०२००००००७ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ४,७२,७२,२५५.८० (रु. चार कोटी बहात्तर लाख बाहत्तर हजार दोनशे पंचावन्न व ऐंशी पैसे) अधिक दि. ०१/०५/२०२५ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | ०२/०५/२०२५ रोजी व दि. ०९/०५/२०२५ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | ०४/०७/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. सोलापूर व सब डी. व तालुका बार्शी पैकी मौजे जामगाव (आ), हद्दीतील बिगर शेती मिळकत तिचा गट नं. ६२ याचे क्षेत्रफळ ०५ हे. ०० आर., आकार ०४ रु. ७५ पैसे त्यापैकी क्षेत्र ०० हे. ७७.५ आर, आकार ०० रु. ६० पैसे हि जागा व त्यावरील बांधकामासहित मिळकत, या मिळकतीचे चतुःसिमा असे :- पूर्वेस-सदर गट नंबर पैकी मुकटे यांची जमीन, पश्चिमेस-सदर गट नंबर पैकी पूनम मुकटे वगैरे यांची जमीन, उत्तरेस-गट नं. ७५ व ७६, दक्षिणेस-बार्शी लातूर बायपास रस्ता |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पूर्वग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : ०४/०७/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**



## नेताजी महाविद्यालयात अकरावी विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत नव्याने प्रवेश घेतलेल्या २४० विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आंळगे उपस्थित होते. प्रथम सरस्वती मातेच्या तसेच श्री तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. दिपक नरोणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, प्रा.राजश्री स्वामी आदींनी मनोगतातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. चंद्रशेखर पाटील, प्रा. महेश नराल, प्रा. शांतेश करजगी, प्रा. महेश कुंभार, प्रा.पिरप्पा अंबारे, प्रा. वर्षाराणी फुटाणकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा भरमशेट्टी यांनी केले तर प्रा. अमरनाथ दुस्सा यांनी आभार मानले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

**श्री. आयूब महिबूब पटेल,** वय- ६५ वर्षे, व्यवसाय- खा. नोकरी
रा. मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर. **-- अर्जदार**

**विरुद्ध**

जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी मंद्रुप
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर. **-- सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. आयूब महिबूब पटेल, हे रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील कायमचे रहिवासी असून त्यांचा मुलगा शकील आयूब पटेल यांचा जन्म दि. ०८/११/१९८१ रोजी गाव- मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर येथे राहत्या घरी झालेला आहे. तथापि सदर जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे जन्म रजिस्टरला झालेली नाही. तरी सदर जन्माची नोंद होवून तसा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) अन्वये सामनेवाला यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, कु. शकील आयूब पटेल यांचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत इकडील न्यायालयात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत सबळ पुराव्यानिशी हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती कु. शकील आयूब पटेल यांच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश कंदलगांव ग्रामपंचायतीस देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि. ०६/०७/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

**(सही)**
**(विष्णू बुटे)**
**अपर तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी मंद्रुप**
**ता.दक्षिण सोलापूर.**

## पत्नी सोबत वाद; पतीने पिले कीटकनाशक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

पत्नी सोबत वाद झाल्याने सासरी आलेल्या पतीने कीटकनाशके पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे आज मंगळवारी सकाळी आठ वाजता घडली. लक्ष्मण राम पारधी (वय ४० वर्षे रा. शिरगापूर, ता.तुळजापूर) असे त्या जावयाचे नाव आहे. तो आज सकाळी ईटकळ येथे सासरी आला होता.त्यावेळी पत्नीसोबत वाद झाल्याने त्याने सोबत आणलेले कीटकनाशक पिऊन टाकले. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात चुलता प्रभाकर पारधी यांनी दुपारी दाखल केले.

## प्रभाकर आदोने यांचे निधन



**सोलापूर, दि. ७ जुलै-**

सोलापुरातील प्रसिद्ध कापड व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार प्रभाकर व्यंकोबा आदोने ( ८३ वर्षे ) यांचे आज मंगळवारी पहाटे ४.०० वा हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांनी तोष्णीवाल नेत्रपेढीस नेत्रदान केले.त्यांच्या इच्छेनुसार त्याचा देह अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय कुंभारी येथे सुपूर्द करण्यात आला. त्यांचे पश्चात पत्नी, मुले, मुलगी बंधू, भगिनी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कोल्हापूर येथील जिल्हा न्यायाधीश विजय आदोने यांचे वडील तर सीए किशोर आदोने यांचे चुलते होत.

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४७/२०२६

**१. लता विश्वनाथ कोरे** **-- अर्जदार**
रा. मातोश्री नगर रांजणगाव ता गंगापूर जि. छ. संभाजीनगर
(असल्यास, तर्फे वकील श्रीकांत मधुकर पाटील)

**विरुद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा **-- गैरअर्जदार**
मुख्याधिकारी न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. मातोश्री नगर रांजणगाव ता गंगापूर जि. छ. संभाजीनगर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १६ जानेवारी १९८१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १६ जानेवारी १९८१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ.आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**

Classifieds

**पाहिजेत**

**पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन ऑफलाइन काम करून अधिक इन्कम मिळवा संधी सर्वांसाठी**
**संपर्क:**
**समाधान सर ९७६३२६४११५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



# स्पेनकडून पोर्तुगालचा 1-0 ने पराभव

## स्पेन उपांत्यपूर्व फेरीत, क्रिस्टियानो रोनाल्डोचे स्वप्न भंगले, पोर्तुगाल स्पर्धेबाहेर

**अर्लिंग्टन, ७ जुलै**

महान खेळाडू क्रिस्टियानो रोनाल्डोचे फिफा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंगले आहे. डॅलस स्टेडियमवर झालेल्या १६ संघांच्या फेरीतील सामन्यात पोर्तुगाल संघ स्पेनकडून पराभूत झाला. स्पेनने हा सामना १-० ने जिंकला. या विजयामुळे स्पेन संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला, तर पोर्तुगालचा प्रवास संपला.

सामन्यातील स्पेनचा एकमेव गोल मिकेल मेरिनोने केला. हा गोल अतिरिक्त वेळेत (९०+१ मिनिट) झाला. मेरिनो बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला होता. फेरान टोरेसकडून पास मिळाल्यावर, मेरिनोने गोलरक्षक दिएगो कोस्टाच्या उजव्या बाजूने चेंडू गोलपोस्टमध्ये टाकला. हा गोल स्पेनला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवण्यासाठी पुरेसा होता. या फिफा विश्वचषकात अद्याप कोणत्याही संघाने स्पेनविरुद्ध गोल केलेला नाही.



चेंडूवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करताना खेळाडू

**१६ वर्षांनंतर स्पेन उपांत्यपूर्व फेरीत**

स्पेन हा २०१० च्या फिफा विश्वचषक विजेता आहे. मागील तीन स्पर्धांमध्ये संघाला उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात अपयश आले होते. विजेता बनल्यानंतर सोळा वर्षांनी स्पेनने फिफा विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना शुक्रवारी होणार आहे. कॅलिफोर्नियातील इंग्लेवुड येथे होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात स्पेनचा सामना बेल्जियमशी होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

**रोनाल्डोचा अखेरचा सामना**

**४१ वर्षीय ख्रिस्टियानो रोनाल्डोचा हा शेवटचा विश्वचषक असल्याचे मानले जात आहे. या स्पर्धेत तो अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरला. रोनाल्डोने पोर्तुगालसाठी पाच सामन्यांमध्ये तीन गोल केले. यापैकी दोन गोल उझबेकिस्तानविरुद्ध होते, जो संघ प्रथमच या स्पर्धेत खेळत होता. त्याने क्रोएशियाविरुद्धच्या राऊंड ऑफ ३२ च्या सामन्यात पेनल्टीवर एक गोल केला.**

# बेल्जियमचा अमेरिकेवर ४-१ ने विजय

## उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**सिएटल, ७ जुलै**

बेल्जियमने फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ १६ मध्ये दमदार कामगिरी करत सह-यजमान अमेरिकेला ४-१ ने हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिएटल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात 'रेड डेव्हिल्स'ने सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व गाजवले आणि यजमानांना पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. या विजयामुळे बेल्जियम आता उपांत्यपूर्व फेरीत स्पेनचा सामना करेल.

**बेल्जियमचे सुरुवातीपासूनच वर्चस्व**

बेल्जियमने सामन्याची सुरुवात आक्रमकपणे केली, नवव्या मिनिटाला चार्ल्स डी केटेलेअरने गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. ३१ व्या मिनिटाला मलिक टिलमनच्या दिशा बदललेल्या गोलमुळे अमेरिकेने १-१ अशी बरोबरी साधली, पण हा आनंद क्षणिक ठरला. अवघ्या दोन मिनिटांनंतर, डी केटेलेअरने आपला दुसरा गोल करून बेल्जियमला पुन्हा आघाडी मिळवून दिली.



**दुसऱ्या हाफमध्ये बेल्जियमने सामना जिंकला**

बेल्जियमने दुसऱ्या हाफमध्येही आपले वर्चस्व कायम ठेवले. ५७ व्या मिनिटाला हॅन्स व्हॅनाकेनने केलेल्या तिसऱ्या गोलने अमेरिकेच्या पुनरागमनाच्या आशा जवळजवळ संपुष्टात आणल्या. त्यानंतर रोमेलू लुकाकूने इंज्युरी टाईममध्ये (९०+३) चौथा गोल करून बेल्जियमचा ४-१ असा प्रभावी विजय निश्चित केला.

बेल्जियमने संपूर्ण सामन्यात संयमी आणि आत्मविश्वासपूर्ण कामगिरी दाखवली. दुसरीकडे, अमेरिकेला बरोबरी साधूनही आपला खेळ जमवता आला नाही आणि ते सतत दबावाखाली दिसत होते. ◂(वृत्तसंस्था)

# पोर्तुगालच्या पराभवानंतर रॉबर्टो मार्टिनेझ यांचा राजीनामा

**डॅलस, ७ जुलै**



फिफा विश्वचषक २०२६ मधील पोर्तुगालच्या मोहिमेच्या अखेरीस संघात मोठा बदल झाला. १६ संघांच्या फेरीत स्पेनविरुद्ध ०-१ ने पराभव झाल्यानंतर मुख्य प्रशिक्षक रॉबर्टो मार्टिनेझ यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. डॅलस स्टेडियमवर मिकेल मेरिनोने सामन्याच्या अतिरिक्त वेळेत केलेल्या गोलने पोर्तुगालच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्याच्या आशा धुळीस मिळवल्या. पराभवानंतर, मार्टिनेझ यांनी आपल्या खेळाडूंचे कौतुक केले आणि कबूल केले की त्यांच्या संघाने सामना अतिरिक्त वेळेत नेण्यास पात्र होते, परंतु नशीब त्यांच्या बाजूने नव्हते.

स्पेनकडून झालेल्या पराभवानंतर रॉबर्टो मार्टिनेझ यांनी पोर्तुगालच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. सामन्यानंतर ते म्हणाले, पोर्तुगालच्या लोकांना या संघाचा आणि या खेळाडूंचा अभिमान वाटला पाहिजे. आमचा एक शॉट क्रॉसबारला लागला. मला वाटते की आम्ही हा सामना अतिरिक्त वेळेत नेण्यास पात्र होतो. आम्ही उत्कृष्ट बचाव केला आणि विश्वचषक जिंकण्याच्या प्रबळ दावेदारांविरुद्ध एक चुरशीचा सामना खेळलो. कदाचित आमच्या नशिबाची थोडी साथ नव्हती.

**अतिरिक्त वेळेत पोर्तुगालचे स्वप्न भंगले**

सामन्याचा पहिला अर्धा भाग खूपच रोमांचक होता, पण दोन्ही संघांना गोल करता आला नाही. स्पेनच्या मिकेलला आघाडी घेण्याची एक उत्तम संधी मिळाली होती, पण त्याचा प्रयत्न चुकला. ॲलेक्स बाएनाचा उत्कृष्ट शॉट पोर्तुगालचा गोलरक्षक डियोगो कोस्टाने अप्रतिमरीत्या वाचवला आणि त्याचे कॉर्नरमध्ये रूपांतर केले.

दुसरीकडे, ख्रिस्तियानो रोनाल्डोनेही स्पॅनिश बचावावर अनेक वेळा दबाव आणला. नुनो मेंडेसचा दिशा बदललेला शॉट क्रॉसबारला लागल्याने पोर्तुगाल गोल करण्याच्या सर्वात जवळ पोहोचला होता. दुसऱ्या अर्ध्या भागात दोन्ही संघ सावधपणे खेळले आणि सामना अतिरिक्त वेळेकडे जात असल्याचे दिसत होते. ◂(वृत्तसंस्था)

# अद्याप निवृत्तीचा विचार नाही : रोनाल्डो

**डॅलस, ७ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ १६ मध्ये स्पेनकडून झालेल्या पराभवाने पोर्तुगाल स्पर्धेबाहेर गेला. या पराभवाने लाखो फुटबॉल चाहत्यांना निराश केले, पण सर्वाधिक चर्चेत असलेला खेळाडू होता ख्रिस्टियानो रोनाल्डो. या ४१ वर्षीय स्टार फुटबॉलपटूने हा आपला शेवटचा विश्वचषक असेल हे आधीच स्पष्ट केले होते. तथापि, स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर त्याने स्पष्ट केले की, मी अद्याप फुटबॉलमधून निवृत्तीचा विचार केला नाही आणि कोणताही घाईचा निर्णय घेणार नाही.स्पेनकडून झालेल्या पराभवानंतर रोनाल्डो भावुक झालेला दिसला. तो म्हणाला, अशा प्रकारे विश्वचषकातून बाहेर पडणे दुःखदायक आहे. मी माझे सर्वस्व दिले. मी माझा सर्वोत्तम प्रयत्न केला आणि मी कोणतीही कसर सोडली नाही याचे मला पूर्ण समाधान आहे. होय, हा माझा शेवटचा विश्वचषक होता, पण आता मला आत्मचिंतन करण्यासाठी आणि माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी वेळ मिळेल. मी कोणताही घाईचा निर्णय घेणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

**मी येण्यापूर्वी पोर्तुगालने एकही विजेतेपद जिंकले नव्हते**

**आपल्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीची आठवण करून देताना, रोनाल्डोने पोर्तुगालसाठी मिळवलेल्या यशांचाही उल्लेख केला. तो म्हणाला, मी पोर्तुगालसाठी तीन मोठे विजेतेपद जिंकले आहेत. रोनाल्डोच्या आधी पोर्तुगालने एकही विजेतेपद जिंकले नव्हते. राष्ट्रीय संघाचे सर्वांत मोठे विजेतेपद म्हणजे २०१६ ची युरोपियन चॅम्पियनशिप, आणि माझ्यासाठी विश्वचषक जिंकण्याइतकेच हे एक मोठे यश आहे. रोनाल्डोच्या नेतृत्वाखाली पोर्तुगालने २०१६ ची युरोपियन चॅम्पियनशिप जिंकली. इतकेच नाही, तर संघाने २०१९ आणि २०२५ मध्ये युएफा नेशन्स लीगचे विजेतेपदही पटकावले.**



# इराण, बेल्जियमची पराभूत अमेरिकेवर टीका

## समाज माध्यमावरही आरोप-प्रत्यारोप

**न्यू यॉर्क, ७ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ १६ मध्ये बेल्जियमकडून अमेरिकेचा ४-१ असा पराभव झाल्यानंतर, मैदानाबाहेरही वाद तीव्र झाला आहे. अमेरिकन संघ स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर, इराण आणि बेल्जियम या दोन्ही देशांनी विविध मार्गांनी अमेरिका, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि फिफावर निशाणा साधला. अमेरिकन संघाला सोशल मीडियावरही जोरदार टीकेला सामोरे जावे लागले, अनेक चाहत्यांनी आपल्याच संघाची कामगिरी लाजिरवाणी असल्याचे म्हटले.

हा वाद तेव्हा सुरू झाला, जेव्हा फिफाने अमेरिकेचा स्ट्रायकर फोलारिन बालोगुनवरील एका सामन्याची आपोआप लागू होणारी बंदी उठवली. बोस्निया आणि हर्झेगोविनाविरुद्ध रेड कार्ड मिळाल्यामुळे त्याला पुढचा सामना खेळता येणार नव्हता, तरीही त्याला बेल्जियमविरुद्ध खेळण्याची परवानगी देण्यात आली. वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या प्रकरणी फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांच्याशी चर्चा केली. यानंतर, अनेक देशांनी आणि फुटबॉलतज्ज्ञांनी या निर्णयाला राजकीय हस्तक्षेपाशी जोडून त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

अमेरिकेच्या पराभवानंतर, इराणी फुटबॉल फेडरेशनच्या प्रवक्ता म्हणाला, आता संपूर्ण जग फुटबॉलच्या हातून राजकारणाच्या झालेल्या मानहानीकारक पराभवाचा उत्सव साजरा करत आहे. स्पर्धेदरम्यान मिळालेल्या वागणुकीबद्दल इराणने यापूर्वीच नाराजी व्यक्त केली होती. मुख्य प्रशिक्षक अमीर घालेनोई यांनी आपल्या संघाला विश्वचषकातील 'सर्वाधिक त्रासलेला संघ' असे संबोधले.

**बेल्जियमचाही ट्रम्प आणि फिफावर हल्ला**

अमेरिकेला हरवल्यानंतर बेल्जियमनेही जशास तसे उत्तर दिले. अतिरिक्त वेळेत रोमेलू लुकाकूने गोल केल्यानंतर, अनेक बेल्जियन खेळाडूंनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रसिद्ध नृत्यशैलीची नक्कल करून आनंद साजरा केला. ◂(वृत्तसंस्था)

# राष्ट्रकुल स्पर्धेतील भारतीय पथकाला निरोप

**नवी दिल्ली, ७ जुलै**

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) मंगळवारी, २३ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान ग्लासगो येथे होणाऱ्या २०२६ च्या राष्ट्रकुल खेळांसाठी रवाना होणाऱ्या भारतीय पथकाला निरोप दिला. याप्रसंगी टीम इंडियाच्या अधिकृत समारंभीय आणि स्पर्धा किटचे अनावरणही करण्यात आले.

या सोहळ्याला केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा डॉ. पी. टी. उषा, भारतातील ब्रिटिश उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह, क्रीडा विभागाचे सचिव हरी रंजन राव, संघप्रमुख रोहित राजपाल, उपसंघप्रमुख रवी बेंगानी, खेळाडू, प्रशिक्षक आणि विविध कॉर्पोरेट भागीदार उपस्थित होते.

केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया म्हणाले, आपले खेळाडू नव्या भारताची क्रीडा उत्कृष्टता, दृढनिश्चय आणि आकांक्षा यांचे प्रतीक आहेत. मी ग्लासगोला जाणाऱ्या भारतीय संघाच्या प्रत्येक खेळाडूला निर्भयपणे खेळण्याचे, खिलाडूवृत्तीचा सर्वोच्च आदर्श निर्माण करण्याचे आणि आपले सर्वोत्तम देण्याचे आवाहन करतो. भारत सरकार प्रत्येक खेळाडूच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे आणि देशाला गौरव मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यास कटिबद्ध आहे.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा डॉ. पी. टी. उषा म्हणाल्या, आज भारतीय क्रीडा इतिहासातील एका नव्या गौरवशाली अध्यायाची सुरुवात होत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# वैभवी त्रिवेदी, नरेंद्रसिंग चौधरी यांना तिहेरी मुकुट

## वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, ७ जुलै -**

वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत वैभवी त्रिवेदी, नरेंद्र सिंग चौधरी यांनी तीनही गटात विजेतेपद पटकावत तिहेरी मुकुट संपादन केला.

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ३० वर्षांवरील महिला एकेरीत अंतिम लढतीत वैभवी त्रिवेदी हिने नेहा भंडारीचा ६-०, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. दुहेरीत महिला गटात वैभवी त्रिवेदी व संध्याराणी बंडगर यांनी नेहा भंडारी व शैलेजा कुमार यांचा ६-२, ६-० असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मिश्र दुहेरीत अंतिम लढतीत वैभवी त्रिवेदीने मिशाल जावियाच्या साथीत आशा कार्तिकेयन व मनवीर रंधावा यांचा ६-३, ६-७ (३), १३-११ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.





**सोलापूर : मिश्र दुहेरीतील उपविजेते राजीव देसाई व संध्याराणी बंडगर हे जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक शंकर कांबळे यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना.**





**तिहेरीची मानकरी वैभवी त्रिवेदी**

**आजचे निकाल:**

**५५ वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी:** तुलेश्वर सिंग थोंगबम२(भारत) वि.वि.जयप्रकाश निषाद ३ (भारत)६-३, ६-१; सुधीर गोठे १ (भारत) वि.वि. आशिष मालपाणी ४ (भारत)६-१, ६-३.

**६० वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी:** नागराज रेवणसिद्धियाह१(भारत) वि.वि.रवीदीप सिंग साही ४(भारत) ६-१, ६-१; राज दत्त३(भारत)वि.वि.संजय कुमार२(भारत)६-२, ५-४ सामना सोडला.

**६५ वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी:** मेहेरप्रकाश कोडुरी४(भारत) वि.वि.अजित भारद्वाज१(भारत)७-६(३), ६-२; प्रमोद दिक्षित३(भारत) वि.वि.ओंकार दिक्षित२(भारत) ६-२, ३-६, १०-६.

**७० वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी:** मूर्तथी सुरेश ३(भारत)६-१, ६-२; एकनाथ किणीकर(भारत) वि.वि. रत्नाकरराव अन्नी४(भारत)६-२, ७-५.

**७५ वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी:** गंगाधरण(भारत)वि.वि.अजित पेंढारकर१(भारत)७-५, ६-१; गोविंद कुमार (भारत) वि.वि.धवल पटेल२(भारत)३-६, ६-२, १०-७.

**४० वर्षांवरील मिश्र दुहेरी:** शितल गोरुले/नरेंद्र सिंग चौधरी१(भारत) वि.वि.संध्याराणी बंडगर/राजीव देसाई२(भारत)६-३, ६-०.





# राष्ट्रपतींच्या हस्ते ड्युरंड कप २०२६ च्या ट्रॉफींचे अनावरण

**नवी दिल्ली, ७ जुलै**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी ड्युरंड कप २०२६ च्या चषकांचे अनावरण केले. हा सोहळा नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्र (आरबीसीसी) येथे आयोजित करण्यात आला होता. नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि नौदल प्रमुख यांनी संयुक्तपणे ड्युरंड चषकांचे अनावरण केले.

चषकांच्या अनावरणाने ड्युरंड कप २०२६ ट्रॉफी दौऱ्याची अधिकृत सुरुवातही झाली. हा ट्रॉफी दौरा स्पर्धेच्या ट्रॉफींना देशभरातील फुटबॉल चाहत्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी विविध ठिकाणी घेऊन जाईल. ड्युरंड कप भारतातील सर्वांत प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक फुटबॉल स्पर्धांपैकी एक मानला जातो. राष्ट्रपती भवनात चषकांचे अनावरण या प्रतिष्ठित स्पर्धेच्या तयारीची औपचारिक सुरुवात दर्शवते. ◂(वृत्तसंस्था)

# अफगाणिस्तानचा गोलंदाज शापूर झद्रानचे निधन

**नवी दिल्ली, ७ जुलै**

अफगाणिस्तानचा वेगवान गोलंदाज शापूर झद्रान याचे वयाच्या ३८ व्या वर्षी निधन झाले. तो एका दुर्धर आजाराने ग्रस्त होता. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने (एसीबी) मंगळवारी त्यांच्या निधनाची घोषणा केली. त्याने २००९ ते २०२० दरम्यान अफगाणिस्तानसाठी ४४ एकदिवसीय आणि ३६ टी-२० सामने खेळले.

एसीबीने लिहिले, अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड अफगाणिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शापूर झद्रानच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत आहे. गोलंदाज झद्रान अफगाणिस्तानच्या अनेक संस्मरणीय विजयांचा भाग होते, असे एसीबीने म्हटले आहे. शापूर झद्रान हा अफगाण क्रिकेटच्या संस्थापकांपैकी एक होता. त्याचे समर्पण, आवड आणि अढळ वचनबद्धतेने आपल्या देशातील या खेळाच्या वाढीमध्ये आणि विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, असे एसीबीने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयात बोटॅनिकल गार्डनचा शुभारंभ

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथे १ ते ७ जुलै दरम्यान वन महोत्सवानिमित्त कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, बोरामणी येथे महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या वनस्पती उद्यान संकुलाचे उद्घाटन आज सोलापूर जिल्हा परिषद बोरामणी गटाचे सदस्य तथा अभियंता नेताजी खंडागळे यांच्या हस्ते व संस्थेच्या सचिवा संगिता शहा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी महाविद्यालय परिसरात बोटॅनिकल गार्डन, नक्षत्र उद्यान आणि औषधी वनस्पती उद्यान या संकल्पनेवर आधारित विकसित करण्यात आलेल्या उद्यान संकुलाची माहिती उपस्थितांना देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे तसेच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. गोपाळ चव्हाण, प्रा. तृप्ती व्हनमाने यांनी विशेष परिश्रम घेतले.



## सांगोला पोलिस ठाण्यात ज्येष्ठ नागरिकांची बैठक

**सांगोला, दि. ७ जुलै-**

सांगोला पोलीस ठाण्यात ज्येष्ठ नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, उपनिरीक्षक भारत वाघे यांनी ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे याविषयी मार्गदर्शन करत अडचणीच्या वेळी पोलीस तुमच्या मदतीसाठी सदैव तत्पर असेल व त्यासाठी त्यांनी संपर्क नंबर ११२ दिला. याप्रसंगी सुभाष लऊळकर, वसंतराव दिघे, सिद्धेश्वर झाडबुके, विलास नलवडे, प्रभाकर कसबे, अरविंद डोंबे यांनी सूचना मांडल्या. भारत वाघे यांनी सूचनांचे अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे मान्य केले. याप्रसंगी डॉ. अनिल कांबळे, प्रा. अविनाश सांगोलकर, अर्जुन हजारे, विष्णू चव्हाण, नानासाहेब पाटील उपस्थित होते. सदर बैठक यशस्वी करण्यासाठी पोकॉ. अमोल वाडकर यांनी परिश्रम घेतले. आभार वसंतराव दिघे यांनी मानले.



## प्रभाग क्रमांक ६ मधील टेळे नगरात विकासकामांचा शुभारंभ

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

प्रभाग क्रमांक ६ मधील टेळे नगर परिसरात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा समस्येच्या निराकरणासाठी चार इंची नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ सोमवारी सायंकाळी उत्साहात पार पडला. निवडणुकीपूर्वी दिलेले आश्वासन अवघ्या तीन महिन्यांत पूर्ण केल्याबद्दल नगरसेवक गणेश वानकर यांचे नागरिकांनी आभार मानत समाधान व्यक्त केले टिळे नगर परिसरात अनेक वर्षांपासून अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी महापालिका निवडणुकीपूर्वी नगरसेवक गणेश वानकर यांची भेट घेतली होती. त्यावेळी निवडणुका होताच तुमचा पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवू, असे आश्वासन त्यांनी दिले होते. त्याच आश्वासनाची पूर्तता करत आता चार इंची नवीन पाइपलाइन टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. विकासकामाचा शुभारंभ नगरसेवक गणेश वानकर, नगरसेविका सोनाली गायकवाड, नगरसेविका मृण्मयी गवळी, महादेव गवळी, अर्जुन गायकवाड, अरुण जाधव, दिलीप वाघमारे, आण्णा खंडागळे, ज्योती माने, अक्षय धायगुडे तसेच टेळे नगरमधील नागरिकांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. यावेळी महेश शेलार, अनंत दांडगे, अल्ताफ तांबोळी, सचिन अपराध, अमित अवताडे, अक्षय खंडागळे, सुभाष काळे, सविता होळकर, मंगल वाघमारे उपस्थित होते.

## कुमठ्यात गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका ५३ वर्षीय इसमाने छताच्या पंख्याला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुमठे गाव येथे सोमवारी रात्री पावणे अकरा वाजता उघडकीस आली. सुरेश बुचप्पा बिंदगे (वय ५३ वर्ष, रा १६८ मड्डी वस्ती, कुमठे गाव सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी संध्याकाळी सुरेश यांच्या घरचे लोक बाहेर जाऊन रात्री पावणे अकरा वाजता घरी परतले. घरचा दरवाजा उघडा होता. ते आत गेले असता सुरेश यांनी छताच्या पंख्याला गळफास घेतला असल्याचे त्यांचे निदर्शनास पडले. नातेवाईकांच्या सहाय्याने त्यांनी गळफास सोडवून सुरेशला खाली उतरविले. दरम्यान की खबर समजताच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे हवालदार जी.एस. मणूरे यांनी घटनास्थळी पोहोचून सुरेश यांना येथील शासकीय रुग्णालय बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयत सुरेश हे मजुरीचे काम करायचे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

---

### म्हेत्रे विरुध्द कल्याणशेट्टी वाद शिगेला

# स्मारक हटवून गणपती मंदिर उभारणे बेकायदेशीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील कै. सातलिंगप्पा म्हेत्रे स्मारकासाठी झालेला ठराव बेकायदेशीरपणे बदलून त्याच ठिकाणी गणपती मंदिर उभारण्यात येत आहे. हे काम आवश्यक शासकीय परवानग्यांशिवाय आणि पोलीस संरक्षणात करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत याप्रकरणी संबंधित सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी अन्यथा मोर्चा, उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

**दुधनी बाजार समिती प्रकरणावर शिवसेनेचे नेते माजी मंत्री म्हेत्रे यांचा हल्लाबोल**



शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. या प्रकरणात बाजार समितीचे पदाधिकारी, संबंधित अधिकारी, तसेच बेकायदेशीर कृत्यात सहभागी झालेल्या सर्वांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. २०२० मध्ये बाजार समितीवर सत्ता असताना कै. सातलिंगप्पा म्हेत्रे स्मारकासाठी ठराव करून चबुतरा उभारण्यात आला होता. मात्र, सत्तांतरानंतर नव्या संचालक मंडळाने तो ठराव बदलून त्याच जागी गणपती मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला. गणपती मंदिराला विरोध नसून ते दुसऱ्या जागी उभारावे, अशी भूमिका आम्ही घेतली होती. मात्र, द्वेषातून स्मारकाचा चबुतरा हटविण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा आरोप त्यांनी केला.

याप्रकरणी तक्रारीनंतर पोलीस व संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम होऊ देणार नसल्याचे आश्वासन दिले होते. तसेच बाजार समित्यांचे उपनिबंधक यांनी लेखी आदेश देऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणतेही बांधकाम किंवा मूर्तीस्थापना करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही दोन दिवसांत मोठ्या पोलीस बंदोबस्तात गणेशमूर्तीची स्थापना करून पूजा करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. पोलीस प्रशासनानेच नियमांचे उल्लंघन होऊ दिल्याचा आरोप करत संबंधित आमदार सचिन कल्याणशेट्टी, बाजार समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संचालक तसेच संरक्षण देणारे पोलीस अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही कारवाईची मागणी करण्यात आली. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेपेक्षा कोणीही मोठा नाही, असे सांगत या प्रकरणी न्याय न मिळाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिला. शिष्टमंडळासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरण मांडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला महेश साठे, अमर पाटील, आनंद तानवडे, प्रथमेश म्हेत्रे , रविना राठोड, सिद्धार्थ गायकवाड, इरण्णा दसाडे, शिवानंद पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी , गणेश मोरे, विनीत पाटील, प्रियंका परांडे उपस्थित होते.

## नीलम नगर येथे हाणामारी; चौघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

शेतीच्या वादातून नीलम नगर भागात जमादार कुटुंबीयात सत्तूर व कोयत्याने एकमेकांना हाणामारी झाल्याने महिलेसह चार जण जखमी झाल्याची घटना आज मंगळवारी दुपारी तीन वाजता घडली.

पहिल्या गटातील निखिल विजय जमादार (वय २२ वर्षे), विजय महादेव जमादार (वय ४८ वर्ष ) आणि राणी विजय जमादार (वय ४३ वर्ष, तिघे राहणार नीलम नगर, एमआयडीसी सोलापूर) दुसऱ्या गटातील अनिकेत शिवाजी जमादार (वय १९ वर्ष रा. सदर) अशी जखमींची नावे आहेत.

शेतीच्या कारणावरून वरील दोन्ही गटात आज दुपारी सत्तुर व कोयत्याने हाणामारी झाली. त्यात वरील सर्वजण जखमी झाल्याने त्या सर्वांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.



## १६ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा शाळा भेटीचा अविस्मरणीय सोहळा

### आशा मराठी विद्यालयात गुरुजनांचा सन्मान, आठवणींना उजाळा आणि आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

२०१० च्या दहावी बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला. तब्बल १६ वर्षांनंतर एमआयडीसी येथील आशा मराठी विद्यालयाच्या प्रांगणात पाऊल ठेवताच प्रत्येकाच्या मनात बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, राष्ट्रगीत आणि परिपाठाने झाली. संस्थेच्या संस्थापक स्व. पठाण मॅडम, स्व. पठाण सर तसेच दिवंगत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दीपप्रज्वलन संस्थाध्यक्ष असिफ पठाण, आशा मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका तस्लिमबानो पठाण, श्री धर्मण्णा सादूल प्रशालेच्या मुख्याध्यापिका अफरीन सय्यद यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सूत्रसंचालन माजी वर्गशिक्षक रामचंद्र गायकवाड यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा रोपभेट देऊन सन्मान करण्यात आला. यात हसीना शेख, नाहीद बिजली, राम गायकवाड, शिवानंद हिरेमठ, गंगाधर स्वामी, वीरभद्र यादवाड, लिंगय्या मेळकुंदे, राज अहमद शेख, शांतय्या कापसे, अमसिध्द सोनकंटले, जवळकोटे सर, असिफ बडेघर, गजानन पैलवान, श्रीगणेश सातपूते, पुष्पावती बबलादे, तबसूम सय्यद, तैसिन सय्यद, शोभा मुळे, संतोष सोड्डे, संतोष धारेराव, चंद्रकांत शिरगापूरे, महानंदा व्हसाळे, रेहाना मकानदार, सौरभ भांड, मिसबा जमादार, मुजावर, अमीर पठाण, प्रफुल्ल बुगडे, जाधव मॅडम, मोहिनी भावे, वळसंगे तसेच शिक्षकेतर कर्मचारी वसिम शेख, दिलीप हळके, शिवाजी कुसेकर, एजाज जमादार, राजू कोळी, सिध्दू निंबाळ आदींचा समावेश होता.

गुरुजनांच्या मनोगताने वातावरण भावनिक झाले. झांबरे यांच्या आठवणींनी सर्वांना भारावून टाकले तर आर. बी. शेख सरांच्या शायरीने जुन्या दिवसांना उजाळा दिला. पहिल्या सत्राचा समारोप पूजा बिटला (पोगुल) यांनी आभारप्रदर्शन करून केला. दुसऱ्या सत्रात अरुंधती शेटे यांनी सूत्रसंचालन केले तर पूजा आकेन यांनी आभार मानले.

## सहकार क्षेत्र चालवणे एक अग्निदिव्य : डॉ. माने



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

हिरज सहकार क्षेत्रात विश्वासार्हतेलाच सर्वाधिक महत्त्व असून सर्वसामान्य नागरिकांना सावकारीच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी सहकारी पतसंस्था आर्थिक आधारवड ठरत आहेत. आर्थिक व्यवहारांसोबत सामाजिक बांधिलकीही जपणारी हिरज येथील श्री छत्रपती शिवाजी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था ही सोलापूर जिल्ह्यातील आदर्श संस्था म्हणून नावारूपाला आल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी केले.

सहकार सप्ताहानिमित्त पतसंस्थेच्या यशोगाथा प्रकाशन व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ९यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विष्णू नागटिळक होते. यावेळी उपाध्यक्ष दत्तात्रय निकम, विष्णू वाघमारे, संभाजी गावडे, हरीदास चोपडे, अनंत पाटील, बापू खांडेकर, पोपट बसवंती, जहीर पटेल, रामा साबळे, माजी सरपंच प्रशांत साबळे, मिनाज पटेल, संस्थेचे सचिव पोपट गावडे उपस्थित होते.

यावेळी पतसंस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# वैद्यकीय शिक्षण, समाज आणि क्रीडा क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : डॉ. विलास हरपाळे

वैद्यकीय सेवा, सामाजिक बांधिलकी आणि क्रीडा क्षेत्रातील अविरत योगदान या त्रिवेणी संगमातून समाजाला नवी दिशा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. विलास शामराव हरपाळे. आज वयाची ७५ वर्षे पूर्ण करून अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत असलेल्या या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचा प्रवास नव्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

जन्मभूमी विदर्भ, तरुणपणात मराठवाड्यातील जालना, संभाजीनगर, बीड, लातूर या ठिकाणी कार्यरत राहिले आणि २००० पासून सोलापूरच्या भूमीत अनेक सामाजिक कार्यासह पौरवी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कार्याचा वटवृक्ष त्यांनी उभा केलेला आहे.

खामगाव जिल्ह्यातील धोत्रानाईक ही डॉ.हरपाळे यांची जन्मभूमी. परंतु खामगाव येथे माध्यमिक व वैद्यकीय शिक्षण झाले. येथेच त्यांच्या व्यक्तिमत्वाला वेगवेगळे पैलू पडले. आमदार-खासदार राहिलेले, महाराष्ट्र राज्याचे मंत्रीपद भूषविलेले स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्यासारखे जिवलग मित्र त्यांना मिळाले. त्यामुळेच त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जवळून संबंध आला. वैद्यकीय शिक्षण घेताना अ. भा. विद्यार्थी परिषदेचे काम झपाटल्यासारखे केले. विद्यार्थी दशेत संघाचे संस्कार झाल्यामुळे कोणत्याही क्षेत्रात पूर्णपणे झोकून देऊन व प्रामाणिकपणे व तळमळीने कार्य करण्याचा मूलतः स्वभाव असल्याने त्यांनी विविध क्षेत्रात कार्य उभे केले. एक आठवण त्यांनी सांगितली. डीएचबी हे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदवीधर मतदारसंघातील तत्कालीन उमेदवार गंगाधर फडणवीस यांची खामगाव येथे तेथील संघचालक यांच्या घरी ओळख झाली. तेव्हा पदवीधर तरुणांचे फार्म भरून घेण्यात येत होते. परंतु या निवडणुकीची पद्धत व याबाबत आम्हाला काहीच माहिती नव्हती. मी ओळखीच्या काही पदवीधरांचे फार्म भरले. निवडणुकानंतर विजयी झालेले गंगाधर फडणवीस पुन्हा खामगावला आल्यानंतर भेटले. ते म्हणाले, तू फार्म भरलेल्या मतदारांचे आपणाला मत पडले नाही. तेव्हा कामाची पद्धत कशी असते हे लक्षात आले आणि पुढील काळात काम करताना खूप फायदा झाला. आयुष्यात पहिल्यांदा आमदारांसोबत बोलण्याची, कार्य करण्याची संधी गंगाधर फडणवीस यांच्यासोबत मिळाली. पुढे सोयगाव येथे वैद्यकीय प्रॅक्टिस करताना व राजकीय काम करताना याचा फायदा झाला. रावसाहेब दानवे, शरदभाऊ कुलकर्णी, पांडुरंग दानवे, गोपीनाथ मुंडे, हरिभाऊ बागडे यांच्यासोबत काम करता आले. त्यावेळी जनसंघ व पुढे भारतीय जनता पक्षाच्या संभाजीनगर जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले.



सोलापूर येथे शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे कार्य करीत असलेल्या अंबादास बारसकर यांची मुलगी विद्या बारसकर हिच्याशी विवाहबद्ध झाला. ती सोलापूर येथे खाजगी संस्थेत असल्यामुळे मी स्वतःच पुढील कार्यक्षेत्र म्हणून सोलापूर स्वीकारले आणि येथे कार्याला गती मिळाली. यात आवर्जून उल्लेख करावा लागेल की, पत्नीच्या खंबीर पाठिंब्याने आज विविध क्षेत्रात काम करीत इथपर्यंत पोहोचलो आहे

वैद्यकीय क्षेत्रात एक संस्था म्हणून उभे राहणे हा प्रवास सोपा नव्हता. या प्रवासात माझ्या पत्नीने केवळ एक सुविद्य सहचारिणी म्हणून नव्हे, तर या संस्थेची मुख्य आधारस्तंभ म्हणून जबाबदारी पेलली. तिच्या दूरदृष्टीने, कष्टाने आणि सोशिकतेने या आरोग्य मंदिराला आकार दिला आहे. या यशात आणि सेवाकार्यात तिचा सहभाग शब्दांपलीकडचा आणि मोलाचा आहे, हे अभिमानाने नमूद करतो.

**होमिओपॅथी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य**

२००२ साली पौरवी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून छोट्याशा जागेत महाराष्ट्रातील एकमेव असे महिला होमिओपॅथी मेडिकल कॉलेज सुरू केले. आज या संस्थेच्या वतीने

पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर, संचलित महिला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, सोलापूर (महाराष्ट्रातील एकमेव मुलींचे होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज), डॉ. विलास हरपाळे पी.जी. होमिओपॅथिक इन्स्टिट्यूट, विद्या इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, श्रीमती मथुराबाई हरपाळे नर्सिंग स्कूल, १५० मुलींचे वसतीगृह, प. पु. गोळवळकर गुरुजी सार्वजनिक वाचनालय, सोलापूर या विविध शैक्षणिक विभागाची सुरुवात केली. आज जवळपास हजार विद्यार्थी या संकुलात शिक्षण घेत आहेत.

**सामाजिक व क्रीडा क्षेत्रात काम**

क्रीडा भारती या संस्थेचे राज्यस्तरावर काम करून आजा जिल्हा प्रमुख म्हणून जबाबदारी आहे. तसेच कासार समाजासाठी तर फार पूर्वीपासून खूप मोठे कार्य केलेले आहे. संपूर्ण समाजाला एकत्र आणण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले आहेत. संभाजीनगर येथे समाजातील विद्यार्थी शिकले पाहिजे म्हणून वसतिगृह चालू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सोलापूर येथे आल्यानंतर २००८ जैन कासार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी

जैन कासार विकास प्रतिष्ठानची सुरुवात येथील काही समाज बांधवांना सोबत घेऊन केली. ते संस्थापक अध्यक्ष आहेत पाच वर्षे अध्यक्ष म्हणून काम केल्यानंतर स्वत:हून दूर होऊन इतरांना संधी दिली. या माध्यमातून पाच वधू-वर मेळावे घेतले. महाविद्यालयाच्या पटांगणावर मोफत वधू-वर मेळावा घेतला सामूदायिक विवाह सोहळा घेतला. विद्यार्थी पैशाअभावी शिक्षणापासून दूर राहू नये म्हणून चिंतामणी पार्श्वनाथ शैक्षणिक फंडाची निर्मिती केली. अनेक जणांना आर्थिक मदतही केली. समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत, होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करणे हे एक अत्यंत कौतुकास्पद आणि दूरगामी पाऊल आहे. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे मुख्य शस्त्र असल्यामुळे, अशा योजनांमुळे पैशांअभावी कोणत्याही हुशार विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहणार नाही याची काळजी घेतली.

शिक्षण हीच प्रगतीची पहिली पायरी आहे! समाजातील गोरगरीब व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जी 'शिष्यवृत्ती योजना' सुरू केली आहे. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, समाजातील ज्येष्ठ बांधवांना दरवर्षी पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या संस्थेचे कार्य पाहून त्यांच्या कार्याची आपणास कल्पना येईल. आज त्यांची मुलगी डॉ. पौरवी अभिजित वडगावकर एम. डी. होऊन होमिओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य पदी यशस्वीपणे सांभाळत आहे. जावई डॉ. अभिजीत वडगावकर हे युगंधर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे सी. ई. ओ. म्हणून कार्यरत आहेत.

**निरोगी आरोग्य - संघाची प्रभात शाखा**

पहाटेच्या वेळी मैदानावर घाम गाळून स्वतःला निरोगी ठेवण्याचा आणि राष्ट्रकार्यात स्वतःला झोकून देण्याचा हरपाळे यांचा हा निश्चय खरोखरच कौतुकास्पद आणि इतरांसाठी प्रेरणादायी आहे. गेल्या ६० वर्षांपासून मैदानावर प्रभात शाखेवरील त्यांची उपस्थिती ही इतरांसाठी प्रेरणादायी आहे. प्रभात शाखेमुळे सकाळी लवकर उठण्याची एक उत्तम आणि निरोगी सवय आयुष्यभरासाठी अंगी बाणली. शिस्त, वेळेचे नियोजन आणि एकत्र काम करण्याची पद्धत यामुळेच यशस्वी आहात. आपला हा आरोग्याचा आणि शिस्तीचा प्रवास असाच सातत्याने सुरू राहो, या सदिच्छा! ७५ वा अमृत महोत्सव वाढदिवस आहे. त्यांच्या या आनंदाच्या क्षणी त्यांना दीर्घायुष्यासाठी अनंत शुभेच्छा.

**महावीर दुरुगकर, सोलापूर.**

### कबड्डी हाच श्वास

महाराष्ट्राचा मातीतील रांगडा खेळ 'कबड्डी' जिवंत ठेवण्यात आणि तो घराघरांत पोहोचवण्यात हरपाळे यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी गेल्या तीन दशके अविरतपणे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा भरवणे ही साधी गोष्ट नाही; हा कबड्डी खेळाप्रती असलेला तुमचा अथांग त्याग आणि निष्ठा दर्शवतो. खामगाव, सोयगाव, सोलापूर याठिकाणी दरवर्षी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा ते घेत आहेत. यासाठी बक्षिसाच्या रुपाने आजपर्यंत ५० लाख रुपयांचे योगदान दिले आहे. ते यासाठीच की, हजारो ग्रामीण व शहरी खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखवण्याची सुवर्णसंधी मिळावी म्हणून. त्यामुळेच हजारो खेळाडूंचे भविष्य घडवले आहे. महाराष्ट्राच्या मातीतील खेळ कबड्डीप्रती असलेली खरी निष्ठा अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. ही अविरत ऊर्जेने सुरू असलेली क्रीडा सेवा नव्या क्रीडा आयोजकांसाठी आणि मंडळांसाठी नेहमीच एक मार्गदर्शक दिवा ठरेल.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### बार्शीत चोरीच्या तयारीत असलेल्या दोघांना पोलिसांनी रंगेहात पकडले

**बार्शी, दि. ७ जुलै-**

बार्शीशहरातील गाडेगांव रोड परिसरात नवीन न्यायालयाच्या इमारतीजवळ अंधाराचा फायदा घेत संशयास्पदरीत्या लपून बसलेल्या दोघांना बार्शी शहर पोलिसांच्या रात्रीच्या गस्ती पथकाने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान समाधानकारक उत्तर न देता चोरी करण्याच्या उद्देशाने तेथील परिसरात थांबल्याचे निष्पन्न झाल्याने दोघांविरुद्ध मुंबई पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बार्शी शहर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल सचिन नितनात हे पोलीस कॉन्स्टेबल पवार, साळवी आणि मुलाणी यांच्यासह सोमवार दि. ६ जुलै पहाटे नियमित नाईट पेट्रोलिंग करत होते. पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास गाडेगांव रोडवरील नवीन न्यायालयाच्या इमारतीजवळील डीवायएसपी कार्यालयाच्या बांधकामाच्या आडोशाला अंधारात दोन इसम संशयास्पदरीत्या लपून बसलेले दिसून आले. पोलिसांनी तत्काळ दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला त्यांनी आपली ओळख सांगण्यास टाळाटाळ केली. मात्र अधिक चौकशी केल्यानंतर त्यांनी आपली नावे संदीप बबन शेंडगे (वय ४७) व अमन पैगंबर शेख (वय २१, दोघे रा. गाडेगाव रोड, बार्शी) अशी असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यांच्या हालचाली व परिस्थिती संशयास्पद असल्याने चोरी करण्याच्या उद्देशाने ते अंधारात लपून बसल्याचा संशय पोलिसांना आला. याप्रकरणी दोघांविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम १२२(क) अन्वये बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

### पान खाऊ घातल्याचा वाद; तरुणावर दगडाने हल्ला केल्याचा आरोप

**बार्शी, दि. ७ जुलै-**

बार्शी शहरातील तुळजापूर नाका परिसरात पान खाण्याच्या निमित्ताने झालेल्या वादातून एका तरुणावर दगडाने हल्ला करुन मारहाण केल्याची घटना रविवारी दि. ५ जुलै रात्री घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल तुकाराम कदम (वय २८, रा. कदम वस्ती, ता.बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, रविवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ते तुळजापूर नाका येथील केदारनाथ पान शॉपसमोर पान खाण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांची ओळखीचा आरबाज रज्जाक सय्यद याच्याशी भेट झाली. फिर्यादीनुसार, आरबाज सय्यद याने पान मागितल्याने राहुल कदम यांनी त्याला पान खाऊ घातले. त्यानंतर आरबाजने जेवणासाठी सोबत येण्यास सांगितले. मात्र, माझ्याकडे पैसे नाहीत, असे राहुल यांनी सांगितल्याचा राग मनात धरुन आरबाज सय्यद आणि त्याचा मित्र आदर्श ऊर्फ बबलू भोसले यांनी त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली, असा आरोप करण्यात आला आहे. यावेळी आरबाज सय्यद याने तेथे पडलेला दगड उचलून राहुल कदम यांच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले, तसेच त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव सुरु झाला. त्यानंतर जीवाच्या भीतीने राहुल कदम यांनी जवळील एका गोदामात आश्रय घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मात्र, आरोपींनी तेथेही पाठलाग करुन आरबाज रज्जाक सय्यद, आदर्श ऊर्फ बबलू भोसले आणि विष्णू सुरेश राजगुरु यांनी शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर राहुल कदम यांनी आपल्या भावांना माहिती दिली. त्यानंतर ते बार्शी शहर पोलीस ठाण्यात गेले असता पोलिसांनी त्यांना वैद्यकीय उपचारासाठी पाठविले. उपचार घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा पोलीस ठाण्यात येऊन फिर्याद दाखल केली. या प्रकरणी आरबाज रज्जाक सय्यद (रा. मांगडे चाळ), आदर्श ऊर्फ बबलू भोसले (रा. मांगडे चाळ) आणि विष्णू सुरेश राजगुरू (रा. तुळजापूर नाका, बार्शी) यांच्याविरुद्ध मारहाणीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

### क्रिकेट खेळताना बॉल लागल्याच्या कारणावरून दोन गटात राडा

**सोलापूर, दि. ७ जुलै-**



क्रिकेट खेळताना बॉल लागल्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटात जोरदार हाणामारी झाल्याची घटना गंगा नगर भागात ५ जुलै २०२६ रोजी रात्री ९ च्या सुमारास घडली. दरम्यान याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी काजल सर्वगोड, लक्ष्मी गायकवाड, गोविंद गायकवाड, अतिश गायकवाड, सतिश गायकवाड, विरेन सर्वगोड, काजलचा पती, ऐश्वर्या सर्वगोड आणि बेबी सर्वगोड (सर्व रा. हब्बू वस्ती, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत नूतन पोपट निकंबे यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी नूतन निकंबे यांच्या घरासमोर त्यांचा मुलगा प्रेम आणि त्याचे मित्र क्रिकेट खेळत होते. यावेळी खेळताना बॉल आरोपी काजल सर्वगोड हिच्या मुलीला लागला. या गोष्टीचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीच्या घरी जाऊन गोंधळ घातला. तुम्हाला मस्ती आली आहे, तुम्हाला इथे राहू देणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी, त्यांची बहीण आणि आई यांना हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार बाबर करत आहेत.

### बाळप्पा कादे यांचे निधन

**सोलापूर, दि. ७ जुलै-**



निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी बाळप्पा अण्णप्पा कादे (वय ९१) यांचे दीर्घ आजाराने मंगळवारी (ता. ७) सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. बुधवारी (ता. ८) सकाळी ११ वाजता विंचूर रस्त्यावरील त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. ते प्रगतशिल शेतकरी रामचंद्र कादे यांचे मोठे बंधू तर माजी उपसरपंच शिवानंद कादे यांचे वडील होत.

# बार्शीत पोलिसांचा धाक संपला?

# आठवडाभरातच नव्या 'पीआय'समोर गुंडांचे आव्हान

## पोलिसांच्या नाकावर टिच्चून पोलीस ठाण्यातच राडा; सीसीटीव्ही स्क्रीन व खुर्च्यांची मोडतोड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जुलै-**

बार्शी शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरु झाली आहे. शहर पोलीस ठाण्याच्या आवारात नव्हे, तर थेट पोलीस ठाण्याच्या आत ठाणे अंमलदार कक्षातच दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारीत सीसीटीव्ही स्क्रीन आणि खुर्च्यांची मोडतोड झाल्याची घटना सोमवार दि. ६ जुलै रोजी मध्यरात्री घडली. ही घटना पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर आणि गुन्हेगारांमध्ये पोलिसांविषयी असलेल्या भीतीच्या वातावरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरत आहे.

अवघ्या आठवडाभरापूर्वी, २९ जून रोजी बार्शी शहर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्यासमोर या घटनेने शहरातील कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान अधिक तीव्र झाल्याची चर्चा सुरु आहे. पोलीस ठाण्याच्या आतच शासकीय मालमत्तेची मोडतोड होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.



या घटनेनंतर नागरिकांमध्ये एकच प्रश्न उपस्थित होत आहे की, पोलीस ठाण्यातील साहित्यच सुरक्षित नसेल, तर सर्वसामान्य नागरिकांची घरे, दुकाने आणि मालमत्ता कितपत सुरक्षित राहणार? त्यामुळे शहरातील सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही सुमारे दोन महिन्यांपूर्वी बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारासमोर दोन गटांमध्ये मोठा संघर्ष होऊन ४० ते ५० जणांच्या जमावाकडून परस्परांवर दगडफेक झाली होती. या घटनेत पोलिसांसमोरच गोंधळ उडाला होता. मात्र, त्यावेळी कठोर कारवाई झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे अशा प्रवृत्तींना वेळीच आळा न बसल्याने काही समाजकंटकांचे धाडस वाढत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, माजी उपविभागीय पोलीस अधिकारी खझड अंजना कृष्णा यांच्या काही दिवसांच्या कार्यकाळात बार्शी शहर व तालुक्यातील अनेक अवैध व्यवसाय आणि गुंड प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण आल्याचे दिसून आले होते. त्यांच्या बदलीनंतर नव्याने रुजू झालेले विभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप आणि शहराचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्यासमोर कायदा-सुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर अनेक ज्येष्ठ नागरिक पूर्वी बार्शीत कार्यरत राहिलेले पोलीस निरीक्षक प्रकाश चव्हाण, दीपक सावंत आणि रामदास शेळके यांच्या कार्यपद्धतीची आठवण काढत असून, गुन्हेगारीवर कठोर नियंत्रण ठेवणाऱ्या आणि कायद्याचा धाक निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्याची शहराला गरज असल्याचे मत व्यक्त करत आहेत.

दरम्यान, पोलीस ठाण्यातच घडलेल्या या प्रकारामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्था, पोलिसांचा धाक आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांनी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

### चौंडेश्वरवाडी येथे शेतमालकाने केलेल्या गोळीबारात महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील मौजे चौंडेश्वरवाडी येथे शेतमजूर महीलेच्या डोक्यात गोळी घालून शेत मालकाने हत्या केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. उषा विजय साठे व विजय साठे हे दलीत समाजातील पती पत्नी सचिन जगन्नाथ देशमुख यांच्या चौंडेश्वरवाडी येथील शेतात गेली अनेक वर्ष शेतमजूर म्हणून काम करत होते. सोमवार दि.६ जुलै रोजी उषा व विजय साठे देशमुख यांच्या शेतात मजुरीस गेले होते. दुपारच्या सुमारास विजय साठे हे शेतात काम करत होते तर उषा साठे या रस्त्यावर होत्या. याचवेळी सचिन जगन्नाथ देशमुख याने शेतात येवून जवळच्या पिस्तुल मधुन उषा विजय साठे यांच्या डोक्यात गोळी झाडली. देशमुख याने झाडलेली गोळी उषा साठे यांच्या डोक्यात आरपार जावून जागीच कोसळल्या. बंदुकीच्या गोळीचा व पत्नी ओरडल्याचा आवाज एकून विजय साठे रस्त्यावर आले असता पत्नी उषा ही रक्ताच्या थारोळ्यात पडली होती तर सचिन देशमुख याच्या हातात रिव्हॉल्वर दिसला. त्यानंतर सचिन देशमुख घटनास्थळावरुन निघून गेला तर विजय साठे यांनी जखमी पत्नीस अकलूज येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणले असता डॉक्टरांनी उषा साठे हिस मृत झाल्याचे घोषित केले.

त्यानंतर सदर घटनेची माहीती अकलूज पोलिसांना मिळताच पो.नि. निरज उबाळे व त्याच्या पथकाने घटस्थळी जावून माहिती घेवून पंचनामा केला तर सदर घटनेची माहीती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधीक्षक संतोष वाळके यांनीही घटनास्थळी भेट देवून माहीती घेतली. सदर घटनेबाबत मयताचे पती विजय साठे यांच्या फिर्यादीवरून अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपींला अटक केली आहे.

## फसवणुकीतील आरोपी मिनोज शेख याचा जामीन अर्ज फेटाळला

### बनावट ई-मेलद्वारे ७६ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जुलै-**

बनावट ई-मेल आयडी तयार करून साखर कारखान्याची ७६ लाख ६०० रुपयांची फसवणूक केल्याच्या गंभीर प्रकरणातील आरोपी मिनोज बाबा शेख याचा नियमित जामीन अर्ज मा. यू. एल. जोशी, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बार्शी यांनी फेटाळून लावला.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. ३५६/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६(उ) व ६६(ऊ) अंतर्गत गुन्हा दाखल आहे. आरोपीने दाखल केलेला नियमित जामीन अर्ज क्र. ३९३/२०२६ हा न्यायालयाने दि. ६ जुलै २०२६ रोजी नामंजूर केला.

फिर्यादीनुसार, आरोपी मिनोज बाबा शेख व सहआरोपी यांनी नाथबाबा ग्रो ट्रेड हब प्रा. लि. या कंपनीच्या माध्यमातून संगनमत करुन बनावट व खोटे ई-मेल आयडी तयार केले. या बनावट ई-मेलचा वापर करुन कृष्णा एंटरप्रायझेस व लक्ष्य ट्रेड लिंक यांना देय असलेली रक्कम स्वतःच्या कंपनीच्या खात्यात वळविण्यात आली. या प्रकारातून साखर कारखान्याची ७६,००,६००/- रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे.

जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान आरोपीच्यावतीने तो कंपनीचा केवळ भागीदार असून दैनंदिन व्यवहारात सहभागी नसल्याचा तसेच वाद दिवाणी स्वरुपाचा असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. यास सरकार पक्षाने विरोध केला. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. डी. डी. देशमुख यांनी गुन्ह्याचे गंभीर स्वरुप, बनावट ई-मेल आयडी तयार करुन साखर कारखान्याची फसवणूक केल्याचे आरोप, आरोपीच्या कंपनीच्या खात्यात रक्कम वळविण्यात आल्याची बाब आणि तपास अद्याप सुरु असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. मुळ फिर्यादी साखर कारखानातर्फे ॲड. अभिजीत अनिल पाटील (पांगरीकर) यांनी जामीन अर्जास विरोध करताना न्यायालयास सांगितले की, आरोपी व सहआरोपी यांनी साखर कारखान्याची ७६ लाख ६०० रुपयांची फसवणूक केली आहे. सहआरोपी राजीव मोरे याच्याविरुद्ध कराड, कुर्नूर व लातूर पोलीस ठाण्यांमध्ये इतर गुन्हे नोंद असून त्यांच्याविरुद्ध दिवाणी दावाही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून देत, आरोपीस जामीन मंजूर झाल्यास तो साक्षीदारांवर प्रभाव टाकू शकतो. तसेच पुराव्यांमध्ये हस्तक्षेप होण्याची शक्यता असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांचा विचार केल्यानंतर न्यायालयाने आदेशात नमूद केले की, प्रथमदर्शनी फिर्यादीच्या तक्रारीतून आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग दिसून येतो. बनावट ई-मेल आयडी तयार करुन निधी स्वतः च्या कंपनीच्या खात्यात वर्ग करण्यात आल्याचा आरोप असून फसवणुकीची रक्कमही मोठी आहे. गुन्ह्याचे स्वरुप गंभीर असून तपास अद्याप सुरु असल्याने या टप्प्यावर आरोपीस जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने नियमित जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. डी. डी. देशमुख यांनी काम पाहिले. तर मूळ फिर्यादीतर्फे ॲड. अभिजीत अनिल पाटील यांनी युक्तिवाद करुन जामीन अर्जास विरोध केला. तसेच मूळ फिर्यादीतर्फे ॲड. ए आर पाटील, ॲड. यू डी गाढवे, ॲड. के.के. पाटील यांनी काम पाहिले. आरोपीतर्फे ॲड. महेश जगताप यांनी काम पाहिले.

## आषाढी वारीसाठी उधना ते मिरज दरम्यान ४ अतिरिक्त रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**



पंढरपूर येथे आषाढी मेळ्याला जाणाऱ्या यात्रेकरूंना सोयीस्कर प्रवास करण्यासाठी भारतीय रेल्वेने यापूर्वीच ५४ आषाढी विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. गुजरातमधील उधना ते महाराष्ट्रातील मिरज दरम्यान पंढरपूरमार्गे ४ जादा गाड्या धावणार आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहेतः

ट्रेन क्रमांक ०९०७१ स्पेशल उधना २३.७.२०२६ आणि २४.७.२०२६ रोजी ०६:४५ वाजता निघेल आणि मिरजला दुसऱ्या दिवशी ०७:३० वाजता पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०९०७२ स्पेशल मिरजहून २४.७.२०२६ आणि २५.७.२०२६ रोजी ०८:४० वाजता निघेल आणि उधना येथे दुसऱ्या दिवशी ०७:५० वाजता पोहोचेल.

या गाडीची रचना ही स्लीपर क्लास, २ लगेज कम गार्डच्या ब्रेक व्हॅनसह ४ सामान्य द्वितीय श्रेणी अशी असेल तर चलठण, बारडोली, व्यारा, उकई सोनगढ, नवापूर, खांडबारा, नंदुरबार, दोंडाईचा, सिंदखेडा, नरडाणा, अमळनेर, धरणगाव, पालधी, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, पानझुंड आणि दांडाई असे थांबे असतील.

### विजापूर रोडवरील पान टपऱ्यांवर अन्न औषध प्रशासनाची कारवाई; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जुलै-**

विजापूर रोडवरील दोन पान टपऱ्यांवर अन्न औषध प्रशासनाने कारवाई करीत ओला मावा जप्त केला आहे .या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दोन वेग-वेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आज मंगळवारी सकाळी अन्न व औषध प्रशास-नाने विजापूर रोडवरील दोन पान टपऱ्यांवर कारवाई केली .पशान अपार्टमेंटच्या बाजूला असलेल्या पानटपरीतून २ हजार २५० रुपयांचा ओला मावा जप्त केला. पानटपरीचालक सौरभ सुरेश सोनकांबळे (वय २५, रा. कल्याण नगर,जुळे सोलापूर, सोलापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर दुसऱ्या घटनेत विजापूर नाक्यावरील ऐ पान शॉपवर धाड टाकून ३ हजार ७५० रुपयांचा ओला मावा जप्त केला. पानटपरी चालक अमित रामचंद्र गायकवाड (वय ३३, रा. सेटलमेंट, सोलापूर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्ही गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार पवार हे करीत आहेत.

# महाबीजचे सोयाबीन बियाणे बोगस?

## पेरणीनंतरही मोड न आल्याने बार्शीतील शेतकरी आक्रमक

## नुकसान भरपाई देऊन तात्काळ पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची कृषी विभागाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग दि. ७ जुलै-**

बार्शी तालुक्यातील झाडी गावच्या शेतकऱ्यांवर यंदा खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच दुबार पेरणीचे मोठे संकट ओढवले आहे. शासकीय आणि विश्वासू ब्रँड समजल्या जाणाऱ्या 'महाबीज' कंपनीचे गड-३३५ या वाणाचे सोयाबीन बियाणे पेरून आठवडा उलटला, तरी शेतात बियाणाचा एकही अंकुर वर आलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. फसवणूक झालेल्या संतप्त शेतकऱ्यांनी एकत्र येत बार्शीचे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती कृषी अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

आता या संपूर्ण प्रकरणावर बार्शीचा कृषी विभाग आणि महाबीज कंपनी प्रत्यक्षात काय पावले उचलणार आणि हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना न्याय कधी मिळणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

झाडी (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील अनेक शेतकऱ्यांनी २९ जून २०२६ रोजी वैराग येथील 'समृद्धी कृषी सेवा केंद्र' येथून महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे (लॉट नं. ११-०१) खरेदी केले होते. त्यानंतर १ जुलै २०२६ रोजी संपूर्ण शासकीय मार्गदर्शक सूचनांचे पालन करून अत्यंत आशेने शेतात पेरणी केली. मात्र, पेरणीला ६ ते ७ दिवस उलटून गेले तरी बियाणे जमिनीतच सडले असून त्याला मोड आलेले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च वाया गेला आहे.

**तक्रारदार शेतकरी आणि झालेले नुकसान**

श्रीकांत माणिक मते: ३ पिशव्या बियाणे (बियाणे न उगवल्याने मोठे आर्थिक नुकसान) ज्ञानदेव उद्धव मते: २ पिशव्या बियाणे, रविंद्र गोरख आगलावे: ३ पिशव्या बियाणे, वैजिनाथ चांगदेव सांगुळे: १ पिशवी बियाणे, सूर्यभान आप्पा वाघमारे: ३ पिशव्या बियाणे

**शेतकऱ्यांचा प्रशासनाला संतप्त सवाल!**

विश्वासू आणि शासकीय ब्रँड समजल्या जाणाऱ्या 'महाबीज' कंपनीचेच बियाणे जर असे बोगस निघणार असेल, तर सामान्य शेतकऱ्यांनी कुणावर विश्वास ठेवायचा? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करणाऱ्या बळीराजाला आता या बोगस बियाणांमुळे दुबार पेरणीच्या मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

**शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्याः**

१) कृषी विभागाने तात्काळ झाडी गावातील बाधित शेतांमध्ये जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचे पंचनामे करावेत.

२) संबंधित दोषी बियाणे कंपनीकडून शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसान भरपाई मिळवून द्यावी.

३) बोगस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व्हावी.

**कठोर कायदेशीर कारवाई होईल**

शेतकऱ्यांनी कालच आमच्याकडे या संदर्भात लेखी निवेदन दिले असून तक्रार नोंदवली आहे. या प्रकरणाची आम्ही अत्यंत गंभीरतेने दखल घेतली आहे. उद्याच (बुधवारी) सोलापूरहून कृषी विज्ञान केंद्राचे (घतघ) तज्ज्ञ शास्त्रज्ञ आणि संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले आहे. बाधित क्षेत्रावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचे पंचनामे केले जातील. तपासणीअंती जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**- विलास मिस्कीन**
**(कृषी अधिकारी, गुणनियंत्रक, बार्शी)**

**कृषी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करू**

आम्ही पै-पै गोळा करून, उसने-पासने करून मोठ्या आशेने पेरणी केली होती. पण महाबीजच्या बियाणाने आमचा घात केला. आठवडा झाला तरी शेतात अजून एकही मोड बाहेर आला नाही, बियाणे जमिनीतच सडून गेले आहे. आता दुबार पेरणी करायची कशी आणि त्यासाठी पैसा आणायचा कुठून? सरकारने आम्हाला तात्काळ मदत आणि नुकसान भरपाई दिली पाहिजे, अन्यथा आम्ही कृषी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करू!

**- वैजिनाथ सांगुळे**
**(बाधित शेतकरी, झाडी, ता. बार्शी)**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शासकीय, खासगी आस्थापनांनी ३१ जुलैपर्यंत मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र सादर करावे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ७ जुलै : सर्व शासकीय आणि खासगी आस्थापनांनी कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र (ईआर-१) प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणारा अधिनियम, १९५९ आणि त्याअंतर्गत नियमावली, १९६० नुसार, सर्व आस्थापनांनी हे विवरणपत्र तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासन, अंगीकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका तसेच खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. या विवरणपत्रासाठी आस्थापनांनी HTTPS://ROJGAR.MAHASWAYAM.GOV.IN या वेबपोर्टलवर नियोक्ता लॉगइनद्वारे प्रवेश करावा. यासाठी 'एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब)' पर्यायावर क्लिक करून, युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगइन करावे. त्यानंतर डॅशबोर्डवरील 'ईआर-१' पर्याय निवडून 'एंटर ईआर-१' वर क्लिक करावे. यानुसार, त्रैमासिक विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पूर्वी ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. विवरणपत्र सादर करताना तांत्रिक अडचणी उद्भवल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.



# विविध वृत्त...

## जिल्ह्यात सरासरीच्या १६.६ टक्के पाऊस; प्रकल्पांमध्ये १७ टक्के पाणीसाठा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ७ : जिल्ह्याची वार्षिक सरासरी ७०६ मिमी इतकी असून, ६ जुलैपर्यंत प्रत्यक्ष ११७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण वार्षिक सरासरीच्या १६.६ टक्के आहे. जून महिन्याचा विचार केला असता, जूनमधील सर्वसाधारण १३५ मिमी पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात ९५ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे यंदाचा जून महिना सरासरीपेक्षा कमी राहिला आहे.

जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये मिळून सध्या एकूण १७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा प्रकल्पात १८ टक्के, तर निम्न तेरणा प्रकल्पात ३२.१६ टक्के पाणीसाठा आहे. तसेच मध्यम ८ प्रकल्पांमध्ये १२.२७ टक्के, १३५ लघुप्रकल्पांमध्ये १२.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ५.८६ लाख हेक्टर इतके आहे. सद्यस्थितीला एकूण क्षेत्रापैकी १८.२६% म्हणजेच सुमारे १.०७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाच्या हंगामात मुख्य पीक म्हणून सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ तुरीची लागवड करण्यात येत आहे.

जिल्ह्यात पाणी टंचाई भासू नये म्हणून प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. टंचाईग्रस्त भागात सध्या ३ टँकर्स सुरू असून, १८७ खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. दरम्यान, महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्यात आले असून, डिसेंबर अखेरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा सुरक्षित उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची पुरेशी उपलब्धता आहे. जिल्ह्यात सध्या १२३ दिवस (सुमारे चार महिने) पुरेल इतका चारा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे पशुपालकांनी चिंतेचे कारण नाही. जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये. केवळ अधिकृत माहितीवरच विश्र्वास ठेवावा आणि पाणी तसेच चाऱ्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## सफाई कर्मचारी सेनेच्या मराठवाडा विभागीय सरचिटणीसपदी कांबळे



तभा वृत्तसेवा

लातूर, दि.७ जुलै : येथील सामाजिक कार्यकर्ते बी.एम. कांबळे हे गेल्या विस ते पंचविस वर्षापासून मेहत्तर, भंगी, रूकी, वाल्मीकी समाजासाठी व विविध क्षेत्रातील सफाई कर्मचारी यांच्या सर्वागीण विकासासाठी सामाजिक, शैक्षणीक, शासकिय प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करीत आहेत.

त्यांच्या कार्याची दखल घेवून मुकेश सारवान मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा विद्यमान उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य व निरंजन माने, राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य यांनी शिवराज्य सफाई कर्मचारी सेनेच्या मराठवाडा विभाग सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे.

मराठवाड्यातील संबध महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत विविध शासकीय निमशासकिय क्षेत्रातील सफाई कर्मचार्यांना योग्य न्याय मिळावा त्यांना शासनाच्या सुविधा मिळाव्यात त्यांना सुरक्षा मिळावी या करिता पुढील दिशा असणार आहे. लवकरच संबध मराठवाड्यात दौरा करून समस्या जाणून घेण्यात येतील बी.एम. कांबळे यांची मराठवाडा विभागीय सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याने अध्यक्ष शंकर कांबळे, सर्वश्री अशोक सुर्यवंशी, अंकुश गायकवाड, अशोक कांबळे आदिंनी अभिनंदन केले.

## राज्यातील खाजगी शिकवणी व सावकारी तात्काळ बंद करावी : संजयभाऊ कांबळे




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : महाराष्ट्रातील खाजगी शिकवणी वर्ग आणि खाजगी फायनान्स व सावकारी तात्काळ बंद करण्यात यावेत,अशी मागणी भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली.

लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात संजयभाऊ कांबळे यांनी पुढे असे नमूद केले आहे की, नीट पेपर फुटी प्रकरणाने देशभरात खळब माजली आहे. अकरावी - बारावीचे शिक्षण हे केवळ अनुदानापुरते मर्यादित राहिले आहे.

कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत नसल्याने सर्व महाविद्यालयातीलप्राध्यापकाच्या संमतीने सर्व विद्यार्थी खाजगी क्लासेस मध्ये मोठ्या प्रमाणात फीस भरून शिक्षण घेत आहेत. गरिबांच्या विद्यार्थ्यांना फीस भरून खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेणे परवडत नसल्याने आणि महाविद्यालयात प्राध्यापक शिकवत नसल्याने गरिबांचे शिक्षण राहिलेच नाही, ही बाब गंभीर असून शासनाने याची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्रातील सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद करावेत आणि महाविद्यालयातील अकरावी बारावीचे शिक्षण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये घेण्याचे सक्तीचे करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत अवलंब करण्याचे आदेश द्यावेत.

तसेच लातूर जिल्ह्यातील नणंद गावच्या शेतकऱ्यांची सावकारांनी मोठ्या प्रमाणात पिळवणूक केल्याचे उघड झाले असून असे अनेक प्रकार लातूर जिल्ह्यात घडले आहेत व दैनंदिन घडत आहेत. फायनान्सवाले आणि खाजगी सावकार यांच्या दहशतीमुळे पुढे येण्यास कोणी धजत नसून त्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण केली आहे. ग्रामीण व शहरी भागातील मजबूर लोकांचा फायदा घेऊन त्यांचा मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत आहेत. त्यांची प्रचंड दहशत असल्याने लोक समोर येण्यास तयार नाहीत, मात्र आत्महत्या करण्यास तयार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील १२ शासकीय धान्य गोदामामध्ये हमाली करणाऱ्या हमालांचे बनावट रेकॉर्ड तयार करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची एसआयटीमार्फत चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश मादळे, नितीन कांबळे, राजू कांबळे दावणगावकर , सायस पाडुळे, केतन कांबळे, प्रकाश सूर्यवंशी, रमेश पाडुळे, राम सावते , दिलीप साबळे, सुभाष हुलसुरे, बब्रुवान भालेराव, देवानंद चिकाटे , प्रकाश सूर्यवंशी, अंकुश पाडुळे, कमलाकर साबळे, आत्माराम हुलसुरे यांची उपस्थिती होती.

## तांदूळजा-चिंचोली मंडळातील गावे मुरुड अपर तहसीलला जोडण्यास तीव्र विरोध



तभा वृत्तसेवा

मुरूड दि. ७ जुलै : मुरुड येथे नव्याने मंजूर झालेल्या अप्पर तहसील कार्यालयास तांदुळजा व चिचोली मंडळातील गावे जोडण्याच्या प्रस्तावाला दोन्ही मंडळांतील ग्रामस्थ, ग्रामपंचायती व लोकप्रतिनिधींनी तीव्र विरोध दर्शविला आहे. ग्रामसभांचे ठराव मंजूर करून नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह जिल्हाधिकारी लातूर व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, तांदुळजा व चिचोली मंडळातील नागरिकांची महसूल, उत्पन्न, जात, निवासी दाखले, संजय गांधी योजना, आपत्ती पंचनामे, जमीनविषयक प्रकरणे आदी सर्व शासकीय कामे अनेक वर्षांपासून लातूर तहसील कार्यालयामार्फत सुरळीतपणे होत आहेत. तसेच शिक्षण, व्यापार, बँकिंग, आरोग्य सेवा व दैनंदिन व्यवहारही प्रामुख्याने लातूर शहराशी निगडित असल्याने नागरिकांची प्रशासकीय व्यवस्था लातूर तहसीलशी सुसंगत झाली आहे. त्यामुळे ही गावे मुरुड अप्पर तहसील कार्यालयाशी जोडल्यास नागरिकांना अनावश्यक गैरसोय, वेळेचा अपव्यय व आर्थिक भार सहन करावा लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लोकभावना व जनहित लक्षात घेऊन तांदुळजा व चिंचोली मंडळातील गावे लातूर तहसील कार्यालयाशीच कायम ठेवावीत व मुरुड अप्पर तहसील कार्यालयाशी जोडण्याचा प्रस्ताव रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. निवेदन सादर करताना लातूर पंचायत समितीचे उपसभापती महेश चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत माने, बाजार समिती संचालक अनिल पाटील, पंचायत समिती सदस्य अमोल देडे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी संतोष स्वामी, जनक गायकवाड तसेच सरपंच सुहास कदम, प्रताप पाटील, बब्रुवान पवार, महेश हावल, पांडुरंग देशमुख, मनोज करपे, ज्ञानेश्र्वर बोराडे, चंद्रप्रकाश लाहडे, विलास भिसे, संजय चव्हाण, गणेश सोमासे, बाबासाहेब भिसे, नरेंद्र अल्टे, आकाश नर्सिंगे, सतीश शिंदे यांच्यासह दोन्ही मंडळांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## ४४५ थकबाकीदारांनी भरला कर, पहिल्या दिवशी ५७ लाख वसुली




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : लातूर शहर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील करदात्यांसाठी एक दिलासादायक निर्णय घेतला आहे. ६ ते २० जुलै या पंधरा दिवसांच्या कालावधीत थकीत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज आणि शास्तीमध्ये (दंड) १०० टक्के सवलत देण्यात येत आहे. मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी जाहीर केलेल्या या विशेष योजनेला पहिल्याच दिवशी (सोमवार, ता. ६) नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाढीव व्याजामुळे कर भरणे जिकिरीचे होत असल्याने नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनी व्याजात सवलत देण्याची मागणी केली होती.

वसुलीसाठी अधिकाऱ्यांसह ४१ प्रतिनिधी 'फिल्ड'वर थकबाकीदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि या सवलत योजनेची माहिती देण्यासाठी मनपाने विशेष यंत्रणा कामाला लावली आहे. या मोहिमेत क्षेत्रीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांसोबतच ४१ वसुली प्रतिनिधी, ४ कर निरीक्षक आणि ४ सहायक कर अधीक्षक प्रत्यक्ष 'फिल्ड' वर कार्यरत आहेत. घरोघरी जाऊन नागरिकांना सवलतीचे महत्त्व पटवून देणे आणि जास्तीत जास्त वसुली करणे, यावर या पथकांचा भर असल्याने आगामी दिवसांत वसुलीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

करदात्यांना रांगेत उभे राहावे लागू नये आणि करभरणा प्रक्रिया जलद व्हावी, यासाठी महानगरपालिकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत 'क्यूआर कोड'ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. लातूर शहरातील ए, बी, सी आणि डी या चारही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये थकीत कर भरण्यासाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्यात आले असले तरी, क्यूआर कोडमुळे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने कर भरणे अधिक सुलभ झाले आहे.

### कुलगुरू चासकर यांचा कव्हेकर यांनी केला सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : भाजपा नेते माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर हे नांदेड दौऱ्यावर गेले असताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर गणपतराव चासकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी कव्हेकर यांनी डॉ. चासकर यांचा त्यांची शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप यांची भेट घेऊन मराठवाड्याचा विकास व सुरक्षा यावर सविस्तर चर्चा झाली.

## पावसामुळे लातूर एक्स्प्रेस मनमाड मार्गे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : पुणे आणि मुंबई परिसरात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून रेल्वे प्रशासनाने लातूर आणि सोलापूरहून मुंबईला जाणाऱ्या दोन महत्त्वाच्या गाड्यांचे मार्ग तात्पुरत्या स्वरूपात बदलले आहेत. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सुटणारी गाडी क्रमांक २२१०८ लातूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) एक्स्प्रेस आणि गाडी क्रमांक १२११६ सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) सिद्धेश्र्वर एक्स्प्रेस या दोन्ही गाड्या त्यांच्या नियमित मार्गावरून धावणार नाहीत. मुसळधार पावसामुळे रेल्वे ट्रॅकवर पाणी व साचून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून मार्ग बदलला आहे.

पुणे-मुंबई रेल्वे मार्गावरील अतिवृष्टीच्या पार्श्र्वभूमीवर, ६ जुलै रोजी धावणारी गाडी क्र. २२१०८ लातूर-मुंबई एक्स्प्रेस आणि गाडी क्र. १२११६ सोलापूर-मुंबई सिद्धेश्र्वर एक्स्प्रेस या दोन गाड्यांच्या मार्गात बदल झाला आहे. या गाड्या आता नेहमीच्या मार्गाऐवजी दौंड, मनमाड, इगतपुरी आणि कल्याण या पर्यायी लांबच्या मार्गाने मुंबईला (सीएसएमटी) पोहोचतील.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार कातपुर येथे मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ




तभा वृत्तसेवा

लातूर : मंगळवार, ७ जूलै २०२६ विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपुर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्र क्र. ३ ची सुरुवात करण्यात आली आहे. आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते.

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण

महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना ब्युटी पार्लरच्या विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी अविनाश देशमुख, गावचे उपसरपंच मनोज देशमुख, ट्रेनर सलमा पठाण समन्वयक गजानन बोयणे, सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि गावातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## उपवर्गीकरणविरोधातील महामोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण उपवर्गीकरण निर्णयाच्या निषेधार्थ अनूसूचित जाती प्रवर्गातील सर्वच ५८ जातींच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या महामोर्चाचे नेतृत्व सरसेनानी आनंदराज आंबेडकर, माजीमंत्री बबनराव घोलप यांनी केले. या महामोर्चात अमन आंबेडकर यांची उपस्थितीही सर्वांचे आकर्षण ठरत होती.

अनुसूचित जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण करण्याचा घाट सरकारने घातला आहे. यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधाना छेद देण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. हे आरक्षण उपवर्गीकरण रद्द करावे, या मागणीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींच्यावतीने राज्यभर आंदोलने करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.६) अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्वच समाजघटकांच्यावतीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जिल्हाधिकारी महामोर्चा काढण्यात आला.

येथील आंबेडकर चौकात सोमवारी दुपारी बारा वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महामोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा राजर्षी शाहू महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, हनुमान चौक, गांधी चौक, आंबेडकर पार्क, अशोक हॉटेल चौक, तहसील कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन धडकला.

या महामोर्चात हजारोंच्या संख्येने नागरिक, महिला, तरुण-तरुणी सहभागी झाले होते. आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागण्यांच्या फलकांसह सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. तब्बल पाच किलोमीटरचे आंतर सर्व आंदोलकांनी चालून पूर्ण केले. आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करून आरक्षित असलेली सर्व शासकीय पदे भरण्यासाठी घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशा मागण्यांचे निवेदन राज्य शासनाला देण्यात

आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात काढण्यात येणारा महामोर्चा यशस्वी व्हावा, यासाठी जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी अहोरात्र मेहनत घेत होते. त्यानुसार या महामोर्चाला हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. त्यात प्रामुख्याने भंते पय्यानंद थेरो, प्रा. अनंत लांडगे, व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक विनोद खटके, सचिन मस्के, चर्मकार महासंघाचे उपाध्यक्ष सी. के मुरळीकर, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे, नगरसेवक ॲड. अतीश चिकटे, साधू गायकवाड, युवा भीम सेनेचे पंकज काटे, चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, महापालिकेचे नगरसेवक, ५९ जातीतील समाजबांधव उपस्थित होते.

### शिस्तबध्द महामोर्चा

शहरातून काढण्यात आलेल्या महामोर्चात सहभागी होण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांनी आंबेडकर चौकात जमण्यास सुरुवात केली होती. जुने जिल्हाधिकारी कार्यालयापुढेही विचारपीठासह आंदोलकांना बसण्यासाठी आसनांची व्यवस्था करण्यात आली होती. आंबेडकर चौकातून निघालेला हा महामोर्चा अत्यंत शिस्तबध्दपणे जोरदार घोषणाबाजी करीत मार्गक्रमण करीत होता. पहिले टोक जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले असताना शेवटचा व्यक्ती मात्र गंजगोलाईतही नव्हता. प्रत्येकाच्या हातात फलक, गळ्यात निळा गमचा, निळा फेटा असा पेहराव केलेले नागरिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष तर सरकारचा निषेध करताना दिसून आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : शहरातील आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जनसेवा संपर्क कार्यालयात सोमवारी भारतीय जनसंघाचे संस्थापक, महान राष्ट्रपुरुष,प्रखर राष्ट्रभक्त अखंड भारताचे पुरस्कर्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त तालुकाध्यक्ष माधवराव बिरादार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

त्या प्रसंगी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंदराव चिलकुरे, पंचायत समिती सभापती संजय सुर्यवंशी जेष्ठ नेते धोंडीराम सांगवे साहेब, नगराध्यक्ष रतन शिवणे, गणेश खरटमोल, संगायो समिती अध्यक्ष गणेश सलगरे, साकोळ पंस सदस्य तुकाराम लांडगे, माजी नगराध्यक्ष गणेश धुमाळे, पाणी पुरवठा सभापती विरभद्र मुदाळे ,नगरसेवक अनंत काळे, माधव खरटमोल, संदीप बिरादार, डॉ मुजेवार, सिध्दलिंग शिवणे,शहाजी पाटील, रामदास भुसागरे, सुभाष भंडे व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी मान्यवरांनी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनावर सखोल मार्गदर्शन केले .

## टाकाऊ वस्तूंपासून तयार केले विद्यार्थ्यांने शेकडो फलक पुसण्याचे डस्टर

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ७ जुलै : कलेतून आनंदही, शिक्षणही या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदपूर येथे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कौशल्याला वाव देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

विद्यालयाचे उपक्रमशील कलाशिक्षक महादेव खळुरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वेस्ट इज बेस्ट' या संकल्पनेवर आधारित टाकाऊ वस्तूंपासून फलक पुसण्यासाठी उपयोगी पडणारे डस्टर तयार करण्याचा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांच्या अंगी सृजनशीलता, स्वावलंबन, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि श्रमप्रतिष्ठेची भावना शालेय जीवनातच रुजावी, तसेच टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून त्यांना उपयुक्त स्वरूप देता येते, हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यामध्ये विद्यार्थ्यांनी घरातील वापरात नसलेले स्पंज, कापडाचे तुकडे, फोम, कार्डबोर्ड, प्लास्टिकचे तुकडे व इतर टाकाऊ साहित्याचा कल्पकतेने वापर करून आकर्षक, मजबूत व उपयुक्त असे फलक पुसण्याचे डस्टर तयार केले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पकतेचा वापर करत वेगवेगळ्या प्रकारचे डस्टर तयार करून कलात्मकतेचा सुंदर आविष्कार घडविला.

कौशल्यपूर्ण उपक्रमात विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेले डस्टर केवळ आकर्षकच नव्हे, तर दैनंदिन शालेय वापरासाठीही उपयुक्त ठरले. त्यामुळे शिकत शिकत निर्मिती आणि करून शिकणे या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील (छएझ २०२०) कौशल्याधारित शिक्षणाच्या संकल्पनेलाही या उपक्रमातून प्रभावी बळ मिळाले.

कलाशिक्षक महादेव खळुरे यांनी विद्यार्थ्यांना टाकाऊ वस्तूंचे योग्य नियोजन, पुनर्वापराचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि कलात्मक सादरीकरण याबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेली सर्जनशीलता ओळखून तिला योग्य दिशा दिल्यास त्यातून नाविन्यपूर्ण निर्मिती घडू शकते, असा संदेश त्यांनी दिला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास, कल्पकता, निरीक्षणशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, हस्तकौशल्य आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीची जाणीव विकसित झाली. शिक्षक व पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा कृतीशील उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे मत व्यक्त केले.

विद्यालयामध्ये राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना देणारा आदर्श उपक्रम ठरला आहे. वरील नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ.भालचंद्र पैके,सहसचिव डॉ. सुनिता चवळे,प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सुर्यवंशी, विजयकुमार चव्हाण आदिनी अभिनंदन व कौतुक केले.

## सभापतींची शाळेला अचानक भेट; विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबद्दल शिक्षकांना दिल्या सूचना

## दांडी मारणाऱ्या शिक्षकावर होणार कारवाई : संजय सूर्यवंशी

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : सभापतींनी तालुक्यातील मौजे थेरगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेला सोमवारी अचानक भेट दिली. वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची वाचन-लेखन क्षमता तपासल्यानंतर सभापतींनी शिक्षकांची बैठक घेऊन अभ्यासाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या.




वाचन-लेखन-गणितावर भर द्या, इयत्ता दुसरी नंतरच्या प्रत्येक मुलाला मराठीचे पुस्तक धडे वाचता आले पाहिजे. स्वतःचे नाव, पत्ता लिहिता आला पाहिजे. चौथीच्या विद्यार्थ्यांना विस पर्यंत पाडे तोंडपाठ हवेत. यात तडजोड नाही.

दुसरी पासून पाढे न समजणारा विद्यार्थी आढळून आला नाही पाहिजे त्याची जबाबदारी ज्या त्या शिक्षकांवर राहील.

वर्गात १० मुले असतील तर १०ही मुलांना समजले पाहिजे. फक्त हुशार एक , दोन मुलांना विचारून पाठ पुढे नेऊ नका. मागे राहणाऱ्या मुलांसाठी रोज तीस मिनिटे 'उजळणी तास' घ्या.

विद्यार्थ्यांचे दप्तर तपासणी सक्तीची करा

दररोज प्रत्येक विद्यार्थ्याचे दप्तर व वह्या तपासा. गृहपाठ दिला असेल तर तो तपासल्याशिवाय पुढचा धडा शिकवू नका. पालकांनाही महिन्यातून एकदा वह्या दाखवा.

विद्यार्थ्यांना त्यांना समजेल अशा कृतीतून शिक्षण द्या फक्त फळ्यावर लिहून पाठांतर नको. पाढे शिकवताना खडे मोजा. विज्ञान शिकवताना शाळेच्या बागेत न्या. परिसर हीच तुमची प्रयोगशाळा आहे.त्याच बरोबर शिक्षकांना वेळेवर येण्याची सुचना करण्यात आली शाळा भरण्याच्या अगोदर किमान पंधरा मिनिटे आले पाहिजे तुम्ही उशिरा आलात तर पोरं काय शिकणार? तसेच शिक्षकांनी मोबाईल वर्गाबाहेर ठेवावे

तास सुरू असताना मोबाईलवर बोलणे, व्हॉट्सअप बघणे बंद करा. ४५ मिनिटे फक्त विद्यार्थ्यांसाठी द्या. मुख्याध्यापकांनी यावर लक्ष ठेवावे.फक्त रिझल्टच्या दिवशी पालकांना बोलावू नका. कोणते मूल कुठे कमी पडतेय ते पालकांना सांगा. त्यासाठी पालक सभा दर महिन्याला घ्या. जेवढे विद्यार्थी तेवढ्या कुटुंबांचे भविष्य तुमच्या हातात आहे हे लक्षात ठेवा मी पुढच्या महिन्यात येईन तेव्हा प्रगती दिसली पाहिजे.या सर्व सुचनांचे काटेकोर पालन केले जाईल असे उपस्थित शिक्षक बिराजदार सर आणि सांभाळे सर यांनी सभापती संजय सुर्यवंशी यांना दिले.

या धडक भेटीमुळे तालुक्यातील इतर जि.प. शाळांमधील शिक्षकही आता सावध झाले आहेत.

## तहसीलदारांच्या हस्ते एस आय आर अभियानाचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : शहरात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (डखठ) अभियानाचा शुभारंभ शिरूर अनंतपाळ शहरात तहसीलदार किशोर यादव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या तसेच मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

या अभियानांतर्गत नवीन मतदारांची नोंदणी,मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे,तसेच मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बूथ लेव्हल अधिकारी (इडज) किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करून घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

शुभारंभप्रसंगी तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच निवडणूक विभागाचे प्रतिनिधी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (श.प.) माजी शहराध्यक्ष संदिप धुमाळे तसेच नागरिक उपस्थित होते. एसआयआर अभियानामुळे मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होणार असून प्रत्येक पात्र नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

### बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न

## दोघा आरोपींना ३ वर्षांचा कारावास व प्रत्येकी १०,००० दंड

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ७ जुलै : नोकरी साठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या निलंगा येथील दोन आरोपींना ३ वर्षांचा कारावास व प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या शासनाची फसवणूक व बनावट कागदपत्रांचा वापर करून नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नाच्या प्रकरणात प्रभावी तपास, सक्षम पुरावे आणि न्यायालयीन पाठपुराव्याच्या बळावर दोन्ही आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी बळीराम टोपाजी चव्हाण, तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिनांक २३ फेब्रुवारी २००८ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५/२००८ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपी १) श्रीराम ज्ञानेश्र्वर पाटील, रा. रामकृष्ण नगर, निलंगा २) ज्ञानेश्र्वर वसंतराव दोडतल्ले, रा. माळेगाव, ता. निलंगा यांनी ग्रामसेवक पदाच्या भरती प्रक्रियेदरम्यान अर्जासोबत बनावट व खोटे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल करत नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकाराची दखल घेत संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डी. एस. बिराजदार यांनी करून आवश्यक पुरावे संकलित केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

या खटल्यात सरकारी अभियोक्ता रामेश्वर ढेले यांनी सरकारतर्फे प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी अधिकारी, जिल्हा परिषदेतील दोन अधिकारी, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी न्यायालयाने महत्त्वपूर्ण मानल्या. तसेच संबंधित दिव्यांग प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातून कधीही निर्गमित झाले नसल्याचे पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्याने आरोपींविरुद्धचा गुन्हा निर्विवादपणे सिद्ध झाला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. एन. चव्हाण यांनी दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी आरोपी श्रीराम ज्ञानेश्र्वर पाटील व ज्ञानेश्र्वर वसंतराव दोडतल्ले यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ४१७ व ४६८ अन्वये तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्याच्या यशस्वी न्यायालयीन पाठपुराव्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवशंकर मनाळे तसेच पैरवी अंमलदार सचिन उस्तुरगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरूण भारत वाचणे चांगली सवय

## स्कूल बस खड्ड्यात उलटली ४ विद्यार्थी किरकोळ जखमी



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ७ जुलै : रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथील जनता विद्यालयाची विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी स्कूलबस सोमवारी सकाळी साडे आठच्या सुमारास खानापूर पाटीजवळ रस्त्यालगतच्या खड्ड्यात पलटी झाली. या अपघातात ४ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली असून बसमधील उर्वरित सर्व विद्यार्थी सुखरूप बचावले आहेत.

जनता विद्यालय, पोहरेगाव येथे शिकणारे डिगोळ तांडा व ईटी खानापूर परिसरातील पाचवी ते नववीचे विद्यार्थी दररोज या स्कूलबसमधून शाळेत ये-जा करतात. बस (क्र. एम एच २४ बीडब्ल्यू २५६९) मध्ये अपघातावेळी सुमारे २७ विद्यार्थी होते. बस खानापूरहून पोहरेगावकडे जात असताना खानापूर पाटीजवळ समोरून येणाऱ्या वाहनाला रस्ता देण्याच्या प्रयत्नात रस्त्याच्या कडेला असलेल्या मातीवरून घसरली. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने स्कुल बस रस्त्यालगतच्या खड्ड्यात पलटी झाली. संबंधित रस्ता अत्यंत खराब असल्यानेच हा अपघात घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच पोहरेगाव व खानापूर येथील नागरिक, जनता विद्यालयाच्या प्राचार्य शिक्षक तसेच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत. बसमधील विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढून रेणापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीनंतर ४ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाल्याचे निदर्शनास आले. ४ विद्यार्थ्यांना उपचार व तपासणीसाठी लातूर येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या अपघाताची माहिती मिळताच संस्थेचे अध्यक्ष ॲड. शिरीष यादव, सचिव सदानंद शिंदे यांनी ग्रामीण रुग्णालयास भेट देवून विद्यार्थी व पालकांना धिर दिला.

## संभाजी सेनेचे आंदोलन लेखी आश्वासनानंतर स्थगित

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ७ जुलै : तालुक्यातील शेतरस्ते, महसूल व न्यायप्रविष्ट प्रकरणांतील प्रलंबित प्रश्र्न निकाली काढण्याच्या मागणीसाठी संभाजी सेनेच्या वतीने सोमवारी (दि. ६ जुलै) येथील तहसील कार्यालयासमोर पुकारण्यात आलेले आत्मदहन आंदोलन प्रशासनाकडून लेखी आश्र्वासन मिळाल्यानंतर स्थगित करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या हस्तक्षेपाने आंदोलकांशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर हा तोडगा निघाला.

संभाजी सेनेचे रेणापूर तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण यांनी यापूर्वी दि. ९ जून २०२६ रोजी तहसील प्रशासनाला विविध शेतरस्ते व महसूल विषयक प्रश्र्नांबाबत निवेदन दिले होते. त्यानुसार मागण्यांची पूर्तता न झाल्याने सोमवारी सकाळी ११ वाजल्यापासून तहसील कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन सुरू करण्यात आले होते. आंदोलनास तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दुपारी सुमारे २ वाजता औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या वतीने लेखी आश्र्वासन देण्यात आले. त्यामध्ये गाव नकाशे व शिवरस्ते दर्शविलेल्या रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये आदेश देऊन आठ दिवसांच्या आत मंडळ अधिकाऱ्यांमार्फत रस्ते खुले करण्याची कार्यवाही केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ अंतर्गत सुरू असलेल्या रस्ता प्रकरणांमध्ये एका महिन्याच्या आत आदेश पारित करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ज्या प्रकरणांमध्ये सुनावणी सुरू आहे, त्या ठिकाणी शेतकऱ्यांची पेरणी अडचणीत येऊ नये म्हणून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत तात्पुरत्या स्वरूपात रस्ता उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

प्रशासनाने दिलेल्या या लेखी आश्र्वासनावर विश्र्वास ठेवून आंदोलन सध्या स्थगित करण्यात आले असले, तरी निश्र्चीत कालावधीत कार्यवाही झाली नाही तर एक महिन्यानंतर पुन्हा तहसील कार्यालयासमोर तीव्र आत्मदहन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संभाजी सेनेच्या वतीने देण्यात आला. हे आंदोलन संभाजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख धर्मराज पवार, जिल्हाध्यक्ष योगेश देशमुख, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मदन पाटील, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष अमोल कांदे, शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष सत्यपाल जाधव, विद्यार्थी आघाडी संपर्कप्रमुख प्रसाद पवार, कार्याध्यक्ष मंगेश निकम, जिल्हा संघटक सिद्धाजी माने, जिल्हा सचिव गजानन मुंगळे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत माने, संतोष शिंदे, रेणापूर तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण, हनुमंत बारलेकर, मनोज गरड, चव्हाण, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

## फेरफार प्रकरणात गुन्हा दाखल तलाठ्याला बडतर्फ न केल्यास १३ जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा

तभा वृत्तसेवा



शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : येथील गट क्रमांक १४व१४(ब) मधील फेरफार कृ.७१५२ प्रकरणाला न्यायालयाच्या आदेशाने नवे वळण मिळाले असून, संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल झाला असला तरी, संबंधित तलाठी आर. एस. पाटील यांच्यावर अद्याप कायमस्वरूपी बडतर्फीची कारवाई करण्यात आलेली नाही. याच्या निषेधार्थ पीडित शेतकरी राहुल येंजने यांनी १३ जुलै २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत राहुल येंजने यांनी जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजे शिरूर अनंतपाळ येथील भ्रष्टाचारी तलाठी आर. एस. पाटील यांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे, भ्रष्टाचार करणारे कर्मचारी दिलीप तिघाडे यांचे जोपर्यंत न्यायालयीन निकालातून निर्दोष मुक्तता होत नाही तोपर्यंत पेन्शन होऊ नये, विभागीय चौकशी अधिकारी बदलण्यात यावा, मौजे शिरूर अनंतपाळ येथील गट नं.१४व१४(ब) मधील फेरफार नं.७१५२ कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, भ्रष्टाचार करणाऱ्या आर.एस.पाटील या कर्मचाऱ्याला २०१६मध्ये एसीबि. ने रंगेहात पकडले असताना पुन्हा त्याला तलाठी या पदावर रुजू का केले.

न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर ही केवळ प्रशासकीय कार्यवाहीवरच प्रशासन थांबले आहे. गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याला सेवेत कायम ठेवणे हे शासनाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्र्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचा आरोप राहुल येंजने यांनी आपल्या निवेदनात केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित तलाठ्याला तात्काळ सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे. अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महसूल विभागातील बनावट फेरफार व भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अभय मिळण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. फेरफार कृ.७१५२ची सखोल चौकशी करून या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्र्चित करण्यात यावी. अशी ही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाचे ऑडिट करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी असेही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाला १३ जुलै पर्यंत मुदत दिली असून, तोपर्यंत माझ्या मागण्या बाबत ठोस निर्णय नाही झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाचे राहील असे ही नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल झाल्यामुळे महसूल विभागातील या प्रकरणाची पुन्हा एकदा जिल्हाभर चर्चा सुरू आहे. संबंधित तलाठ्यावर कोणती कारवाई केली जाते, चौकशीचा निकष काय लागतो आणि प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे शेतकरी, तालुक्यातील नागरिक, महसूल कर्मचारी यांचे लक्ष लागले आहे.दरम्यान १३ जुलै च्या प्रस्तावित आमरण उपोषणामुळे हे प्रकरण चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी चर्चा तालुकाभरातील नागरिकांमधून ऐकावयास मिळत आहे.

## मराठा सेवा संघातर्फे १५० गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ७ जुलै : मराठा सेवा संघाच्या वतीने येथील जिजाऊ सृष्टी सभागृहात निलंगा तालुक्यातील १० वी १२ वी तसेच एमबीबीएस ला प्रवेशित व युवा उद्योजक यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम,उदघाटक गटविकास अधिकारी सतिष पाटील प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढूमे, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, उद्योजक उदय पाटील, डॉ. अरविंद भातांबरे, डॉ. नरसिंह भिकाने, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव,जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे डी. बी.बरमदे,सतिष हानेगावे,विनोद सोनवणे,संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम,प्राचार्य अशोकराव चव्हाण, समाधानताई माने,ज्ञानेश्र्वर जाधव आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम म्हणाले विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये माता पिता व गुरुजनांच्या संस्काराचे मोल अनन्यसाधारण आहे.या संस्काररूपी शिदोरीच्या बळावरच आज गुणवंत म्हणून नामलौकिक केला आहे.त्यामुळे माता पिता व गुरुच्या संस्काराचा हा अनमोल ठेवा आयुष्यात कदापी विसरू नका असा मौलिक सल्ला गुणवंत विद्यार्थ्यांना दिला.

यशस्वी होण्याची गुरुकिल्ली म्हणजे विद्यार्थ्यांनी मी कधीच हरू शकणार नाही हा आत्मविश्र्वास स्वतःमध्ये निर्माण करावा आणि आपण जे ठरवतो त्याच दिशेने मार्गक्रमण करावे म्हणजे जीवनात यश प्राप्त होईल. गेलेली वेळ कधीच परत येत नाही त्यामुळे वेळेला महत्त्व दिले पाहिजे असे मत उद्योजक उदय पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व युवा उद्योजकरत्न राम क्षीरसागर,मिथुन दिवे, सदाशिव लोभे यासह स्विमिंग मध्ये राष्ट्रीय पातळीवर काश्यप पदक पटकवणारे जलतरणपट्टू हर्षद अंबादास जाधव यांचाही सन्मानचिन्ह व प्रमाणात देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

प्रस्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव यांनी तर सूत्रसंचालन सतीश हानेगावे आभार अमरदीप पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी आर के नेलवाडे, अजय मोरे, प्रताप हंगरगे, श्रीमंत जाधव, अंबादास जाधव, किरण धुमाळ,महेश जाधव, आशिष गायकवाड,परमेश्र्वर बोधले, सिद्धेश्र्वर तेलंग आदींनी परिश्रम घेतले.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जुन्या वादातून तरुणांना मारहाण; दहा जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जुलै -**

मागील भांडणाच्या कारणावरून दोन तरुणांना शिवीगाळ, मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मलबा कॉर्नर येथे ६ जुलै रोजी सकाळी सुमारे १० वाजता नागेश दिलीप पवार (वय २२) व गणेश दिलीप पवार यांना आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, विटा व दगडांनी मारहाण करून जखमी केले आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिली.




नागेश पवार यांच्या फिर्यादीवरून अनिल दत्ता पवार, सनी तानाजी साळुंके, ओम तानाजी साळुंके, श्री तानाजी साळुंके, युवराज संतोष साळुंके, किरण पवार, तानाजी शाहीर साळुंके, जया तानाजी साळुंके, आरती तानाजी साळुंके व ज्योती तानाजी साळुंके (सर्व रा. जुने बसस्थानक परिसर, तुळजापूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# सोयाबीनवर शंखी गोगलगाय व मिलिपीडचा वाढता प्रादुर्भाव

### शेतकऱ्यांनी तातडीने नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

चालू खरीप हंगामात मान्सूनच्या आगमनानंतर धाराशिव जिल्ह्यात सोयाबीनची पेरणी आणि उगवण पूर्ण झाली असली, तरी शंखी गोगलगाय तसेच पैसा (वाणी/मिलिपीड) किडीच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या किडी रोपावस्थेतील सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याने शेतकऱ्यांनी तातडीने सामूहिक पातळीवर एकात्मिक कीड व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन कृषी विद्यावेत्ता डॉ. अरुण गुटे आणि उपविभागीय कृषी अधिकारी महादेव आसलकर यांनी केले आहे.

मौजे भोगजी (ता. कळंब) तसेच इतर बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कृषी विभागाने ही सूचना जारी केली आहे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने रात्री सक्रिय होत असून सोयाबीनच्या कोवळ्या



रोपांवर आक्रमण करून मोठे नुकसान करते. त्यामुळे वेळेत नियंत्रणात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

प्राथमिक उपाय म्हणून सोयाबीनच्या शेताभोवती बांधाच्या आतील बाजूने सुमारे पाच सेंटीमीटर रुंदीचा चुन्याचा पट्टा तयार करावा. यामुळे गोगलगाईंचा शेतात प्रवेश कमी होण्यास मदत होते. तसेच गावपातळीवर सामूहिक मोहीम राबवून गोगलगाईंचे नियंत्रण केल्यास अधिक प्रभावी परिणाम मिळतील, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

रासायनिक नियंत्रणासाठी मेटलडिहाईड २.५ टक्के (स्नेलकील) पेलेटचे छोटे गोळे तयार करून शेताच्या बांधालगत पाच ते सात फूट अंतरावर ठेवावेत. शेताच्या आतील भागात प्रादुर्भाव असल्यास प्रत्येक चार ओळींनंतर पाच फूट अंतरावर हे गोळे ठेवावेत. हे औषध गोगलगाईंना आकर्षित करून त्यांचे प्रभावी नियंत्रण करते.

तर पैसा (वाणी/मिलिपीड) किडीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस १.५ टक्के किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार औषध प्रति एकर पाच किलो या प्रमाणात वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

याशिवाय जैविक व भौतिक नियंत्रणालाही प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रात्री शेतात प्रति एकर दहा ठिकाणी गव्हाचे ढीग किंवा पाण्यात भिजविलेला सुतळी बारदाना ठेवून सकाळी त्याखाली जमा झालेल्या गोगलगाई गोळा करून साबणाच्या किंवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात, असेही कृषी विभागाने शेतकऱ्यांना सुचविले आहे.

# अर्धवट अभ्यासक्रम बदलणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा फटका!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

उच्च शिक्षणासाठी सुरुवातीला एका अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन नंतर तो अर्धवट सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागू शकते. महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदी आणि शासन निर्णयातील निकषांमुळे अशा विद्यार्थ्यांचे नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमासाठीचे शिष्यवृत्ती अर्ज अपात्र ठरत असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव सचिन कवले यांनी दिली आहे.

> **महाडीबीटीच्या नियमांमुळे लाभावर गंडांतर...**

बारावीनंतर अनेक विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र अपेक्षित महाविद्यालय किंवा अभ्यासक्रमात तातडीने प्रवेश न मिळाल्यास शैक्षणिक खंड टाळण्यासाठी अनेक विद्यार्थी बीए, बीएससी किंवा बीकॉमसारख्या बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांना तात्पुरता प्रवेश घेतात. त्यानंतर ते महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करून लाभही घेतात. मात्र पुढील वर्षी इच्छित व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थी पूर्वीचा अभ्यासक्रम अर्धवट सोडतात.

समाजकल्याण विभागाने स्पष्ट केल्याप्रमाणे, एखाद्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्यानंतर तो अभ्यासक्रम मध्येच सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यास नव्या अभ्यासक्रमासाठीचा शिष्यवृत्ती अर्ज अपात्र ठरतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यापूर्वी योग्य विचार करून निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे. तसेच शिष्यवृत्तीचे नियम सूचना फलक, शिष्यवृत्ती विभाग आणि महाविद्यालयांच्या डिजिटल व सोशल मीडिया माध्यमांद्वारे व्यापकपणे प्रसारित करावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याशिवाय शिष्यवृत्तीची रक्कम राज्य व केंद्र शासनाकडून डीबीटी प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली ही रक्कम शासनाकडे चलनाद्वारे परत करण्यासंदर्भात कोणतेही वित्तीय नियम अस्तित्वात नसल्याने शासनाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय महाविद्यालयांनी अशा प्रकारचे मार्गदर्शन करू नये, असेही सचिन कवले यांनी स्पष्ट केले.

## रोड मशिनचे साहित्य व डिझेल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

वाघोली येथील डीसी अजमेरा कॅम्प परिसरातून रोड बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनचे साहित्य व डिझेल चोरी झाल्याप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.९ जून २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास वाघोली येथील डीसी अजमेरा कॅम्प परिसरात ही घटना घडली. या प्रकरणी मुनीश कुमार राजेशकुमार मिश्रा आणि गॅनचंद्र सत्यविर यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## टॉवरवरील कामगारांना बांधून २.६४ लाखांची अल्युमिनियम तार लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील चिवरी शिवारात टॉवरवर काम करणाऱ्या दोन कामगारांना मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देत बांधून ठेवून सुमारे २ लाख ६४ हजार रुपयांची ल्युमिनियमची तार जबरीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नागेशा टी. (वय ३९, रा. टी.एन. कोटे, ता. चेल्लाकेरे, जि. चित्रदुर्ग, कर्नाटक, सध्या रा. अणदूर, ता. तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चिवरी शिवारातील गट क्रमांक २६२, २७९ व २८० मधील टॉवर क्रमांक ३४/२ व एपी-३५ येथे कंपनीचे काम सुरू होते.

यावेळी अज्ञात तीन जणांनी कंपनीचे कामगार मंजल किसकु आणि बबलु टुडु यांना जिवे मारण्याची धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर दोघांनाही टॉवरला बांधून ठेवून कंपनीची ३८० मीटर लांबीची ३२ मिमीची ल्युमिनियमची तार, अंदाजे २ लाख ६४ हजार रुपये किमतीची, जबरीने चोरून नेली. नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## जवाहर विद्यालय, अणदूर येथे पालक सभेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ जुलै -**

जवाहर विद्यालय, अणदूर येथे सोमवारी (६ जुलै) पालक सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय करंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष लंगडे, नानासाहेब पाटील, चंद्रकांत गुड्डु आणि संतोष सारणे उपस्थित होते. मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सभेला प्रारंभ झाला. प्रारंभी उपस्थित पालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



सभेत विद्यालयातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे सेमी इंग्रजी वर्गातील प्रवेश, विविध स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षेचे निकाल, दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तास व सराव परीक्षा, मुलींच्या सुरक्षिततेसाठी विद्यालयाकडून राबविण्यात येणारे उपक्रम, जनगणना व एसआयआर मतदार नोंदणीमुळे शिक्षकांवर येणारा अतिरिक्त ताण, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनाची प्रभावी अंमलबजावणी, परगावाहून ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींसाठी अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेची अंमलबजावणी, शासकीय चित्रकला परीक्षा, वस्तीगृह प्रवेश, विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर निर्बंध, शालेय शिस्त, आधार अद्ययावत करणे, एनसीसी निवड प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीचे प्रयत्न, विविध शासकीय विद्यार्थी लाभ योजना तसेच शाळेतील विविध समित्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, रोहित मोरे, किरण गायकवाड, मकरंद पाटील आणि सिद्धेश्वर मसुते यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी पालकांनीही आपल्या सूचना मांडल्या. त्यावर सकारात्मक संवाद व चर्चा करण्यात आली.

सभेस शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या अलका कुताडे, अनिता खुडे, मकरंद पाटील, पत्रकार चंद्रकांत गुड्डु, संतोष सारणे, गंगाराम चिंचोले, तानाजी पोतदार, चिदानंद आरळे, सिद्धलिंग स्वामी, सुरेखा कबाडे, ज्योती चौधरी, सारिका वरडे, वैशाली कर्पे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेचे सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिद्धेश्वर मसुते यांनी केले.

### बावची विद्यालयाचा यशोत्सव!

## शिष्यवृत्ती परीक्षेत ३९ विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ जुलै -**

बावची विद्यालय, परंडा येथे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शिष्यवृत्ती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याच कार्यक्रमात उत्तुंगतेज बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेतील विजेत्या विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून परंडा केंद्राचे नवनिर्वाचित केंद्रप्रमुख नितीन बोराडे तसेच प्रशांत माने उपस्थित होते. स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल नितीन बोराडे यांचा प्राचार्य नारायण खैरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरलेल्या एकूण ३९ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

तसेच उत्तुंगतेज बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेतील विजेते विद्यार्थी तन्मय बालाजी शिंदे, संस्कृती समाधान देवकर आणि सिद्धी सचिन गरड यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरापर्यंत पोहोचविण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या मार्गदर्शक शिक्षकांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख नितीन बोराडे यांनी विद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, स्पर्धा परीक्षा तयारी आणि विविध उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठी स्वप्ने पूर्ण करावीत, असे आवाहन केले. प्राचार्य नारायण खैरे यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, नवोदय, विविध स्पर्धा परीक्षा आणि गुणवत्ता विकास उपक्रमांची माहिती देत गुणवंत विद्यार्थी, पालक आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची चिकाटी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शुभम रोडगे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत २७ तर इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत १२ विद्यार्थी पात्र ठरल्याने विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरातून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्रदीप ढवळ व ज्योती ठाकरे यांचे शिवसेनेकडून स्वागत

### आई तुळजाभवानीच्या चरणी राज्याच्या जनकल्याणासाठी साकडे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जुलै -**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपनेत्या तथा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या माजी अध्यक्षा ज्योती ठाकरे यांनी मंगळवारी तुळजापूर येथे कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचे भावपूर्ण दर्शन घेतले.

यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील शेतकरी, गोरगरीब, दीनदुबळ्या जनतेचे कल्याण व्हावे तसेच राज्यात जनतेच्या हिताचे शासन यावे, अशी प्रार्थना देवीच्या चरणी केली. दर्शनानंतर



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तुळजापूर शहर व मतदारसंघाच्या वतीने प्रा. डॉ. प्रदीप ढवळ आणि ज्योती ठाकरे यांचा शाल व श्रीफळ देऊन जंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जवाहरलाल पुरोहित, डॉ. हर्षल लिखिते, सुयश प्रधान, भूषण मोरे, प्रवीण हरमळकर, कुणाल टावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत समारंभ व दर्शनावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख श्यामलता पवार (वडणे), शीला उंबरे, सोनाली बालाजी पांचाळ, अर्जुनआप्पा साळुंखे, सुधीर कदम, श्याम पवार, सुनील जाधव यांच्यासह शिवसेना व महिला आघाडीचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण परिसर शिवसैनिकांच्या उत्साही उपस्थितीने गजबजून गेला.

### सराईत गुन्हेगार जाळ्यात;

## नळदुर्ग घरफोडी प्रकरणाचा उलगडा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई सुरू ठेवत स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने आणखी एक मोठे यश मिळविले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे टाकलेल्या अचूक सापळ्यात नळदुर्ग पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात आला आहे.

दि.४ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने कारवाई करत नरसिंग दत्तू माने (वय ३५, रा. तगरखेड, ता. निलंगा, जि. लातूर) या सराईत गुन्हेगारास पाळत ठेवून शिताफीने ताब्यात घेतले.

या गुन्ह्यातील सर्व आरोपी लातूर जिल्ह्यातील असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पोलिसांनी आरोपीकडून जळकोट येथील भांड्याच्या दुकानातून चोरीस गेलेली पितळी व तांब्याची भांडी तसेच दोन एलईडी टीव्ही असा एकूण १ लाख ७० हजार ५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# जंगम मठाची जागा ट्रस्टचीच; अपप्रचार थांबवावा

### वीरशैव जंगम मठ ट्रस्टचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जुलै -**

तुळजापूर नगरपालिकेच्या पाठीमागील वीरशैव जंगम मठाच्या जागेबाबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर वीरशैव जंगम मठ ट्रस्टने निवेदनाद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. संबंधित जागा ही धार्मिक संस्थेची मालकीची असून तिच्याबाबत सोशल मीडियातून व वर्तमानपत्रांमधून चुकीची माहिती प्रसारित करून जाणीवपूर्वक अपप्रचार केला जात असल्याचा आरोप ट्रस्टने केला आहे.

ट्रस्टच्या निवेदनानुसार, सिटी सर्व्हे क्रमांक ९७२ ही जागा हैदराबाद इंडोमेंट रेग्युलेशन ॲक्ट १३४९ फसलीनुसार नोंदणीकृत धार्मिक संस्थेची मालमत्ता आहे. शासनाने १९६२ मध्ये तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली जंगम मठ ट्रस्टची स्थापना केली. या जागेतील ७३१ चौरस मीटर क्षेत्रावर नगरपरिषदेने सुमारे ५७ वर्षांपूर्वी भाजी मंडईसाठी आरक्षण टाकले होते. मात्र तत्कालीन तहसीलदारांनी १९७० ते १९७६ या कालावधीत शासनाशी पत्रव्यवहार करून या कारवाईस विरोध दर्शविला होता. यानंतर नगरविकास विभागाने १९७६, १९७८ आणि १९८३ मध्ये नगरपरिषदेच्या पुढील कारवाईस स्थगिती दिली. त्यामुळे संबंधित जागेचा विकास नगरपरिषदेला करता आला नाही. त्यानंतर नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत विविध सर्वसाधारण सभांमध्ये ठराव मंजूर करून संबंधित आरक्षण रद्द करण्याची शिफारस शासनाकडे पाठविली. पुढे सुधारित विकास आराखड्यातही ही जागा संस्थेच्या नावावर कायम ठेवण्यात आल्याचे ट्रस्टने नमूद केले आहे. ट्रस्टने नगरपरिषदेकडून १९८४, १९८९, २०१०, २०१६ तसेच २०२४ आणि २०२५ मध्ये बांधकाम परवाने घेऊन विविध बांधकामे केली असून सध्या प्रस्तावित महादेव मंदिर, सभामंडप, शैक्षणिक संकुल आणि धर्मशाळेचे काम सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सध्या वादात असलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या जागेबाबतही ट्रस्टने स्पष्टीकरण दिले आहे. ही जागा ट्रस्टचीच असून सार्वजनिक शौचालय उभारण्यासाठी नगरपरिषदेने २५ जुलै १९८९ रोजी लेखी विनंती केल्यानंतर ट्रस्टने १५ बाय १५ फूट जागा वापरासाठी उपलब्ध करून दिली होती.

मात्र अनेक वर्षांपासून शौचालय बंद असल्याने ती जागा पुन्हा विकास आराखड्यात समाविष्ट करण्यात आली असून त्यासाठी नगरपरिषदेने ३१ ऑक्टोबर २०२४ व १५ डिसेंबर २०२५ रोजी विधिवत बांधकाम परवानगी दिल्याचेही ट्रस्टने स्पष्ट केले आहे. धर्मादाय संस्थेच्या मालकीच्या जागेवर सभागृह उभारण्याची मागणी कायदेशीरदृष्ट्या योग्य नसल्याचा दावा ट्रस्टने केला आहे. तसेच संपूर्ण जागेचा मालमत्ता कर ट्रस्टकडून नियमितपणे भरला जात असून यापूर्वीही राजकीय दबावातून ही जागा नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी तो प्रस्ताव फेटाळल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



जंगम मठाच्या जागेबाबत चुकीची माहिती पसरवून समाजात संभ्रम निर्माण केला जात असून अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही वीरशैव जंगम मठ ट्रस्टने केले आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जुलै -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात मंगळवारी (७ जुलै) इयत्ता सहावी व अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्प व चॉकलेट देऊन प्राचार्य ए. एस. कांबळे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.



यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख करून देत डॉक्टर, अभियंता, वकील, शास्त्रज्ञ, जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी, शिक्षक व उद्योगपती होण्याची आपली स्वप्ने व्यक्त केली. प्राचार्य कांबळे यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, व्यायाम, आरोग्याची काळजी, शिस्त व शाळेच्या सुविधांचा योग्य वापर करण्याचे आवाहन करत शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन उज्ज्वल भविष्य घडविण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाला वरिष्ठ शिक्षक एस.एस. माने, ए.जी. गायकवाड, एच.जी. जाधव, पी.एन. जोशी, एस.डी. वाघमारे, व्ही.एस. जाधव, कल्पना थोरात, राहुल भदर्गे, नामदेव माने आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्गमध्ये पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांसाठी अल्पोपहार सेवा

**नळदुर्ग, दि.७ जुले -**

आषाढी वारीसाठी नळदुर्गहून पंढरपूरकडे निघालेल्या वारकरी बांधवांसाठी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी अल्पोपहाराची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या निवासस्थानी अभंग, आरती व वारकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक तानाजी जाधव, आकाश कुलकर्णी, नगरसेविका राणी सुरवसे, मीनाक्षी काळे तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. वारकरी संप्रदायातील अनेक भाविकांनीही सहभाग घेतला. यावेळी विनायक अहंकारी यांनी, आषाढी वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांची सेवा करण्याचे समाधान वेगळेच असते, असे सांगितले. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी त्यांच्या या सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



### जवाहर महाविद्यालय, अणदूर येथे कदंबासह विविध वृक्षांचे रोपण

**अणदूर, दि.७ जुलै -**

जवाहर महाविद्यालय, अणदूर येथे वनस्पतीशास्त्र विभाग, ग्रीन क्लब व संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (७ जुलै) वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्राचार्य प्रा.डॉ. उमाकांत चनशेट्टी व उपप्राचार्य प्रा.डॉ.एम.एम. लंगडे यांच्या हस्ते कदंबाच्या रोपाचे रोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जून व जुलै महिन्यात वाढदिवस असलेल्या प्राध्यापकांच्या हस्ते कदंब, बकुळ, वड, पिंपळ व लिंब या पर्यावरणपूरक व आयुर्वेदिक महत्त्वाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. चनशेट्टी यांनी वृक्षांचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डी.एस. सूर्यवंशी, प्रा.पी.ए. अनमोड, संस्कृत विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्र राऊत तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांना तातडीने गणवेश द्या; काँग्रेसचे जिल्हा परिषदेला निवेदन

**धाराशिव, दि.७ जुलै -**

शालेय विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार तात्काळ गणवेशाचे वाटप करण्यात यावे तसेच गणवेश खरेदी व वितरणाचा अधिकार शालेय व्यवस्थापन समितीमार्फतच राबवावा, या मागणीसाठी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले. जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदनात, शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही अनेक विद्यार्थ्यांना गणवेश न मिळाल्याने पालक व विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले. शासनाच्या निर्णयानुसार शालेय व्यवस्थापन समितींमार्फतच गणवेश खरेदी व वितरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही करण्यात आली.

### धाराशिवमध्ये मंदिर परिसरातून दुचाकी लंपास

**धाराशिव, दि.७ जुलै -**

धाराशिव शहरातील हतलाई देवी मंदिराकडे जाणाऱ्या लोखंडी कमानीजवळ उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जनार्धन विश्वनाथ माने (वय ५९, रा. शाहूनगर, धाराशिव) यांनी त्यांची हिरो स्प्लेंडर (क्र. एमएच २५ व्ही ००६४) ही सुमारे ३५ हजार रुपये किमतीची दुचाकी ४ जुलै रोजी दुपारी १ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान मंदिर परिसरात उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने ती चोरी करून नेली. याप्रकरणी जनार्धन माने यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.



## वाशी तालुक्यात पावसाची प्रतीक्षा कायम; अपुऱ्या पावसामुळे बळीराजा चिंतेत



(संग्रहीत छाया)

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ जुलै -**

जून महिना संपून जुलै महिन्याचा पहिला आठवडा उलटूनही धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अपुऱ्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांनी उपलब्ध ओलाव्यावरच खरीप पिकांची पेरणी उरकली असून आता पिकांच्या उगवणीसाठी दमदार पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

वाशी तालुक्यात खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. यंदाही शेतकऱ्यांनी बियाणे आणि खते खरेदी करून पावसाच्या प्रतीक्षेत तयारी पूर्ण केली होती. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेकांना अपुऱ्या ओलाव्यातच पेरणी करावी लागली आहे.

सध्या पिकांच्या उगवणीसाठी सातत्यपूर्ण आणि चांगल्या पावसाची गरज आहे. मात्र पाऊस लांबल्यास उगवण न होणे, पिके करपणे आणि दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

एकीकडे मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे, तर दुसरीकडे वाशी तालुक्यात केवळ तुरळक सरी कोसळत असल्याने बळीराजा चिंतेत आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही, तर खरीप हंगामावर त्याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असून शेतकऱ्यांची धाकधूक वाढली आहे.

## धनादेश अनादर प्रकरणी एक वर्ष कारावास; आरोपीला साडेतीन लाखांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ जुलै -**

भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड, शिवाजीनगर (सोनारी) यांच्या फिर्यादीवरून दाखल झालेल्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात परंडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी आरोपी हनुमंत मधुकर आगलावे (रा. बावी (आ.), ता. बार्शी) यांना दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची तसेच ३ लाख ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.



फिर्यादीनुसार, आरोपीकडे भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडची १ लाख ७७ हजार ९४१ रुपये येणे बाकी होती. या रकमेपोटी आरोपीने साखर कारखान्याच्या नावे दिलेला धनादेश बँकेत सादर केल्यानंतर तो अनादरित (बाऊन्स) झाला. त्यानंतर कारखान्याने परंडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती.

या प्रकरणात साक्षीपुरावे व कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे सुनावणी झाली. फिर्यादी कारखान्याचे विधिज्ञ ॲड. विवेक म. काळे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीविरुद्ध धनादेश अनादराचा गुन्हा सिद्ध झाल्याचे नमूद केले.

न्यायालयाने आरोपीला एक वर्षाचा साधा कारावास आणि ३ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त सहा महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. हा निकाल २९ जून २०२६ रोजी देण्यात आला.

या प्रकरणात फिर्यादीच्या वतीने शंकर सुब्राव नरसाळे, तुळशीराम अंबादास बालगुडे, श्रावण हरिभाऊ कोकणे आणि प्रल्हाद शेषराव ठोंबरे यांच्या साक्षी तसेच कागदोपत्री पुरावे महत्त्वाचे ठरले. फिर्यादी साखर कारखान्याच्या वतीने ॲड. विवेक म. काळे यांनी कामकाज पाहिले.

## परंडा तालुक्यात अवैध वाळू वाहतूक उघड; टिप्परसह ५.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त



(संग्रहीत छाया)

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

परंडा तालुक्यातील मुगाव-डोंजा रस्त्यावर अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई करत आंबी पोलिसांनी ५ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भिमराव तात्यासाहेब माने आणि विकास रमेश गाढवे (दोघे रा. देवळगाव, ता. परंडा, जि. धाराशिव) हे २८ जून २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मुगाव ते डोंजा रस्त्यावर टिप्पर क्रमांक एमएच-१२ एचडी-९७३८ मधून अवैधरित्या तीन ब्रास वाळू वाहतूक करताना आढळून आले.

सदर वाळू गौण खनिजाची चोरी करून ती लबाडीच्या उद्देशाने वाहतूक केल्याचा आरोप असून, वाळूसह टिप्पर असा एकूण ५ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी सायली रविंद्र शिंदे (रा. प्रेरणा नगर, परंडा) यांनी ६ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मद्यपी दुचाकी चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविष्कार दयानंद गायकवाड (वय २९, रा. समर्थनगर, धाराशिव) हा सोमवारी (६ जुलै) सायंकाळी सुमारे ७ वाजता एमएच १३ एएच १३०५ क्रमांकाची दुचाकी पायल स्वीट होमसमोर मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे आढळून आले.

## काटगाव केबल चोरीप्रकरणी चार अट्टल चोरटे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.७ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील काटगाव साठवण तलाव परिसरासह विविध गावांमध्ये शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींच्या केबल चोरी करणाऱ्या अट्टल टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले असून, चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.



अनेक गुन्ह्यांची उकल....

दि.२६ व २७ जूनच्या मध्यरात्री काटगाव येथील सुमारे ३५ शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींना जोडलेल्या सुमारे ३,६०० फूट तांब्याच्या केबल वायरची चोरी झाली होती. शेतकरी तुकाराम माळी यांच्या तक्रारीनंतर पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीपान कोळी व पथकाने तपास करून मारुती उर्फ बाबा वाघमारे, लक्ष्मण माळी, मारुती वाघमारे व कैमुद्दिन रंगारी (सर्व रा. काटगाव) यांना अटक केली. आरोपींकडून ३५ किलो तांब्याची तार आणि चोरीसाठी वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. चौकशीत त्यांनी तामलवाडी, अक्कलकोट, नळदुर्ग परिसरातील चोरींसह अन्य वाहनचोरीचे गुन्हेही कबूल केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीपान कोळी व त्यांच्या पथकाचे शेतकऱ्यांकडून कौतुक होत आहे.

## सरकारी जागांवरील अतिक्रमणे हटविण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ जुलै -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील सरकारी जागांवरील अतिक्रमणे हटविण्याचा ठराव एकमताने मंजूर झाल्यानंतर आता त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी शहरवासीयांकडून जोर धरू लागली आहे. शहरातील सर्व सरकारी जागांवरील अतिक्रमणे कोणताही भेदभाव न करता हटवावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**नळदुर्गमधील न.पा.च्या ठरावाच्या अंमलबजावणीकडे नागरिकांचे लक्ष**

शहरात गेल्या काही वर्षांत सरकारी जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने नळदुर्गचे विद्रूपीकरण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी अतिक्रमण करून त्या जागा भाड्याने देऊन आर्थिक फायदा घेतला जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे अशा अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. अतिक्रमणांमुळे सर्वसामान्य नागरिकांसह शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः नळदुर्ग बसस्थानकालगतच्या अक्कलकोट रस्त्यावर गटारींवर अतिक्रमण झाल्याने वाहतूक आणि पादचाऱ्यांची गैरसोय वाढली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने रस्ते अरुंद झाले असून वाहतुकीवर त्याचा परिणाम होत आहे. शहरातील वाढत्या अतिक्रमणांच्या पार्श्वभूमीवर हा विषय नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. यावर झालेल्या चर्चेनंतर भाजप आणि काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी शहरातील सरकारी जागांवरील अतिक्रमणे हटविण्याचा ठराव एकमताने मंजूर केला.

या ठरावानुसार नगरपालिकेने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर कारवाई करून सार्वजनिक रस्ते आणि जागा नागरिकांसाठी मोकळ्या कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांनी केली आहे.

## जंगम मठाच्या आरक्षित जागेप्रश्नी नागरिकांचे उपोषण




मुख्याधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जुलै -**

तुळजापूर नगर परिषद हद्दीतील वीरशैव समाजाच्या जंगम मठाच्या आरक्षित जागेबाबत जवाहर गल्लीतील नागरिकांच्या वतीने सोमवारी नगर परिषदेसमोर लोकशाही मार्गाने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. सदर आरक्षित जागा सार्वजनिक हितासाठी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी तुळजापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी लेखी आश्वासन देत संबंधित जागेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती दिली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येणार असून, हा विषय नगर परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येईल. सभेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच लोकशाही मार्गाने सुरू असलेले लाक्षणिक उपोषण मागे घेण्याची विनंती त्यांनी केली. मुख्याधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी तात्पुरते उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, भविष्यात या विषयावर ठोस निर्णय झाला नाही, तर अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची पुढील दिशा निश्चित केली जाईल, असा इशाराही नागरिकांनी दिला.

या आंदोलनाला महिला नगरसेविका, महिला कार्यकर्त्या, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दिला.

## सहकार सप्ताहानिमित्त रूपामाता ईरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

केंद्रीय सहकार मंत्रालय व सहकार विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह-२०२६ निमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, धाराशिव, जिल्हा सहकार बोर्ड मर्यादित, धाराशिव तसेच रूपामाता अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रूपामाता ईरा इंटरनॅशनल स्कूल, सांजा रोड, धाराशिव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी जिल्हा उपनिबंधक पांडुरंग साठे, रूपामाता परिवाराचे संस्थापक ॲड. व्यंकट गुंड पाटील, सहाय्यक निबंधक अरुण शेंदारकर, सहाय्यक निबंधक ए. आर. सय्यद, कार्यालय अधीक्षक डी. एस. जाधव, जिल्हा सहकार विकास अधिकारी मधुकर जाधव, रूपामाता मल्टीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, रूपामाता अर्बनचे मुख्य प्रशासकीय अधिकारी विशाल गुंड पाटील, रूपामाता ईरा इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य सर्वपल्ली अरुण कुमार, रूपामाता प्राथमिकचे मुख्याध्यापक विजय पिंपळकर, हेड मॅनेजर अजयसिंह ठाकूर तसेच रूपामाता फाऊंडेशनचे समन्वयक गजानन पाटील यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संगोपन व संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. सहकार चळवळीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास सहकार विभागातील अधिकारी व कर्मचारी, रूपामाता परिवाराचे पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिक उपस्थित होते.

## गोंधळ घालणाऱ्या युवकाविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जुलै -**

नळदुर्ग-तुळजापूर मार्गावरील वसंतनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत आरडाओरड करून गोंधळ घालणाऱ्या युवकाविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकुश दशरथ पवार (वय २७, रा. दुर्गानगर, नळदुर्ग) हा ६ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वसंतनगरसमोर नळदुर्ग-तुळजापूर रस्त्यालगत सार्वजनिक ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालताना पोलिसांच्या निदर्शनास आला.